साल अखेर ,, ,, १ ०८
किरकोळ अंकास ........................०४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपस .... ........०१

Six monthly........ 3 ............... 8 as
Single copy ................................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Peline......3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

YOL XXXI — AKOLA MONDAY 6 SEPTEMBER 1897 — NO 35

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ६ माहे सप्तेंबर सन १८९७ इ० — अंक ३५



## जाहिरात

किंमत ।= केसरीकर्ते सहा आणे.

**ना० टिळक.**

पृष्टें ८० ह्यांचें चरित्र कागद ग्लेझ

पत्ताः— के. बा. सहस्रबुद्धे.
गिरगांव मुंबई.

## नाशिकचा माल

चांदी, पितळ, व तांबें वगैरेचीं भांडीं उपकरणीं वगैरे सोन्याचे दागिने सुद्धां हरएक प्रकारचा माल वेऊन व्ही. पीनें पाठवू. कमिशन रुपयास ६ पै.

पत्ता— आबाजी सीताराम मोडक
नासिक.


## वर्षाकाल गमन

मदनमित्र मधू आजि संपला ।
जलद एक परी न दिसे मला ॥
गगन शुभ्र वरी पसरे निळें ।
अवनि खालति धूलिरजें मळे ॥ १ ॥

सजल नीरद येईल तो कधीं ।
बघति ते टक लावुनिया सुधी ॥
अझुनि एक न मेघ दिसे नभीं ।
ह्मणुनि तन्मन फारचि वेंत भी ॥ २ ॥

रविकरें तपतें अवनीतल ।
बघुनि लोचनि तें द्रवतें जल ॥
विधि अपूर्व गमे अजि कोपला ।
जन मुखेंदु सुकोनिच चालिला ॥ ३ ॥

गलितपर्ण मिषे द्रुम ढाळिती ।
अमित अश्रुजला जलदा किती ॥
न करुणा किमपी तुज ये गडे ।
परि सुदुस्तर दुःख तया जडे ॥ ४ ॥

विटप वेष्टित वल्लरि दीन ती ।
निरखि ते तव आगमना प्रती ॥
तुज विलंब गडे ! अजि लागला ।
मृदुल काय तिचा परि पोळला ॥ ५ ॥

जलतडाग सुकोनिच चालिले ।
तुजविणें जलजीव दुरावले ॥
अहह ! निर्घृण हे जलदा! कृती ।
रसिक खास असें नचि वागती ॥ ६ ॥

अनल वर्षतसे अपल्या करें ।
रवि सुतप्त महा वरती त्वरें ॥
दश अणीकहि दोन विलोचन ।
उघडुनी वरि सूक्ष्म निरीक्षण ॥ ७ ॥

उदधि बंधन काय तुला करी ।
ह्मणुनि येसि न धावत सत्वरीं ॥
अनिल वैर करी अथवा तुसी ।
ह्मणुनि तूं अजि फार विलंबसी ॥ ८ ॥

चहूकडूनि जयीं अटवि तपे ।
लघु शिशूसि मृगी न तयी जपे ॥

मृगजलें बहु दिग्भ्रम होतसे ।
फिरति वन्य पशू बहु दीनसे ॥ ९ ॥

न फलवृक्षिं फलें रसवत्तरें ।
न लतिकासि सुमें सुमनोहरें ॥
न विहगा ! अति अल्पाहि साउली ।
झटिति येइ पयोधर माउली ॥ १० ॥

द्रुम विहीन असे द्रुमवाटिका ।
जल विहीन दिसे जलवापिका ॥
न अणुतोष कृषीवल मानसा ।
झटिति येइ पयोधर राजसा ॥ ११ ॥

उषसिं गोपसुते हरिली गुरें ।
विपिनिं मूढमती फिरती त्वरें ॥
न तृण वा जळ अल्पहि त्या मिळे ।
तव न मानस निर्घृण! तें वळें ॥ १२ ॥

पवन मंद वरी तनु पोळितो ।
जललवांश तनूंतिल जाळितो ॥
चरचरा जणु जीवचि काटितो ।
परि न खेद तुझ्या मनि दाटतो ॥ १३ ॥

खगसखी निरखी जल काननीं ।
त्यजुनि कोटर दूरहि हिंडुनी ॥
रविकरें हत भूमितळीं पडे ।
न तुझिया परि खेद मना जडे ॥ १४ ॥

पसरि कर्बुर पिच्छ मयूर तो ।
जलद ! दीन मुखें तुज बाहतो ॥
न निरखी जरि सर्पहि आश्रया ।
पदयुगीं शिरतो बघ त्याचिया ॥ १५ ॥

चटक काक सुसन्निध बैसती ।
वनिं मृगासह वाघहि धांवती ॥
करिकपोत चुकोनि शिरे दरीं ।
परि तयास न संहरि केसरी ॥ १६ ॥

विहगवृंद पशूगण विस्मरे ।
सहज वैर परस्पर सत्वरें ॥
बहु विमूढ वनीं बघ धांवतो ।
पार न खेद तुझ्या मनिं दाटतो ॥ १७ ॥

पाथिक तप्ततनू तरुसावली ।
निरखि, त्या परि एक न गावली ॥
तडफडे बहु जीव तदीय तो ।
परि न खेद तुझ्या मनिं दाटतो ॥ १८ ॥

तटिनिचा बघ ओघहि खुंटला ।
कुठकुठे जलसंचय साचला ॥
अवनिहार तुटोनि चहो दिशे ।
विखुरलें मणिमौक्तिक हें दिसें ॥ १९ ॥

पवन सांग कुठे अजि गुंतला ।
करि सहाय न कां तुज तो भला ॥
जलधि पर्यटनीं मन गुंतलें ।
मन तदीय गमे जरि थोरलें ॥ २० ॥

क्षणभरी वनवैभव या परी ।
विगत कांति दिसे रविच्या करीं ॥
परी समीरण मंद चले पहा ।
हरिल भानु करोत्थित ताप हा ॥ २१ ॥

मृदुल पुष्पचया हळु हालवी ।
गलित पर्ण गणा मग चालवी ॥
जलतडाग पया करि चंचल ।
[ पवन जीवित साराचि केवल ] ॥ २२ ॥

हळुहळू ध्वनहि फडके पहा !
विटप डोलति सौख्य भरें महा ॥
तरु समाश्रित वल्लरि बावरे ।
बघुनि मारुतरंह तदा त्वरें ॥ २३ ॥

भरभरा बहु धांवत येतसे ।
विकल पादप-काय करितसे ।
उडवि धूलिचया गगनांतरें ।
[ पवन हा यम निर्घृण भूवरि ] ॥ २४ ॥

खडखडा उघडी खिडक्या घरीं ।
धडधडा पडती तरु भूवरि ।
उडवुनी गृह नेईल वाटतें ।
प्रळय देखुनी चित्तचि कापतें ॥ २५ ॥

जन पळे स्वगृहीं बहु बावरा ।
परि न मार्ग तयास दिसे जरा ॥
निबिड धूलि महीध्राहि आक्रमी ।
गगनभाग; न कांहीं दिसे तमीं ॥ २६ ॥

उन टळे ह्मणुनी पुरकामिनी ।
मलीन वस्त्रचयासचि घेउनी ॥
धुवित बैसली निर्झरणी तटीं ।
खळखळा जलसन्निध गोमटी ॥ २७ ॥

पवन धूम करी इतुक्यांत हा ।
उडवि तद्वसनें सगळीं पहा ॥
बहुत सावरि होउनि घाबरी ।
वसन एक तिला न मिळे परी ॥ २८ ॥

परुष सासु वदेल ह्मणूनिया ।
बहुत खिन्न मनें गृहिं जावया ॥
निवतसे परि वाट तिला दिसे ।
न; पवना ! बहु बावरि हे तसे ॥ २९ ॥

करि धुमाकुळ मारुत या परी ।
अमित वृक्ष पडे तिथें भूवरी ॥
'क्षणभरि श्रम टाकु निवारुनी' ।
ह्मणुनि काय उगा वससी वनीं ॥ ३० ॥

तिमिर संघ नभांतुनि मावळे ।
पवन विव्हल शांत सरिज्जळें ॥
विटप कंपन सर्वहि थांबलें ।
विहग वर्गहि अंबरिं धांवले ॥ ३१ ॥

विखुरलीं पवनाहत तीं गुरें ।
विपिनि गोप तया जमवी त्वरें ।
ऋजुपथा त्यजुनी अजसंघ तो ।
स्वमुख कां झुडुपांतरीं घालितो ॥ ३२ ॥

वरुण दिग्गत कृष्णहि अल्पसे ।
शकल नूतन ते कसचें दिसे ॥
प्रबल मारुत लोटुनि आणितो ।
सजल नीरद वृंदचि काय तो ॥ ३३ ॥

पसरली निमिषांत नभांतरीं ।
सजल अभ्रघटाचि खरोखरी ॥
ककुभ पश्चिम व्यापुनि टाकिली ।
पुढति मेघघटा सरसावली ॥ ३४ ॥

निमिष मात्रचि कुंठित तद्गती ।
करितसे नग होय अशी मती ॥
शमवूनी नग दाव शिखीं महा ।
क्रमे पथा पुढती नव मेघ हा ॥ ३५ ॥

रविकरासि न मेघ जुमानितो ।
गगनभाग हळूहळु व्यापितो ॥

अहह ! थोर तुझें बहु रूप हें ।
जन बघे परि अद्भुत सोत्सहें ॥ ३६ ॥

खचित काय जडीकृत वाफही ।
पसरते गगनी ? तिमिरीं मही ॥
गडुनि जाय. न कृष्णदपञ्चय ।
मग असें ! जनिं हा बहु विस्मय ॥ ३७ ॥

दिडकि देऊ तुला अति कौतुकें ।
वदति हृष्टमनें बहु बालकें ॥
सरभसें उडती किती नाचती ।
कितिक बाहु उभारुनि पाहती ॥ ३८ ॥

जललवें बहु शीतल वायु हा ।
सुचवितो तव आगमना पहा ।
वसुमतींतुनीं गंधहि नीरद ! ।
सरस येत असें वर सौख्यद ॥ ३९ ॥

न दिसतो नग तुंग समोरचा ।
न दिसतो तरु संघहि खालचा ॥
न दिसतो सरिदोघ; नवा दिसें ।
निकट देव-निकेतन नें असें ॥ ४० ॥

बहुत भीषण निस्वन गर्जुनी ।
भिववीसी शिशुवृंद उगा मनीं ॥
न चपला अबला जलदा ! खरी ।
बहुत शीघ्र फिरे गगनांतरी ॥ ४१ ॥

उदक बिंदु न एकन दोन ते ।
अमित लोटति सत्वर खालतें ॥
तरिहि न बालकवृंद न भीतसे ।
ह्मणुनि मारिसि त्या करकामिसें ! ॥ ४२ ॥

उदक पूर महीवरि लोटला ।
पटलभाग भरोनिच चालिला ॥
तटिनि-ओघ तुफान वळावला ।
महिस वृष्टिच दे तव तुष्टिला ॥ ४३ ॥

तरुलता बहु नूतन उद्भवे ।
हरित शाद्वल भूवरि ये नवे ॥
तृणसमावृत भू सुख देतसे ।
जलद काल न शैशव हें कसें ॥ ४४ ॥

नव विचार तरंग शतावधी ।
उठुनि चंचल डिंभ मनोंबुधी
पितृमना बहु तें सुख देतसे ।
जलदकाळ न शैशव हे कसें ! ॥ ४५ ॥

अमित विघ्न समूह निवारुनी ।
भवरथा मिरवी नर हा जनीं ॥
तरु नगें पथ रुद्धहि वाहतो ।
पवन यौवन कालचि भासतो ॥ ४६ ॥

कनक साठवुनी तनु भागता ।
विषय सेवुनि रोग दुणावता ॥
नर गुरुविण तो वरि दीनता
जरठ भाव निदाघचि तत्वता ॥ ४७ ॥

भवतपें तपता मनुजीं पहा ।
जयपराजय कांचन लोह हा ।
द्विविध भावें गळोनिच जातसे ।
जरठभाव निदाघ कसा नसे ॥ ४८ ॥

गुरु कृपेविण अन्य न आश्रय ।
गुरु कृपाजलबिंदुचि निश्चय ॥

करिल शांत मनुष्य तनूस ते ।
जरठभावनिदाघचि वाटतो ॥ ४९ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १० शके १८१९

## नेटिव्ह व्हालंटीयर्स.

सांप्रत लढाई होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्या पासून या विषयाचे संबंधानें बरीच चळवळ चालूं आहे. क्रिश्चन लोकांची व्हालंटीयर पलटणी बऱ्याच दिवसांपासून सर्व हिंदुस्थानभर झाल्यां आहेत. वऱ्हाडांत रेलवे व्हालंटीयर ह्मणून कांहीं कंपन्या आहेत हें आमचे वाचकांस माहीत असेलच. परंतु वरील लढाईचा रंग दिसूं लागल्या पासून क्रिश्चन लोकांची व्हालंटीयर पलटणें वाढूं लागून त्यांचे संबंधानें सविस्तर नवीन ठराव ही सरकारनें पूर्वींच प्रसिद्ध केला आहे. यांत क्रिश्चन व्हालंटीयर शिपायांस कांहीं बक्षिसें, ड्रेस, दारूगोळा, बंदुका वगैरे देण्याचा ठराव व तपशील आहे. घोडेस्वार व्हालंटीयर हीं कांहीं ठिकाणीं होण्याचा ठराव झाला आहे. तसेंच समुद्र किनाऱ्या वरील कांहीं शहरीं व्हालंटीयर तोफखाना ही होण्यास परवानगी दिल्याचें समजतें. परंतु हें सर्व क्रिश्चन लोकांचें संबंधानें. यांत नेटिवांचा शिरकाव नाहीं.

ख्रिश्चन व्हालंटीयर बद्दल इतक्या झपाट्यानें मोठी कडेकोट तजवीज चालूं आहे व पुढें होईल यांत शंका नको. परंतु नेटिव व्हालंटीयर पलटणें होऊं देण्याची परवानगी मिळण्याबद्दल नेटिव्ह गृहस्थांनीं केलेले अर्जाचा निकाल करण्यास अद्यापि सरकारास अवधि मिळत नाहीं हें पाहून नेटीव गृहस्थांच्या अंतःकरणास फार दुःख होत असेल हें साहजिकच आहे. नेटिवांस जो कांहीं मागण्याचा हक्क आहे तें देण्याचें असल्यास देखील फार वेळ लागतो. वस्तुतः क्रिश्चन प्रजांस जो हक्क आहे तो नेटिवांस आहेच आहे. ख्रिश्चन प्रजांचे हक्क एक प्रकारचे व नेटिवांचे दुसऱ्या प्रकारचे असें नाहीं. उभयतांचे सारखेच. हें सरकारानें सहस्र वेळां कबूल केलेलें आहे. तथापि पदोपदीं नेटिवांस किंचित् ही पुढें सरसावूं देण्यास सरकारास संकट पडतें, व सरकारचे कृतींत पूर्वापार संबंधांत वारंवार विरोध येतो. हिंदु प्रजांवर पूर्ण भरंवसा सरकारचा आहे असें सरकार ह्मणतें. परंतु पहातां यःकश्चित ख्रिश्चनास जी परवानगी आहे ती मोठ्या प्रतीचे नेटिवांस मिळत नाहीं. याचा अर्थ फक्त सरकारास च कळत असेल तो आह्मास कळत नाहीं. जर कांहीं खरोखर अर्थ असल्यास तो वचन व कृति यांची एकवाक्यता होण्यास असा पाहिजे कीं, नेटिवांचे राजनिष्ठेवर भरंवसा नाहीं तेव्हां त्यांचे अंगीं शिपायीबाणा असल्यास इंग्रजी राज्यास भीति आहे. बरें, अशी कल्पना करावी तर दरमहा सात रुपये देऊन ठेविलेले साठ हजारांवर नेटिव शिपाई सरकारचे चाकरींत आहेत व त्यांणीं परद्वीपांत जाऊन ही शिपायीगिरीवर बाहदुरी अनेक वेळ मिळाविली आहे. बरें, सात रु० दरमहा घेणाऱ्या नेटिवांवर जर आमचे सरकारचा भरंवसा आहे तर स्वसंतोषानें सरकारास मदत देण्यास इच्छिणाऱ्या मोठ्या प्रतीचे नेटिव गृहस्थांवर ठेवण्यास कोणती अडचण आहे. युक्तीचे वाटेनें पाहिल्यास असूं नये. पण आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. तेव्हा या सरकारचे करणीचा अर्थच होत नाहीं असें ह्मणणें जरूर आहे. कारण कोणत्याही युक्ति प्रयुक्तिनें पाहिलें तरी सर्वत्र परस्पर विरोधच. या करणीचें न्यायशास्त्र सांपडतच नाहीं.

आह्मांस असें वाटतें कीं, आपणांवर सरकारचा भरंवसा नाहीं असें प्रजेनें ह्मणण्यास सरकारानें जागा ठेवूं नये. विश्वास हा परस्पराश्रित आहे. एकनिष्ठ भाव सरकारावर लोकांनीं ठेवावा असें इच्छिणारे सरकारानें आपला पूर्ण भरंवसा लोकांवर ठेवलाच पाहिजे. एकाचे अभावीं दुसरें विद्यमान रहात नाहीं. हा न्याय आमच्या जाणत्या दूरदर्शी सरकारास कळतच असेल. वस्तुतः हें बोलून दाखविण्याची जरूर मुळींच नाहीं.

पगार न घेतां आपखुषीनें शिपायाचें काम करणें हें स्वराज्य संरक्षणासाठीं मनुष्य करण्याचें पतकरतो. या देशांत तूर्त सारखे रहाणारे क्रिश्चन लोकांस या देशाचे राज्यास स्वराज्य जितक्या अंशीं ह्मणवेल त्यांपेक्षां हिंदुस ज्यास्ती ह्मणवेल. अर्थात् वस्तुतः ज्यांस हा स्वदेश ह्मणवेल त्यांचे हिता पेक्षां क्रिश्चन लोकांचें हिताहित या देशाचे राज्याचें संबंधानें कमी आहे. पण वस्तुतः असावी त्याचे विरुद्ध स्थिति व्हालंटीयर कामांत आहे. येथील न्यायशास्त्र पहातां आमच्या राज्यकर्त्यांचा धर्म हेंच होय. सधर्मियांचें परस्परावर ज्यास्ती प्रेम किंवा विश्वास असावा यांत कांहीं वांकडें नाहीं. पण धर्मबाबद राज्यकारणाच्या विचारांत येणें हें राज्यकर्त्यांचें वचना विरुद्ध आहे.

हिंदु किंवा मुसलमान या पेक्षा इस्ट इंडियन वगैरे क्रिस्तानुयायी अधिक शूर असा समज आमचे सरकारचा नसेलच. एकंदरींत पाहतां व्हालंटीयर एका जातीस होऊं देणें आणि दुसरीस न होऊं देणें अशा पंक्तिप्रपंचा पासून परिणामीं सरकारचा कांहीं एक फायदा होणार नाहीं. कदाचित् त्यापासून हिंदु मुसल्मानादिक क्रिश्चनभिन्न लोकांचीं मनें दुखविल्याचा परिणाम होण्या सारखा आहे. इंग्रजी राज्यांत विद्यावृद्धीचे कारणानें लोकांस नीति अनीति मानापमान हीं दिवसें दिवस ज्यास्ती समजूं लागलीं आहेत. हें समजून केवळ क्रिश्चन ह्मणून क्रिश्चन लोकांस अधिक आमचे सरकार हक्क देईल आणि तेणें करून इतर जातीच्या लोकांस कमीपणा आणील तर तें बरें नाहीं असें आह्मी समजतों. आमचे राज्यकर्ते निस्सीम स्वदेशाभिमानी आहेत त्या अर्थीं त्यांस या देशांतील लोकांपेक्षां इतर देशीयांस जास्ती हक्क व मान राज्यकर्त्यांनीं ठेविल्यास आह्मांस तें कसें वाटेल याची कल्पना सहज करितां येईल.

---

लोकल बोर्डाची संस्था या देशांत मोठ्या समाधानकारक स्थितींत चालल्या आहेत. हा अनुभव गेल्या दहा वर्षांचा आहे आणि गांवोगावचा स्थानिक कारभार लोक आपोपल्या योग्यते प्रमाणें चांगला चालवितात इतकेंच नाहीं तर स्थानिक स्वराज्याच्या अधीक अधिकारदानाला लोकांची पात्रता दिसून येते ही संतोषाची गोष्ट होय. लोकल बोर्डाच्या उत्पन्नाच्या बाबी अगदीं नियमित आहेत आणि त्या देखील जमिनीच्या साऱ्या प्रमाणें कायमच्या आहेत सर्व उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नांत एकत्र केलें आणि अशा राष्ट्रीय उत्पन्नाचा ठराविक भाग प्रांतिक कारभाराकडे द्यावयाचा असा ठराव लार्ड मेयो साहेबांच्या कारकिर्दींत झाला तेव्हां पासून प्रांतिक सरकारचे हातपाय बांधले गेले आणि त्यास स्थानिक कारभारा साठीं ह्मणून निराळा फंड उभारावा लागला ही व्यवस्था १८७१ सालीं अमलांत आली. जमिनीचा सारा ही जशी सरकारच्या कराची बाब आहे त्या प्रमाणें साऱ्याच्या रकमेवरच रुपयामागें एक आणा किंवा सव्वा आणा या प्रमाणांत स्थानिक कर लागूं केला. हीच बाब उत्पन्नाच्या दृष्टीनें पहिली आहे. या शिवाय कोंडवाड्याचें उत्पन्न, शाळांच्या फीचा वसूल, प्रांतिक सरकारांतून विशिष्ट सार्वजनिक कामा निमित्त मिळलेल्या देणग्या व इतर किरकोळ बाबी मिळून लोकल बोर्डाचा खजिना भरतो. या बाबी मध्यें उत्पन्न वाढण्याचा वाटा फार थोड्या आहेत आणि त्या बाबी अधिक आकुंचित होण्याचा संभव नाहीं तसा त्या फारशा वर्धमान होण्याचा संभव नाहीं. लोकल बोर्डाचें उत्पन्न प्रांतवारीनें खालीं दर्शविलें आहे आणि त्याचें महत्व कळण्या साठीं ऐन काळीचें उत्पन्नही दाखविलें आहे:—

| प्रांत | साऱ्याचें उत्पन्न | लोकलबोर्डाचें उत्पन्न |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| मद्रास | ९,६७,०६,७१९ | ८९९४८७९ |
| मुंबई | ६०९७८६३१ | ९०८०४३७ |
| बंगाल | ३,८९,७३,१९२ | ६७,७०९८६ |
| वायव्य प्रांत व औध | ६१३४४०६१ | ३७,८४,४२० |
| पंजाब | २,३८,७५,२४० | ३१,१६,४३३ |
| मध्यप्रांत | ८२,६४,०१९ | ९०८७४४ |
| आसाम | ५९,७६,७०७ | १२२२४११ |
| वऱ्हाड | ६८२७९६३ | ६९७९२४ |

## राजद्रोह

हल्लीं काल्पनीक सृष्टीला दृश्य पदार्थापेक्षां विशेष वैचित्र्य व मनोज्ञता आली आहे. पदार्थाचें खरें स्वरूप लयास जाऊन राजद्रोहासारख्या मिथ्यारोपांचे तरंग वाहूं लागले आहेत. तरी या तरंगास यथार्थता आणण्यासाठीं अंग्लो इंडियनांच्या मुखांतून गळणारी विचारमाला प्रमाणभूत मानली जाते. अराजनिष्ठाप्रवर्तक लेख नेटिव वर्तमान पत्रांतून येतात असें प्रथम कल्पनाजल पसरविलें. आणि त्यांत जेवढे पत्रकार ओढून घेतां येतील त्यांस शासन करण्याचा संकल्प सरकारानें ठरविला आहे असें वाटतें. प्रत्यक्ष इंडिया सरकाराची या गोष्टीला मान्यता असावी असें भासते.

खरोखर, इंडियन लोकांचे दुर्भाग्य होय कीं आमच्या सरकारास बंडाचीं व राजद्रोहाचीं लक्षणें इंडियांत दिसतात. राजद्रोहाचें स्वप्न देखील आमच्या लोकांना पडणार नाहीं. पण राज्यकर्ते तर काल्पनिक राजद्रोहावर मनोराज्य करीत आहेत. राजकी यदृच्छा ब्रिटिश लोकांचा व इंडियन लोकांचा अन्तरात्मा एकरूप आहे. भूपृष्ठावरलि अंतर, धर्माचा भेद, भाषेचा भिन्नपणा इत्यादि भेदक उपाधी चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या थोर प्रभावानें, उदार राजनीतीनें, व अतुल भूतदयेनें विलयाला पोचल्या आहेत. रेलवे, आगबोटी, तारायंत्रें वगैरे सोयीनीं आह्मी व राज्यकर्ते अगदीं संन्निध बसलो आहोत, धर्मभेदाविषयीं सहिष्णुता सर्वत्र पसरली आहे, इंग्रजी विद्येच्या संस्कारानें आह्मी ब्रिटिश लोकांशीं एकजीव होत चाललों. जुबिलीच्या वेळीं नामदार महादेव गोविंद रानडे यांनीं या गोष्टीलाच उद्देशून इंडियन राजभक्तीचा महिमा वर्णिला आणि या नैतिक उन्नतीनेंच ब्रिटिश सरकारचें सर्व वैभव वर्धमान आहे असें कळविलें. राष्ट्रीय सभा देखील इंग्लिश राज्य चिरस्थायी, भक्कम व कल्याणप्रद अधिकाधीक करीत आहे. सर्व गोष्टींचा ओघ ब्रिटिश राज्याची प्रशांतता व आबादानी या कडे चालला असतां कांहीं आकस्मिक गोष्टींशीं संबंध घडून निराळाच चुकीचा घातुक मार्ग मुंबई सरकारानें स्वीकारला आहे असें आह्मांस वाटते.

नेटिव पत्रकारांचे लेख कितीही वाईट असले तथापि त्यांत आमच्या मतें राजद्रोहाचा गंधही नसतो. सरकारच्या अधिकाऱ्यास उद्देशून लेखाचा भडिमार कितीही केला तरी त्यांत सरकाराशी द्रोहबुद्धि नसते. गोम्या त्रास देतो ह्मणून त्याला काढून सोम्या सारख्याला नेमा असा सरकारास अर्ज केलेला असतो. व्यक्तिमात्राच्या दोषाविष्करणापासून सरकाराला आपली चूक दुरुस्त करण्यास संधि मिळते. जर पूर्वीं बंड होण्याचीं चिन्हें होतीं तर नेटिव पत्रकर्त्यांनीं तीं समूळ नाहींशीं केलीं आहेत असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. सरकार व प्रजा या मधील विश्वासू सल्लागार नेटिव पत्रकार होत. नेटीव पत्रांमुळें ब्रिटिश राज्या विषयीं प्रेमबुद्धि, दृढासक्ति व स्वामीपरायणता हीं उत्पन्न झालीं. क्षणभर कल्पना केली कीं जर एखाद्या लेखानें सरकाराविषयीं लोकांच्या मनांत अजरानिष्ठा उत्पन्न होण्याचा संभव होता तर त्याच पत्रकर्त्यांच्या इतर लेखा मुळें जो राजभक्तीचा जयस्तंभ लोकांमध्यें उभा झाला आहे तो किती भक्कम आहे याचा विचार अवश्य केला पाहिजे.

सरकारानें प्रजेवर कधींही हात उचलूं नये. क्षमेनेंच चुकलेल्या माणसाला ताळ्यावर आणिलें पाहिजे. राजदंडानें चांगला परिणाम सहसा घडत नाहीं. प्रजेच्या मनांत वितुष्ट आणणारे लेख प्रकाशित होऊं नये ह्मणून काळेपाण्याच्या शिक्षा ठोठावून काल्पनिक अराजनिष्ठेचें उन्मूलन सुरू केलें आहे. अराजनिष्ठा नसतां

तिचें चित्र लोकांपुढें मांडलें जात आहे. क्षुल्लक लेखा बद्दल वर्तमान पत्रकारांस काळेपाण्यावर पाठविल्यांनें तितक्या व्यक्ती नाहींतशा होतील परंतु त्या मुळें सरकारा विषयीं प्रेमभाव नाहींसा होईल. सारांश अशा फौजदारी खटल्यांचीं फळें राजनिष्ठेच्याच वृक्षास घातुक होतील असा आमचा तर्क आहे.

हल्लीं जे लेख अराजनिष्ठा प्रवर्तक वाटतात ते खरोखर तसे नसतात. कित्येक केवळ इतिहासविषयक असतात, कित्येक दोषदर्शक असतात आणि कित्येक आमच्या उन्नतीचे मार्गदर्शक असतात. उन्नतिविषयक लेखामध्यें आमचा राजधर्म प्रकाशित होत असतो आणि तो राजधर्म असा कीं इंडियन लोक ब्रिटिश प्रजेच्या हक्काला अधिकारि आहे. आणि हाच राजधर्म महाराणी सरकारच्या जाहीरनाम्यांत आह्मांस सांगितला आहे. त्या राजधर्मानें वागतांना आह्मांस इंग्लिश लोकांशीं राजकीय गोष्टींत झुंज घ्यावी लागते आमच्या हक्कांची पूर्ण स्थापना पुष्कळ आंग्लो-इंडियनांस आवडत नाहीं. जेतृपणाचा हक्क आतां उरला नाहीं. परमपूज्य व्हिक्टोरिआ सरकारच्या छत्राखालीं इंडियन लोक व इंग्लिश लोक समसमान आहेत. हा सारखेपणा कित्येकांस सहन होत नाहीं आणि त्या मुळें इंडियन पत्रकारांच्या लेखां मधील अराजनिष्ठेचें मृगजळ आमच्या सरकारी अधिकाऱ्यांस पळवितां पळवितां दमविलें.

आह्मांस पराकाष्टेचें दुःख वाटतें कीं इसलामपूरचे ' प्रतोद ' पत्राचें संपादक रा. रा. रामचंद्र नारायण व मालक रा. रा कृष्णाजी धोंडदेव यांस गेल्या मेच्या १७ वे तारखेस अराजनिष्ठेला प्रवर्तक असे लेख प्रकाशित केल्या बद्दल साताऱ्याचे सेशन जज्ज मिआरटन यांनीं काळेपाण्याची शिक्षा दिली. उभय गृहस्थ लोकसेवा करीत असतांना त्यांच्यावर मुंबई सरकारची एवढी इतराजी झाली हें पाहून मोठें वाईट वाटतें. ज्या राजनिष्ठेच्या पायावर ' प्रतोद ' पत्र त्यांनीं चालविलें तीच राजनिष्ठा त्यांस हा राजदंड भोगण्यास ईश्वरेच्छेनें समर्थ करील. 'प्रतोद ' पत्रकर्त्यांस सरकारांनीं आपली गर्भित अमान्यता दर्शविली असती तरी देखील त्या राजभक्तांस पुष्कळ शिक्षा झाली असती. परंतु कायद्याचें तारूं समुद्रांत जेथें बुडवील तेथें बुडलें पाहिजे आणि आह्मास असे दोन व्यवसायबंधू राजाज्ञेनें सोडून जातात ह्मणुन फार दुःख होतें. दुःखप्रदर्शन अराजनिष्ठा नाहीं असें आह्मी मानतों आणि ह्मणूनच आह्मी लेखणी उचलली आहे.

वाईस ' मोदवृत्त ' ह्मणून गेल्या सात वर्षांपासून एक साप्ताहिक पत्र निघत असतें. अलिकडे या पत्राची स्थिती उर्जित दशेला येत चालली असून त्यांतील लेखही चांगले राजमान्य असतात. या पत्राचे प्रकाशक रा. रा. काशिनाथ वामन लेले यांजवर अराजनिष्ठेचे लेख गेल्या मे व जून महिन्यांत लिहिल्या बद्दल खटला गेल्या ? ले तारखेस सुरूं झाला आणि लागलीच दोन तासांत त्यांस सेशन कमिट केलें. दुःखांत आनंद- कीं हे पत्रकार तुकारामाच्या साधूक्ती प्रमाणें आलेल्या भोगाला सादर आहेत.

या पूर्वींच राजदंडाची तलवार नामदार बाळगंगाधर टिळक यांच्या मानेवर टांगली आहे. त्यांच्या जोडीला दुसरे व्यवसायबंधु वैभवकार आहेत. नामदार टिळक यांचा खटला मुंबई हाय कोर्टा समोर आज चालणार होता. परंतु कामाच्या व्यवस्थे संबंधानें तो येत्या बुधवार पर्यंत तहकूब ठेवण्यांत आला. अराजनिष्ठा नामदार टिळक यांच्या लेखांत सरकारास आढळते तर राजनिष्ठेचे लेख कसे असतात हेंच आह्मास कळत नाहीं.

## The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 6 1897

We are extremely sorry for the sad turn the Indian affairs are taking. The prosecution of Native journalists is vigorous in the Bombay Presidency. The policy of punishing sedition in criminal courts is the last measure that a powerful and world—wide Government should take. The order of things is turned topsy turvy. That which is really the last resource is brought to the front within the intentions of the Government. A good word always evokes sympathy and good feeling while a harsh treatment provokes ill feeling and leaves a sting behind. The Government has no mutiny to face. No insurrection hovers over the Indian horizon. There is perfect calm and safety in the whole of the Indian empire. The natural calamities—we mean famine, plague and earthquake—could not and have not undermined the feeling of loyalty and affection for the British rule. The political atmosphere is also as free of clouds as it possibly can be. We do not perceive the urgency or necessity of a harsh measure on the part of the Government. There is no call for a Government prosecution. The present crisis seems eventually to be the creation of the *Anglo Indian* press. The fears of a mutiny are purely imaginary and unfounded. The hand on the dial must be turned back before we can be persuaded even to think of such a time. To check sedition through a criminal prosecution is to follow in the foot-steps of a tyrant. Such a signal step muzzles altogether the Native press. We doubt the wisdom of this policy. The dignity of a paramount power loses in the balance when the State crushes a learned editor like the Hon'ble Mr. Bal Gangadhar Tilak. Sedition spreads like a wild fire when men of honor and education are sacrificed at the altar of justice. We request the Bombay Government to withdraw the present prosecutions if it be honourable and consistent with the high prestige of the British Government. The High Court will decide the technical question of sedition or no sedition, but, before it does so, we shall preach the virtue of forgiveness to the Government because the loyalty of the Indians is proverbial. The occasion and the mental state of the writer justify writings even within the pale of the law of sedition. To rake up old articles for prosecuting Indian journalists is to dance a sorry figure. In the interests of peace and permanence of the Indian empire we hope that the law of sedition should be a sealed text amidst the amicable and loyal relations in which the Indians stand to the British throne. The main strength of the British rule resides in the loyalty of the Indians. They are loyal to the core because the present union with the rulers is the only hope for them to achieve the battles of a national life.

The Anglo--Indian indifference mars our relations to the British people. The Hindu of Madras gives a very pertinent counsel to both the English and Indian gentlemen. The remarks are as follows:—

"Good sense on both sides suggests that about that history the least should be said and written, and it is not till India becomes virtually independent like Canada and the Indians and Englishmen become wedded together politically or otherwise that no criticisms will create a misunderstanding, it is not till such a time that the history of the rise of British Indian Empire can be laid bare to the world in all the nakedness of truth and candour. Let us say nothing about Indians being a *subject race* and Englishmen their *conquerors*. Let us recognize the existing relation between the two races and so improve it as to make the raising of the political status of the Indians, steadily and gradually become more and more fit for independent power, attended by the least danger possible to the good of either. How desperate writers in the Anglo—Indian press have become is shown by the ridiculous suggestion of the *Englishman* that the Indian gentlemen that go to England on a political mission should have their mouths muzzled, or if they are permitted to speak at all, they should say nothing which is not in praise of the officials in India."

The Pioneer has also said something pertinent to the present occasion. In the light of recent events the result is that 'the Indian has become to us a lying slave and we have become to the Indian the embodiment of the Devil or *Kalazug*.' The truth is rather exaggerated in false colours in saying that the Indian is a *lying* slave. We objects to the expression *lying*. The present is the high time for us to improve. upon these unpleasant relations. The forward impulse-we mean the ambition of the educated Natives to rise to the level of the British subject is not allowed a free play. The policy of repression is the worst that a nation can pursue. Love and amity foster loyalty and devotion. Benevolence benefits the does as well as the donee. It begets gratitude. Indifference should no more be the guide of an Anglo—Indian. Mutual forgiveness and co-operative sympathies will alone pave the way to make the British Raj more permanent, glorious and prosperous.

The principal cause of the decrease in expenditure during the year is the small outlay on roads and communications which has already been explained."

"The following figures compare the financial results of the year 1895-96 with those of the preceding year:—

| | 1894-95 | 1895-96 |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| Receipts ... | 4,66,014 | 4,95,899 |
| Expenditure | 2,49,188 | 2,27,892 |
| Surplus ... | 2,16,826 | 2,68,037 |

The receipts and surplus of the year when compared with those of the preceding three years show a marked. improvement the unusually largs sales of timber, fuel, and bamboos are no doubt to be a attributed to the general prosperity of the people after the splendid cotton crop of 1895. The collections from grazing fees represent nearly half of the entire forest revenue, but it should be remembered that these fees are generally nothing more than a set-off against the free supply of forest produce. Forest Report.

## वऱ्हाड

हवामान—या सप्तकांत पाऊस नाहीं. हवा चांगली आहे तथापि थंडपणा वाटत नाहीं. वाऱ्याचा उपद्रव पुष्कळ कमी आहे. पीकें जोमांत आहेत. दुष्काळग्रस्तांस अद्याप मदत पाहिजे.

जळगांव तालुक्यांत दुष्काळासंबंधानें पाहणी करण्यासाठीं रा. रा. सी. शामराव अव्याची हे गेले आहेत.

अलिशान रेसिडेन्ट मि. ल्यौडन हे सिमल्यास जाणार होते परंतु सध्यां त्यांचा बेत तहकूब झाला.

रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई वकील यांच्या संबंधानें रायजी नांवाच्या सोनारानें प्रतिज्ञेवर सांगितलें कीं सदहू वकील यांनीं मला मुनशी अजिजुद्दीन साहेबांच्याविरूद्ध अपील करण्यासाठीं व त्यांच्या फायलावरील दुसरा मोकद्दमा काढून घेण्यासाठीं रा. रा. मोरोपंत जोशी यांस वकील करून हायकोर्टांत खटपट करण्यास सांगितलें. मि. देवीराम कोंडजी नाझर यांस वाटलें कीं ही सल्ला देणें वकिलीच्या धंद्याच्या नियमाविरुद्ध आहे. राजश्री व्यंकटराव यांनीं माजिस्ट्रेटाविरुद्ध अर्ज करविण्याचा धंदा पतकरला आहे असें सांगून नाझरांनीं रायजी सोनारास मुनशी अजिजुद्दीन यांच्या समोर दाखल केला. त्यांनीं मे. प्रिडो साहेब यांच्यासमोर सर्व मुद्देमाल उभा केला. चौकशी अंतीं मे. प्रीडो साहेब यांस सर्व गोष्ट निराधार वाटली ह्मणून त्यांनीं लागलींच सर्व प्रकरण २।९।९७ रोजीं रद्द केलें. राजश्री व्यंकटराव यांच्यातर्फें वकील रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे होते.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९६ रुपये |
| जवारी | १२६ रु० |
| गहूं ( कांठे ) | १४० रु० |
| ,,( बनशी ) | १९९ रु० |
| चणे | १३९ रु० |
| तेल | ६॥।= रु० मण |
| तूप | ८॥। मण |
| सोनें | २९!॥ तोळा |
| चांदी | ७२ |

## वर्तमानसार

रशियन लोक पामीर येथें उगीच पडून राहिलेले नसून गाड्यांच्या सडका तयार करीत आहेत असें सांगतात.

डमडम येथील सरकारी कारखान्यांत नवीं काडतुसें तयार करण्याचा झपाटा चालूं असून १ कोट काडतुसें तयार होत आहेत. हीं काडतुसें खपविणारे शिपायीं अचुक नेम मारणारे असतील तर इतक्या गोळ्यांनीं किती माणसांचा फडशा पाडतील बरें!

उपाहाराच्या गाड्या—पंजाबास जाणाऱ्या डांकेच्या गाडी बरोबर उपाहाराचे डबेही जोडण्यांत येण्याची व्यवस्था होणार आहे. ता. ११ आगष्टच्या पायोनियर वरून कळतें कीं, सदर प्रकारचे डबे हौरा ( कलकत्ता ) येथील कारखान्यांत तयार होत आहेत. ह्या प्रांतांत अशा प्रकारच्या सोयीचे डबे जोडण्याची व्यवस्था मुळींच नाहीं. सिलोनमधील रेल्वेवर मात्र अशा गाड्यांची योजना केलेली आढळते. तिकडे स्टेशनावर उपाहाराच्या कोठड्या मुळींच नाहींत. असें पाहण्यांत येते.

विषारी पक्षी—"रिचाई" नांवाचा एक विषारी पक्षी आहे. त्याचा दंश मनुष्यास झाला असता तें मनुष्य तत्काळ मरतें हा पक्षी कबुतरायेवढा असतो तो सुस्त असून तो उडाला तरी फार दूरपर्यंत उडत जात नाहीं. त्यामुळें त्याला पकडण्यास फारसे आयास पडत नाहींत. परंतु त्याला पकडल्यावर त्याणें मनुष्याला दंश केल्यास दंश झालेल्या मनुष्यास परमावधीच्या वेदना होतात; त्याचे डोळ्यांना एकदम अंधारी येऊन त्याला दिसेनासें होतें; आणि त्याचें जाभाड बसून त्याला आ करितां येत नाहीं. आणि ह्याप्रमाणें अत्यंत कष्टानें त्या दंश झालेल्या मनुष्याचा अंत होतो ! ज्ञा० च०

येत्या जानेवारी महिन्यांत एक सूर्यग्रहण येणार आहे. तें सातारा येथें चांगलें दिसणार आहे. या ग्रहणाचे वेध घेण्याकरितां, विलायत, फ्रान्स, जर्मनी, रशिया आणि जपान ह्या ठिकाणचे जोतिषी सातारा येथें येणार आहेत. साताऱ्याचे जवळपास एखादी उंच डोंगराची टेकडी ते पसंत करितील. कलकत्ता, नागपूर इकडेही सरकारी ज्योतिषी या ग्रहणाचे वेध घेतील.

उत्तरध्रुवाचा शोध लावण्याकरितां विमानांत बसून गेलेला डच आपल्या विमानासुद्धां पांढऱ्या समुद्रांत बुडाल्याची अफवा उडाली आहे.

अर्जिंटाईन राज्यांत अशी चाल आहे कीं, लग्न न केल्यास दंड भरला पाहिजे. शिवाय दुसरी एक अशी चाल आहे कीं, स्त्री असो व पुरुष असो, योग्य कारणावांचून लग्नाची मागणी नाकारली तर दुसऱ्या पक्षास ५०० रुपये दंड द्यावा लागतो !

'डेली मेल' पत्राच्या एका बातमीदारानें अशी १ विलक्षण गोष्ट लिहिली आहे कीं, आसामामध्यें २ शिकारी एका गेंड्याची शिकार करीत होते; तेव्हां तो गेंडा भूकंपानें एकाएकीं जमीन दुभागून तींत गडप झाला आणि एका शिकाऱ्याची गोळी दुसऱ्या शिकाऱ्यास लागून तो ठार झाला ! आ० व०

आफ्रीकेंत आणखी एक फार सोन्याची खाण सांपडली आहे. आणखी अशाच कांहीं खाणी सांपडल्या तर सोनें चांदीच्या भावानें विकूं लागेल.

कुर्दे लोक पर्शियन हद्दीवर सालमा येथें हल्ले करीत असून दोन आर्मेनियन खेडीं पार करून ख्रिस्ती व मुसलमान अशा २०० लोकांची कत्तल केली असें सांगतात.

दुष्काळाच्या योगानें सहा आठवड्यांपर्यंत फक्त विजापूरजिल्ह्याचे ७०,००० शेतकीचे बैल मेले असा अंदाज आहे. अशा मानानें पाहतां सर्व देशाचें यंदा शेतकीचें नुकसान किती झालें असेल बरें.

सिंधुनदीला उत्तम तऱ्हेचा पूर आल्यानें कराची येथें गहूं फार येत असून, तो बहुतेक तेथून मुंबईसच सारखा आणिला जात आहे.

अहमदाबाद येथें, लवकरच सहा गिरण्या चालू व्हावयाच्या आहेत. तेथें एक नवा आगकाड्यांचा कारखानाही निघावयाचा आहे.

विजेचे जनरथ—लंडन शहरांत घोडे लावलेले जनरथ ( क्याब्स ) चालत असत ते आतां विजेच्या योगानें चालविण्यास सर्व साधारण सुरवात झाली. आतां हे जनरथ ओढण्यास घोड्यांची जरूर राहिली नाहीं.

मि. हिंडमन याणीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याचे विरुद्ध विलायतेंत लिहिलेल्या एका लेखाचा फैलाव हिंदुस्थानांत न होऊं देण्याबद्दल हल्लीं इंग्रजी पत्रांतून चर्चा चालली असून तत्संबंधानेंच हिंदुस्थानाचा कैवार घेणारे इंडिया पत्र बंद करावें अशीही शिफारस इंग्लिशमन व पायोनियर पत्रांत आली आहे. दी० बं०

हल्लीं स्टटगार्ड येथील पशुसंग्रहालयांत असलेल्या एका वाघाचा एक डोळा काचेचा आहे. कांहीं कारणामुळें त्याचा एक डोळा फुटला होता व एका डोळ्यानें आंधळा वाघ पहाण्यांत लोकांस चांगलीशी मौज वाटेना; ह्मणून एके दिवशीं युक्तिप्रयुक्तीनें मोठ्या प्रयत्नानें त्यास कित्येक जणांनीं खालीं पाडून धरून ठेविलें. नंतर त्याचा तो फुटलेला डोळा काढून टाकिला व नवीन कृत्रिम डोळा केवढ्या आकाराचा पाहिजे त्याचें बरोबर माप घेतलें. नंतर वाघाच्या स्वाभाविक डोळ्या इतका क्रूर दिसेल असा एक कांचेचा डोळा तयार करवून तो त्या जागेंत बसविला. एक आठवड्या पर्यंत तो डोळा काढून टाकण्या करितां त्या वाघानें पुष्कळ खटपट केली, परंतु सर्व व्यर्थ. आतां त्याला त्या डोळ्याची संवय झाली आहे. त्या कृत्रिम डोळ्याच्या योगानें त्याच्या स्वाभाविक क्रूर मुद्रेंत कांहींच फरक दिसत नाहीं.

एका एडीटरनें एक सुरेख कबुतराची जोडी पाळली होती. दोघेही नर होते. त्यांना त्यानीं शिकवून इतकें तयार केलें होतें कीं, त्या कबुतरांना त्याणीं कोणतेंही काम करावयास सांगितलें तरी ते एखाद्या आज्ञाधारक चाकरा प्रमाणें करीत असत. ज्या दिवशीं वर्तमानपत्राचा मजकूर एडिटर साहेब लिहावयास बसत, तेव्हां त्यांच्या लिहिलेल्या काप्या छापखान्यांत पोहचविण्याचें काम ते आपल्या कबुतराकडून करून घेत असत. पोस्टांतून टपाल आणणें अगर तें पोंहोचविणें, चिठ्ठीचपाटी पावती करून त्याचें उत्तर आणणें वगैरे नाजूक पण मोठ्या महत्वाच्या गोष्टी तीं दोन कबुतरें अगदीं बिनबोभाट व चोख करीत. येणें करून एडिटर साहेब त्या दोन आज्ञाधारक गरीब प्राण्यावर जीव कीं प्राण करीत असत. त्यांच्या खाण्यापिण्याची, निजण्याबसण्याची एडिटर साहेब स्वतः आपल्या हातांनीं व्यवस्था करीत. या प्रमाणें थोड्या वेळांत, थोड्या श्रमांत, व थोड्या पैशांत काम करणारे विश्वासूक चाकर मिळालेले पाहून एडिटर साहेब पराकाष्ठेचा आपले ठिकाणीं आनंद मानीत असत.

ब्लँकेटें ( विलायती घोंगड्या ) आतां पुष्कळांना ठाऊक झालीं आहेत. हिंदुस्थानच्या बाजारांत त्यांचा आतां खप पुष्कळच होऊं लागला आहे. हीं ब्लँकेटें इग्लंड देशाचा तिसरा एडवर्ड याच्या कारकीर्दींत मूळ निघालीं. याच्या कारकीर्दींत ब्रिस्टल येथें तिघे भाऊ रहात असत त्यांचा धंदा लोकरीचें वीणकाम करण्याचा होता आणि त्यांचें अडनांव ब्लँकेट असें होतें. ते मोठे चांगले कारागीर होते. पुढें त्यांनीं मोठ्या श्रमानें लोकरीच्या विणून पांघरण्यासाठीं घोंगड्या तयार केल्या. व तीं वस्त्रें लोकांस फार पसंत पडून त्यांचा खपही पराकाष्टेचा होऊं लागला. कोणीं जरी त्यांचे घरीं ब्लँकेट न्यायाला आला तरी, "तें नवांन पांघरायचें कापड दे" असें ह्मणत. तेव्हां पुढें त्यांचें नांव पडतां पडतां त्या वीणणाऱ्यांच्याच नांवानें त्या वस्त्राला नांव पडलें. आणि मग लोक त्याला ब्लँकेट असें ह्मणूं लागलें.

मास्टर एडविन रॉबिन्सन या नांवाचा एक तीन वर्षांचा मुलगा बायसिकल [ दुचाकी गाडी ] वर बसायला फारच उत्कृष्ट रीतीचा शिकलेला आहे. त्याची उंची तीन फूट दोन इंच आहे. इतक्या लहान वयांत बायसिकलवर बसायला येऊं लागलेला हाच काय तो पाहिला मुलगा होय. त्या मुलाचें आणि त्या गाडीचें दोहींचें मिळून वजन पन्नास पौंडांपेक्षां जास्त नाहीं. "ब्रिटिश मेडिकल जर्नल" मध्यें नुकतेंच असें एक आर्टिकल आलें आहे कीं, "कमींत कमी सातव्या वर्षा पासून बायसिकलवर मनुष्याला बसायला येईल. परंतु हा वरील मुलगा आपल्या तिसऱ्या वर्षींच चांगला पट्टीचा बसणारा झालेला पाहून पराकाष्टेचें आश्चर्य वाटतें

हिंदुस्थानांत ज्यांचें वय १४ वर्षांपेक्षां कमी आहे असे १००,००० मुलगे व ६,२७,००० मुली ह्यांचीं लग्नें झालीं आहेत; आणि ज्यांचें वय ४ वर्षांपेक्षां कमी आहे असे ८,६०० मुलगे आणि २४००० मुली ह्यांच्या लग्नासंबंधीं त्यांच्या पालकांचे वाग्निश्चय झालेले आहेत.

उभ्या झाडाचा छापलेला कागद बनविण्यास कमींत कमी किती वेळ लागतो हें पाहण्यासाठीं एल्सेंथाल येथें एक प्रयोग करण्यांत आला. तेथील कागदाच्या गिरणीपासून जवळच असलेल्या एका अरण्यांत सकाळीं बरोबर ७ वाजून ३५ मिनिटें झालीं होतीं तेव्हां तीन झाडें तोडिलीं. नंतर तीं त्या गिरणींत आणलीं व बरोबर ९ वाजून ३४ मिनिटांनीं पहिला एक कागद तयार झाला. तो कागद तयार करण्याकरितां ह्या वरून एकंदर १ एक तास व ५९ मिनिटें लागलीं. नंतर त्यापैकीं कांहीं कागद त्या गिरणीचे मालक प्रयोग पाहण्याकरितां जमलेल्या कांहीं लोकांसह तेथून दोन मैल लांब असलेल्या छापखान्यांत छापविण्यासाठीं घेऊन गेले. बरोबर १० वाजतां ते छापवून तयार होऊन त्यांच्या हातीं आले. ह्याप्रमाणें उभ्या झाडाच्या लागवडीपासून वर्तमानपत्र तयार करण्यास २ तास व २५ मिनिटें लागलीं.

मनुष्य हवेवांचून ५ मिनिटांत मरण पावेल, झोंपेवांचून १० दिवसांत, पाण्यावांचून एका आठवड्यांत मरेल. परंतु अन्नावांचून जगणें पुष्कळशा गोष्टींवर अवलंबून असल्यामुळें त्या त्या गोष्टींच्या प्रमाणानें मनुष्य अन्नावांचून ज्यास्ती अधिक दिवसांत मरेल. क०

मि० टिळक यांच्या तर्फे कलकत्याचे बारिस्टर मि० पघ हे येणार असें आतां सांगतात. मि० जाकसन याचे कां फिसकटलें समजत नाहीं हे येणारे मि० पघ कित्येक वर्षें पार्लमेन्टांत होते व कलकत्याच्या लेगवासी खटल्यांत सरकार तर्फेचे बारिस्टर होते असें सांगतात.

टर्की व ग्रीस यांच्या दरम्यान तह करण्याचा जो विचार चालला आहे त्यांत थिसली सोडण्याच्या बाबतींत आपलें ह्मणणें अमलांत येत नसल्यास आपण इतर बड्या राजांच्या कटांतून वेगळे होणार असें जर्मनीचें ह्मणणें असल्याचें सांगतात.

इंग्लंड प्रधान लार्ड सालिसबरी हेही टर्की व ग्रीस यांच्या तहांत इतर राजांपासून वेगळे राहाणार असें दिसत असल्यामुळें तहाचें काम तसेंच पडून राहिलें आहे असें सांगतात.

पंजाबांत जास्त पाऊस पडला व शेतकी चांगली येण्याची आशा दिसूं लागली. मध्यें हिंदुस्थानांतही चांगला पाऊस पडला.

हिंदुस्थानच्या सरहद्दीवरचे लोक जे दांडगाई करण्यास तयार झाले आहेत त्यासंबंधानें लिहितांना विलायतचा स्टांडर्ड पत्रकर्ता ह्मणतो की, या बाबतींत आपला संबंध नाहीं असें जें अमिरानें अश्वासन दिलें आहे तें कबूल करावें हें चांगलें आहे आणि त्याची अडचणीची स्थिति मनांत आणतां त्याच्याशीं भांडण्यास उठणें चुकीचें आहे असें होतें. याच संबंधानें डेली न्युझ कर्ता ह्मणतो कीं, सुलतानाच्या एजन्टानें सरहद्दीवरच्या लोकांची उचल केली आहे हें ह्मणणें अगदीं वेडेपणाचें आहे. चित्रळ खालसा केल्यामुळें आपल्यावरही तसाच प्रसंग येईल या भीतीनें हे उठले आहेत हें खरें आहे. हिंदुस्थान सरकारच्या राज्यपद्धतीबद्दल यापुढें विचार करणें अगदीं जरूर आहे असेंही त्याचें ह्मणणें आहे.

१८६२ व ६५ तील जर्मनी व बेलजम यांतील तहाच्या संबंधानें विचार करतांना न्युयार्क येथील एक पत्रकर्ता ह्मणतो कीं, ज्या देशांत सर्व कांहीं पिकण्यासारखें आहे अशा एका ३०००००००० माणसांच्या वस्तीनें भरलेल्या राष्ट्राचा राज्यकारभार अप्रतिबंध व्यापार या व्यापारी तत्वानें चालू असून तें तत्व पृथ्वींतल्या इतर व्यापारी मालास लागू न करतां आपसांत मात्र लागू करण्यांत येतें आणि हा प्रकार इतिहासांत कोठेंही आढळत नाहीं; आणि त्यांतच इंग्लंडांतले राज्यकारस्थानी भूषण मानतात !

टर्कीच्या दरबारच्या बड्या राजांच्या वकिलांस अर्मेनियन लोकांनीं १८९६ सालच्या प्रमाणें एक धमकी सारखें पत्र पाठविलें आहे. ठा० अ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

# वऱ्हाडसमाचार.

Six monthly........ 3 .............. 8
Single copy .............................. 4
Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ...... 4 as
Repetition Peline.......3 as

THE BERAR SAMACHAR

YOL XXXI | AKOLA MONDAY 13 SEPTEMBER 1897 | NO 36

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख १३ माहे सप्तेंबर सन १८९७ इ० | अंक ३६



## नाशिकचा माल

चांदी, पितळ, व तांबें वगैरेचीं भांडीं उपकरणीं वगैरे सोन्याचे दागिने सुद्धां हरएक प्रकारचा माल घेऊन व्ही. पीनें पाठवूं. कमिशन रुपयास ६ पै.

पत्ता— आबाजी सीताराम मोडक
नासिक.


## नोटीस

इंदरसींग ऐदान मालक सांगवीदास नंदुलाल दुकान अकोलें यास.

महमदअली मुसाभाई व रामचंद्र वासुदेव आणि कंपनी अकोला यांज कडून देण्यांत येते कीं अकोलें येथील सर्व्हे नंबर ५ एकर ५८३७ आकार रुपये १७०४ याची जितकी जागा आहे पैकी एमप्रेस मील नागपूर याजकडेस असले जागे खेरीज बाकीची जागा आह्मी तारीख १५।७।९७ चे भाडेचिठी वरून जानु व तानु याज पासोन तारीख १।१०।९७ पासोन भाड्यानीं घेतली आहे. सांप्रत सदरील जागेंत तुमचें कांहीं काम चालूं असल्याचें कळतें या साठीं कळविलें जातें कीं तारीख १।१०।९७ पासून आह्मास आमचे मर्जी प्रमाणें व्यवस्था करणें आहे कारितां वरील मुदतशीर आह्मांस जागेचा उपयोग करतां येईल असें वर्तन व्हावें. या विरुद्ध जाल्यास आह्मी तुह्मास कोणतेच प्रकारें जबाबदार तर होणार नाहींच पण आह्मांस अडथळा आल्यास त्या संबंधानें तुह्मावर सर्व प्रकारची जबाबदारी राहील. या साठीं अगाऊं या नोटिशीनें कळविलें आहे. तारीख ८।९।९७ इसवी.

( सही )
महमदअली मुसाभाई व रामचंद्र
वासुदेव आणि कंपनी अकोलें
दस्तुर खुद्द.

## नोटीस

विठ्ठलराव बाजीराव कुळकर्णी राहणार अंजनीबुद्रुक ता० मेहकर जिल्हे बुलडाणे यास खाली सही करणार याजकडून नोटीशीचें उत्तर देण्यांत येते कीं तुमची नोटीस तारीख १९ माहे जुलै सन १८९७ इ. ची वऱ्हाडसमाचार पत्रांत दिली तिचा जबाब त्यावरून सोन्याचे दागिनें वजन तोळे १७४ एकशे चवऱ्याहात्तर ४ मासेचार ९ गुंजापांच प्रत्येक डाग नाववार वजनवार तुमचे वहीवर लिहून दिलेल्या मजकुराची नोटीस पाझें पाहण्यांत आली ती नोटीस खोटी आहे सोन्याचे दागिनें मजजवळ मुळींच दिले नसून विनाकारण खोटी नोटीस दिली आणि वहीवर लिहिल्या प्रमाणें तपशीलवार वर लिहून ठेविले आहेत तर मजजवळ कीर्दखतावणी सराफी रीति प्रमाणें मुळींच वह्या नाहींत फक्त किरकोळ धान्याचे विक्रीचे टिपण वह्या आहेत त्यापैकीं एक वही तारीख २२ माहे जून सन १८९७ इ. रोजीं माझे दुकानांतून नाहिशी झाली त्या बद्दल मी गांवचे पाटील व इतर सभ्य गृहस्थ व रा. गणपतराव नाना वकील मेहेकर येथील याना कळविले होतें. त्या वही बदल सरकार मार्फत तजवीज करावी तर वही मोठीशी महत्वाची नसून माझें त्या पासून कांहीं नफा नुकसान नसल्यामुळें पाटील यांस कळवून जास्त तजवीज केली नाहीं. मला आतां असा संशय येतो कीं ती वही तुह्मी नेली असावी तर ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांत ती वही व त्यावर आपण सोन्याचे नगांचा खोटा जमाखर्च केला आहे तो रद्द करून वही मला आणून द्यावी या प्रमाणें न केल्यास सरकार मार्फत तुमच्यावर काम चालून त्यास जो खर्च लागेल तो नोटिशीच्या खर्चासह भरून घेतला जाईल. कळावे ता० २९ माहे जुलाई सन १८९७ इसवी.

सही
गोरुराम सुरजकरण दुकान अंजनी
बुजरुक तालुके मेहकर.
दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य २ शके १८१९

गेल्या अंकीं लोकल बोर्डाकडे कोणकोणतीं नऊ कामें आहेत यांचा खुलासा केला होता. त्याच प्रकारच्या कामाकडे बोर्डाचा खजिना खर्च होत असतो. बोर्डाच्या खजिन्याला मुख्य खर्चाच्या तोंड्या दोन आहेत. एक शाळा खात्या संबंधानें आणि दुसरी पब्लिक वर्कस संबंधानें आहे. आरोग्यविषयक गोष्टीमध्यें पुष्कळ प्रकारच्या कामाचा समावेश होतो, आणि ही तिसरी खर्चाची मुख्य बाब आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा चांगला असावा ह्मणून सर्वत्र व्यवस्था मोठ्या झपाट्यानें चालूं आहेत. सर्व उत्पन्ना पैकीं शेंकडा ३० किंवा थोड्या अधिक प्रमाणानें शाळा खात्याकडे खर्च मुंबई, वायव्य प्रांत, मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतीं होतो. इतर प्रांतामध्यें शिक्षणाकडे इतका खर्च होत नाहीं. निम्में उत्पन्न पब्लिक वर्कसकडे खर्चलें जातें आणि बंगाला व असाम या प्रांतांत या शाखेकडे खर्च शेंकडा ७० प्रमाणाजवळ पोचतों.

सर्व प्रांतिक सरकारांचा अभिप्राय लोकल बोर्डाच्या संस्थेला फार अनुकूळ आहे. या संस्थे पासून लोकांचा मोठा फायदा होत आहे असें दिसतें आणि लोकांचें लक्ष्य स्थानिक कारभाराकडे विशेष लागत जाईल असा रंग दिसतो. ही संस्था लोकांस अधिक प्रिय होण्याच्या संबंधानें बंगालचे माजी लेफटेनंट गव्हरनर सर चार्लस इलियट यांनीं विलायतेस जातांना एक उत्तम सूचना केली आहे तिचा विचार इतर प्रांतिक सरकारांनीं अवश्य करावा. सर इलियट यांच्या ह्मणण्याचा भावार्थ असा कीं लोकल बोर्डाच्या द्वारानें सरकाराला लोकांच्या गरजा व उणिवी चांगल्या खुलावटीनें कळतात. कोणत्या स्थळीं कोणती गोष्ट मोठी आवश्यक आहे हें कळण्याला फारसा प्रयास पडत नाहीं. जो तो सभासद आपापल्या भागाविषयीं वाकबगार असतो आणि त्याच्या माहितीचा फायदा सुलभतेनें होतो. परंतु हल्लींच्या व्यवस्थेमध्यें एक मोठी उणीव आहे. सर्व कामें मुख्य जिल्हा बोर्डाच्या आफिसा कडून केलीं जातात आणि त्यामुळें त्या कामावर ठिकठिकाणच्या सभासदांचा अधिकार व पहाणी हीं बरोबर चालत नाहीं आणि त्या कारणानें निरनिराळ्या सभासदांचें लक्ष्य लोकल बोर्डाकडे चांगलेंसें लागत नाहीं. कोणत्याही सभासदावर जबाबदारी पडल्या शिवाय त्याला त्या सभासदपणाचा मोठासा अभिमान वाटत नाहीं. उदाहरणार्थ, तालुक्या तालुक्याचीं कामें स्वतंत्रपणानें होऊं लागलीं तर लोकांच्या हातीं अधीक अधिकार पोचतील आणि त्या मानानें ते जबाबदारीही मोठी उचलतील. सर इलियट यांच्या ह्मणण्या प्रमाणें आजच सर्वत्र व्यवस्था होऊं शकत नाहीं तथापि भावी व्यवस्थेला त्यांचा अभिप्राय एका प्रकारें चांगला मार्गदर्शक होईल.

## अबकारी खातें

या खात्याचा सन १८९६-९७ सालचा वार्षिक रिपोर्ट आह्माकडे आला आहे. त्याचा आभारपूर्वक स्वीकार करून त्यांतील महत्वाची माहिती संकलित करण्याचा आमचा विचार आहे. अबकारी खात्यांत फार निराळ्या तऱ्हेचे फेरफार होत आहेत आणि कांहीं प्रकरणा संबंधानें निराळी पद्धती अमलांत येणार आहे. मे. बुलक साहेब ह्मणतात कीं या वर्षीं ज्या सुधारणा करण्याची योजना प्रदर्शित केली आहे त्या सुधारणांनीं या खात्यांत मोठेंच स्थित्यंतर होणार आहे. भावी सुधारणेची दिशा या रिपोर्टांत चांगली स्पष्टतेनें कळविली आहे आणि त्यावरून आह्मास वाटतें कीं वऱ्हाडांतील अबकारी खातें लवकरच सुधारलेल्या इलाख्यांतील अबकारी खात्याच्या स्थितीला पोचेल. नवीन व्यवस्था अमलांत आणिल्या ह्मणजे जुन्या रुळलेल्या पद्धती पासून होणाऱ्या उत्पन्नांत थोडी बहुत कमतरता होते असा अनुभव आहे; आणि सांप्रतच्या स्थिती विषयीं देखील उत्पन्नाच्या संबंधानें तसाच अनुभव येत आहे. तशांत रिपोर्टाच्या वर्षीं दुष्काळ प्रचंड होता आणि त्या मुळें अबकारी खात्याचें उत्पन्न पुष्कळ खालावलें आहे. या वर्षांत अमलांत येणारी भिन्न पद्धती व दुष्काळ या दोन कारणामुळें अबकारी खात्याच्या उत्पन्नांत पिच्छेहाट झाली तथापि त्या पासून जितकी अनवस्था संभवनीय वाटली होती तितकी दुर्दशा न होतां या वर्षाची स्थिती एकंदरीनें असमाधानकारक नाहीं. ही गोष्ट मेजर वारन हेस्टिंग्स इनस्पेक्टर जनरल यांच्या कारकिर्दीस मोठी भूषणास्पद आहे.

देशी दारू संबंधानें सध्यां दोन क्रम चालूं आहेत. एक क्रम असा कीं सरकारी भट्टीचा कारखाना टेलिंजग बांधलेला असतो हा कारखाना भाड्यानें दारू गाळण्यासाठीं देण्यांत येतो. सरकारी भट्टी पासून देशी दारू पुरविण्याचें कंत्राट जो घेतो तो सरकारास एक ठोंकळ रक्कम देण्याचें कबूल करितो. लोकांच्या गरजे प्रमाणें तो कंत्राटदार सरकारी भट्टीवर दारू गाळतो आणि अशा गाळलेल्या दारूवर तो कांहीं संकल्पित दरानें कर भरतो. ही कराची रक्कम सरकारास देण्याच्या कबूल केलेल्या रकमे पेक्षां कमी पडली तर कंत्राटदारास आपल्या पदरच्या पैशांतून ही कमतरता भरून द्यावी लागते. सरकारी भट्टीला आमच्या जिल्ह्यांत गडंकी ह्मणतात. या यंत्रालयांतून जी दारू मिळते तिचा उत्तमपणा कसाला लावलेला असतो. या दारूचा अर्क अमूक डिग्रीचा असावा अशा विषयीं नियम आहेत. सरकारी कारखान्यांत तयार झालेली दारू त्या कारखान्याकडे सोंपविलेल्या भागांतून नेमस्त केलेल्या दुकानांत विकण्यास ठेवितात. या पद्धतीनें लोकांस दारू चांगली मिळून ती फायदेशीर पडते. एकंदर खपणाऱ्या दारूचा हिशेब बरोबर ठेवितां येतो आणि सरकारी उत्पन्नाला देखील एका प्रकारचा कायमपणा पोचतो.

देशी दारू संबंधानें दुसरा क्रम असा आहे कीं कांहीं नियामित हद्दींत दारूचीं दुकानें मुक्रर केलीं असतात. ही दुकानांची संख्या लोकांच्या गरजेच्या व जरूरीच्या मानानें ठरविली असते. देशी दारू तयार करून या दुकानांतून विकण्याचा मक्ता सरकारांतून विकला जातो. तो मक्ता घेणारानें आपल्या इच्छे प्रमाणें लागतील तितक्या भट्ट्या चालूं कराव्या, वाटेल त्या प्रतीची व कसाची दारू गाळावी आणि हव्या त्या किंमतीनें ती त्यानें विकावी. या दुसऱ्या प्रकारच्या पद्धतीनें लोकांस हा पेय पदार्थ चांगला मिळत नसे, किती दारू खपते त्याचें

मापन होत नाहीं, आणि सरकारी उत्पन्न अनियमित कारणांवर अवलंबून राहतें व तें नेहमी चंचळ राहतें.

पुढें चालू

---

वाईचे ' मोदवृत्त ' पत्राचे संपादक वे. शा. सं. रा. रा. काशिनाथ वामन लेले यांजवर अराजनिष्टेचे लेख लिहिल्या बदल मि. आस्टन सेशन जज्ज यांचा प्रकृतिस्वभाव, विचारसमुद्र, व न्यायापेक्षा हीं इसलामपूरच्या प्रतोद पत्रावरील खटल्याच्या भयंकर निकालामध्यें चांगलीं स्पष्टतेनें कळून चुकलीं होतीं. राजश्री काशिनाथपंत लेले यांस आपला खटला अशा न्यायाधीशासमोर चालावा असें वाटेना ह्मणून सेशनापुढें चौकशी चालली असतांनाच मुंबईच्या नामदार हायकोर्टास विनंती करण्यांत आली कीं सातारचे जज्जा समोर हा खटला काढून घेऊन दुसरी कडे चालविण्यांत यावा. अर्जदारतर्फे वकील नामदार रा. रा. चंदावरकर हे होते. अर्ज मंजूर होऊन मोदवृत्ताचा खटला मुंबईच्या हायकोर्टा पुढें चालावा असें ठरलें ही आनंदाची वार्ता सर्व देशभर पसरली आणि सर्वत्र लोकवृंद नामदार हायकोर्टाचे उपकार मानूं लागला. राजश्री काशिनाथपंत लेले यांनीं ' मोदवृत्त ' पत्र चांगल्या उर्जित दशेला आणिलें आहे आणि या पत्रकर्त्यांचे लेखही चांगले असतात.

---

साताऱ्याचे सेशन जज्ज मि. आस्टन हे एक शहाण्याचे कांदे आहेत. ' प्रतोद ' पत्रावरील खटल्यांत त्यांनीं जो निकाल सांगितला तो त्या शिक्षेच्या राक्षसीपणामुळें लांछनास्पद आहे असें आंग्लो-इंडियन पत्रकर्ते देखील ह्मणतात. कानडा मुलुखाच्या स्वतंत्रपणा वर्णन करून प्रतोद पत्रानें इंडियनांचा नामर्दपणा मोठ्या दुःखानें जगापुढें मांडला होता. असल्या लेखांत अराजनिष्ठेचें प्रतिबिम्ब कोठून आलें तें कळत नाहीं. ' इंडियन डेली न्यूज ' व 'मार्निंग पोष्ट ' हे दोन्ही इंग्लिश पत्रकार 'प्रतोद ' वरील खटल्याच्या निकालाला न्यायाची अप्रतिष्ठा मानतात. ज्या न्यायखात्यांत मि० आस्टन सारखो शहाणी न्यायमूर्ती आहे तें न्यायखातें कितपत चांगलें असेल हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं 'असें इंडियन डेली न्यूज ' पत्रकार ह्मणतात.

युरोपांत वर्तमान पत्रकर्त्यांचे अपराध जरा भूतदयेच्या दृष्टीनें व सौम्यपणानें लक्ष्यांत घेतात. इंडियांत देखील असाच कायदा पाहिजे. नाहीं तर, मुंबई-सरकारनें चालविलेल्या फौजदारी यज्ञांत किती वर्तमान पत्रांच्या आहूती पडतील हें कळत नाहीं. मि. आस्टन यांचा निर्णय मुंबई सरकारास लाजविणारा आहे. वर्तमान पत्र कर्त्यांस सांधी कैद असावी आणि तिची मोठी सीमा ह्मणजे दोन वर्षांची असावी. हल्लींचा कायदा सरकारास व्यक्तिमात्रा प्रमाणें समजत नाहीं आणि त्यामुळें सरकाराला बेअब्रूची फीर्याद करितां येत नाहीं. पण या कायद्याच्या दोषा बद्दल सरकारानें अराजनिष्ठेची शिक्षेचीं कलमें भराभर उठवी पालथी करावी आणि छळकारक कारस्थानें प्रजेविरुद्ध चालवावीं ही मोठी चुकीची राजपद्धती आहे.

---

## अराजनिष्ठेचा खटला

नामदार बाळ गंगाधर टिळक, ' केसरी ' व ' मराठा' पत्रांचे संपादक यांजवरील खटला मुंबईच्या हाय कोर्टामध्यें गेल्या बुधवारीं चालूं झाला. सेशन जज्ज नामदार न्यायमूर्ती स्ट्राची साहेब आहेत. सरकार तर्फे आडव्होकेट जनरल लांग, बारिस्टर म्याकफर्सन व स्ट्रांगमन हे होते. नामदार टिळका तर्फे बारिस्टर्स प्यु व डावर हे होते; व मि. बाळ यांच्या तर्फे कोणी वकील नव्हता.

सरकार तर्फे व आरोपी तर्फे पुष्कळ गृहस्थां बद्दल तक्रारी घेतल्या नंतर खालील गृहस्थांची जुरी नेमण्यांत आली:—

एच. जे. थामसन ( सर पंच ); जे. एस्र. सासून; जे. पार्टर; एच. फिप्सन; आनंदराव एन. वासुदेव; आर. बुलकंब; बाबाजी काशिनाथ; पेस्तनजी नसरवानजी वाडिआ; आणि एच. इ. प्राक्टर.

आडव्होकेट जनरल मि. लांग यांनीं केसरींतील व मराठा पत्रांतील इतर लेख जूरीच्या पुढें मांडून नामदार टिळक यांच्या लिहिण्याचा परिपाठ व उद्देश कसा अराजनिष्ट होता हें दाखविण्याचा प्रयत्न केला. नंतर मि. मिरझा अल्लीबेग यांची साक्ष सुरूं झाली. त्यांच्या फेरतपासणी पूर्वी आरोपी तर्फे केसरींतील पुष्कळ लेख पुराव्यांत दाखल करून वाचण्यांत आले. हे लेख दाखविण्याचा उद्देश हा आहे कीं शिवाजी महाराजांच्या उत्सवाची मूळ कल्पना १८८९ सालीं निघाली, पुढें लार्ड री साहेब या गोष्टीला अनुकूळ होते आणि लार्ड सांडहर्स्ट साहेबांनीं रायगडा वरील उत्सवास गेल्या सालीं परवानगी दिली होती. प्लेग कमिटीला नामदार टिळक मदत देत होते आणि सरकारच्या व्यवस्थेला लोकांस अनुकूळ करून घेत होते अशा गोष्टी दर्शविणारे लेखही वाचण्यांत आले. चौकशीच्या तिसरे दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं मि. मिरझाअल्ली बेग यांनीं उलट तपासणींत सांगितलें कीं–' नाहीं' हें क्रियाविशेषण आहे. आणि इतर मराठी शद्वांचे अर्थ सांगितले. ते शद्व असेः– दाद, गोरा, वरून खालीं दडपणें, छाटून काढा, दिलेली नाहीं; इत्यादि. नंतर बाळबोध, पुष्पवाटिका, क्रमिक पांचवे पुस्तक हीं पुस्तकें सरकारी शाळांतून चालतात आणि त्यांतील शिवाजी संबंधाचे इतर धडे असे असे आहेत असे दाखविण्यांत आलें. शेवटीं नामदार टिळक यांनीं मराठी भाषेचे व्याकरणाचे प्रश्न जूरीस चांगले समजाऊन दिले. ते ह्मणाले कीं:– ' नाहीं ' हें क्रियापद आहे आणि तिन्ही काळीं सारखेंच राहतें.

| वर्तमान | भूत | भविष्य |
|---|---|---|
| देत नाहीं | दिलें नाहीं | देणार नाहीं |
| | किंवा | |
| | दिलेलें नाहीं. | |

अशीं रूपें होतात. मराठींत वर्तमान-भूतकाळीं अकरणरूपीं रूप नाहीं पण करणरूपीं मात्र आहे.

---

शनिवार ( तारीख ११ सप्टेंबर ) रोजीं नामदार न्यायमूर्ती यांनीं कळविलें कीं मराठी पंडितास साक्षीस बोलावण्याची जरूरी दिसत नाहीं. आडव्होकेट लांग हे फिर्यादी तर्फे संभाषण करण्यास उठले. आरोपी तर्फे पुरावा देण्याची इच्छा नाहीं असें बॅरिस्टर प्यु यांनीं कळविलें आहे त्या अर्थी झालेल्या पुराव्यावर फिर्यादीतर्फे सर्व खटला जूरीपुढें मांडण्यास मि. लांग यांनीं प्रारंभ केला. त्यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दे येणें प्रमाणें:—

(१) मुंबईत केसरीचे अंक वर्गणीदारांस वाटले जात होते त्या अर्थीं या कोर्टास अधिकार पोंचतो. पुण्यापेक्षां मुंबईची हवा सध्यां अधिक शांत आहे.

(२) मि. बाळ हा म्यानेजरचें काम करीत होता ह्मणून तो प्रिंटर या नात्यानें कायद्यानें अपराधी आहे.

(३) सरकारला अडथळा करावा व सरकारला झुगारून बोंब असा हेतु फिर्यादींतील लेखांत होता. नामदार टिळक युनिव्हर्सिटीचे ग्राज्युएट, फेलो, लेजिस्लेटिव मेंबर असून हिंदु समाजांत प्रमुख आहेत.

(४) केसरींतील लेख लोकांसाठीं आहेत. हल्लींच ७००० वर प्रती खपतात.

( ५ ) इतर लेख ध्यानांत घेतां असें दिसतें कीं आरोपीनें शिवजयंतीचा फायदा घेऊन सरकारा विरुद्ध लोकांचीं मनें बिथरण्या सारखे लेख लिहिले.

( ६ ) म्लेंच्छांस हिंदुपदपातशाहीचें ताम्रपट परमेश्वरानें दिलेलें नाहीं हें वाक्य ब्रिटिश सरकाराला उद्देशून आहे. भाषांतराच्या तक्रारी पोकळ आहेत.

त्या नंतर बारिस्टर प्यु यांनीं आरोपी तर्फे संभाषण केलें. त्यांत ते ह्मणाले कीं:—

(अ) मि. रांड व लेफ. एअर्स्ट यांचा खून झाला नसता तर ही फिर्यादच आली नसती पार्लमेंटांत कांहीं प्रश्न विचारले होते. ह्मणून विलायत सरकारानें हा डाव काढला.

( ब ) लार्ड रे साहेबांच्या वेळे पूर्वीच शिवजयंतीचा उगम आहे. नामदार टिळकांची राजभक्ती सांगितली.

( क ) शिवाजी संबंधाचे, अस्वल समजून बाईला मारणाऱ्या फ्यागन विषयीं, गोवधा विषयीं वगैरे लेख टिकाविषयक होते आणि तशी टीका करणें यथान्याय आहे.

संध्यांकाळचे पांच वाजे पर्यंत संभाषण चाललें होतें. हा खटला सोमवार पर्यंत तहकूब राहिला.

---

मुंबईच्या प्लेग कमिटीनें जनरल क्याटेगर यांच्या अध्यक्षते खालीं फार नामी काम केलें. पण पुण्याची प्लेग कमिटी तिच्या लष्करी कवाईती मुळें लोकांस त्रासदायक झाली. हा भेद परिणामा संबंधानें झाला. असा फरक पडण्याचें कारण पुण्यास लोकमताची झालेली पायमल्ली होय. दांडगा अंमल सहसा फलदायक होत नाहीं आणि हीच गोष्ट पुण्याच्या प्लेग कमिटीनें शिकविली. प्रोफेसर गोखले यांच्या माफीवर हुराळलेल्या मुंबई सरकारानें पंडिता रमाबाई सारख्या विश्वसनीय माणसांच्या अनुभविक अभिप्रायाला वाक्प्रहारा खालीं चिरडून टाकलें. पण सत्य दडपून दडपलें जात नाहीं किंवा तें छाटून छाटतां येत नाहीं.

पंडिता रमाबाई मोठ्या करारी, निस्पृही, व सत्यभक्त दिसतात. त्यांनीं लार्ड सांडहर्स्ट यांच्या उतावळ्या बोलाला न जुमानता सत्य जगापुढें मांडण्याची प्रतिज्ञा केली आहे. पुण्याच्या हास्पिटलांत जो अमानुष छळ होत असे त्याला उद्देशून या बाई ह्मणतात कीं मजवर प्लेग आली तर मी जंगलांत जाऊन एका खंदकांत लपून बसेन ह्मणजे प्लेग-डाक्टराच्या हातून मरणप्राय अप्रतिष्ठा होणार नाहीं. या अप्रतिष्ठे पेक्षां प्लेग पुष्कळ चांगली. पूर्वात्य लोक खरेखोटेपणाचा पुरावा न पाहतां वाटेल तीं विधानें करितात असें ह्मणतात पण मला वाटतें कीं गव्हरनर सारखे पाश्चिमात्य लोकही निराधार विधानें करितात.

पुणें वैभव व मोदवृत्त यांच्या खटल्यांत पुण्याच्या प्लेग संबंधी पुष्कळ गोष्टी उजेडांत येतील असा अंदाज आहे तेव्हां सध्यां पंडिता रमाबाईच्या बाणीदार सत्यनिष्ठेला पाहून आह्मी अशी इच्छा करितों कीं पुष्कळ सत्यप्रतिज्ञ लोक अशा संकटंवेळीं उजेडांत येतील.

---

सरदार नातू उभयतां तुरुंगांत दिवस कंठीत आहेत. त्यांच्या मुक्ततेची आशा संध्यां फार दूर आहे. ही गोष्ट जुन्या नष्टप्राय कायद्या खालीं कायदेशीर ठरली आहे. या गोष्टीला उद्देशून नामदार सुरेंद्रनाथ बानरजी हुगळी येथें एका मानपत्राच्या समारंभाच्या वेळीं बोलले कीं जर एका एका जुनाट अमान्य कायद्याच्या जोरावर क्षणमात्रांत माणसाच्या मागें खऱ्या कारणाविषयीं एक शब्द न सांगतां आह्मास कैद करणें शक्य आहे. आमची जिनगी जप्त होते तर मग ब्रिटिश प्रजेच्या हक्काची पोकळ प्रौढी कोठें अस्तास जाते बरें ! बाबू सुरेंद्रनाथ यांनीं पुढें असाही उपदेश केला कीं आपण चळवळ केली पाहिजे, प्रयत्नाची कांस सोडतां कामा नये. व दीर्घ परिश्रम करून कायद्याच्या पुस्तकांतून वरील कायदा काढून टाकविला पाहिजे. उभयतां सरदार बंधूंच्या कैदेनें सरकारच्या राजनीतीला कालिमा लागला आहे असें ' हिंदु ' पत्रकार निर्भयतेनें ह्मणतात.

---

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 13 1897

### TAPPING

How is saccharine juice extracted? Every one knows the date tree in the Eastern Bengal is tapped and the palms are made to yield it. A bad tapper in his overeagerness to secure more than the tree can yield often hurts and eventually destroys the useful tree. Under a skilful tapper the tree is never injured and never weaker. The example furnished by a modest palm tree the humblest of vegetable creations is highly suggestive in itself and we are anxious it were made a practical lesson at least by those whom it has pleased God to elect to rule our destinies.

There can hardy be any doubt, that the relations brought out between the two nations, separated from each other by an inconceivably great distance and differing from each other in every minute detail of character, race, language and religion or in fact every tie that can tack two people together,

are essential to the prosperity of both. To the dominant nation, the weak one held in fee to her, is an exceedingly valuable property. The growth of commercial England after the in—dependence of the Colonies more than a century ago is principally due to the new and brilliant acquisitions of the English generals and statemen in the East. A vast market was opened to English industries. To India, England is essential for her luxuries, comforts, and refinement in additions to the often professed blessings of security of property and person and freedom from racial anarchy. To England She is equally essential for her industries manufactures and necessaries of life in addition to an enviable and lucrative employment she affords to the children of that soil. It is evident India is an exceedingly valuable property to England. It is also evident England is an exceedingly benevolent guardian for India. But at any rate every lover of India is aggrieved to find that this state of things which ought to be clear to every owner of this vast Empire has been lost sight of. The most advanced among the Indians are looked upon with distrust. Their habits, character, nature, and every thing which makes them what they are are being scrutinised with an adverse spirit of criticism. The adage every thing appears yellow to the jaundiced's eye is at no time better illustrated than at this. When there are convulsive movements it is necessary they must be checked by violent spasmodic actions. But to imagine a certain state of things, then to infer its existence and then to deal with persons on the notions formulated out of bare imagination and to charge men with the practical consequences of their doctrines is mere persecution. A persecution under the garb of justice is even more objectionable than a persecution under overt political motives. For the last twenty years there have been indications of general unrest and disquiet on one side; open contempt, overt disdain, and lurking distrust on the other.

This unsatisfactory state of things injurious alike to the ruling race and to the abjectly slavish race has its origin in the over—tapping to which the latter race has been subjected. No one can deny England's right to demand and India's right to pay for the trouble she takes in governing the country. But we only ask if the country has not been tapped beyond its endurance. Has not England herself been awakened to its sense of responsibility when it is probably, too late? Is it not a pity that the entire body of the democrats in England who met at St. James Hall at the begining of this year should have gone so far as to say that England was going to "make a common purse with 300 million Indian paupers and weighed down by her mill—stone of Indian Empire." The people of India are also saying the same thing. Efforts have been made at different places by different Anglo Indians who have profited by India's subjection to prove India has grown richer and is materially improving every day. The present famine will for ever clear the misty delusion and impose silence on all theorists of the Golden Egg. It is indeed painful, the clearing of this delusion and the removal of the deception should ever have taken place. An agreeable delusion and an ultimate prosperity of the people and confirmation of the theories propagated, for proving the coutrary would all have been desired. But boon Nature said:—let me at least teach the rulers to what abject pit India has fallen. If the famine has materially crippled us for many years to come, it has at least made one thing clear to the whole world- a number of hidden secrets. The resources of the country have been so completely exhausted and drained that the people are not able to face a single year of distress out of the nineteen years of comparative plenty and cheer. The Indian Government is likewise so impoverished that, inspite a sacred fund reserved by a keen statesman of exceptional foresight ever since the year 1878, and by his wise ministers, it had to appeal to the mercy of the Paramount power and that of other civilized, enlightened, humane and philanthropic powers. The Government grappled with these difficulties as best as it could and we certainly congratulate ourselves on having such a humane and kind Government. But the question naturally arises why should the resources of the country have been in such a tremendously frightful condition? Why should the people themselves have not been able to face one single year's scarcity? The Hon'ble Sir John Woodburn at the late discussion on this year's Financial Statement in the Imperirl Council prided himself on saying that the task limit on the Relief Works was heavy to prevent the diversion of private labour to Famine labour. The view is certainly sound. We cannot pretend to be wiser than statesmen of Sir John's and James' acumen. But a question suggests itself, nay forces itself violently on every thinking mind "why should over one thirtieth of our population have been driven to a labour so hard, so uncongenial, and so disadvantageous?" The answer is obvious. We have [illegible] tapped. There is [illegible] in our pockets after [illegible]ty subsistence year after year on the dull agricultural avocation. Neither the democrats of England nor the people of India have any ulterior object of their own in entering a protest against this over—tapping of the country. The best interests of England require that India should be kept at least in tolerable health, if not prosperous, both for the good of the ruler and that of the ruled. The cause of the present discontents being not rightly understood a wrong effort is made on gagging honest, sincere, and earnest criticism. The remedy is like applying a blister on the toe when there is distemper on the neck. A frenzy for persecutions and an overt contempt of a friendly native actuated with no desire other than that of extricating the people or their rulers out of difficulties will not only do no good but will shake the confidence of the masses in the stubborn sense of justice of our rulers. We are indeed extremely sorry for these prognosticaticns of a general spirit of distrust and we devoutly pray such a result may never come out.

( to be continued )

---

It is a well known fact that witnesses perjure in almost all cases that come before courts. The Judicial Commissioner had therefore issued a Circular to all criminal Courts in the province to send up to him every case of perjury as soon after its decision as possible. The system continued for some time and brought about beneficial results in as much as the Judicial Commissioner's views in each case were expressed for the edification of courts. The Courts in the Akola Districts have at least, under the scrutinising eye of our able Deputy Commissioner Mr F W. A. Prideaux, been diligent to find out and expose perjury whenever it was committed. This has a very deterrent effect on lying perjurers. An unfortunate case of perjury has been exposed by Mr. Sheikh Ismail, Civil Judge, Akola and forwarded to the District Magistrate. The accused is Mr. Bebarilal Bhagulal a rich sowkar of this place.

We commend the zeal of our impartial and pains-taking Deputy Commissioner Mr Prideaux in punishing perjury and hope that he will continue to do so until perjury has been stamped out of this district.

---

## वऱ्हाड

हवामान—पावसानें सर्वत्र आनंद करून सोडला. या आठवड्यांतील पाऊस पीकांस अमृतवृष्टी प्रमाणें झाला. यंदा पीकें सर्वोत्तम आहेत. रोगराई कमी कमी होत चालली आ, हे. अद्याप बाजारभाव तेजीचेच आहेत.

मे. प्रीडो साहेबांनीं एका लबाड शिकारीस मुद्देमालासह पकडला आहे. लांडगे मारून कातडे सरकारांत आणणाऱ्यास १० रुपये बक्षीस मिळतें. मग तें कातडें रद्द करण्यांत येऊन बाजारांत लिलावानें विकतात. रद्द केलेलें कातडें विकत घेऊन तें बरोबर शिवून त्यावर पुन्हा पुन्हा बक्षीस मिळविण्यास एक तोतया शिकारी सोकावला होता. अखेरीस हें पाप उजेडांत आलें!

वऱ्हाडच्या बाराही मुनसिपालिट्यांस जनन मरणाच्या नोंदणीचे नियम लागू केले आहेत आणि त्या अन्वयें जनन मरण मुनसिपल आफिसांत ७२ तासांच्या अवधींत कळविण्याची जबाबदारी प्रत्येक कर्त्या मनुष्यावर आहे. जो चुकेल त्यास ५ रुपये दंड होईल.

खालील पोलीस ठाणीं पोलीस स्टेशन वर्ग २ मध्यें मोडत होतीं तीं या पुढें तशीं मानलीं जाऊं नयेतः—

वाशिम जिल्हा.

१ सिलोना, २ सेलू, ३ भोवानी, ४ पार्डी.

बुलढाणा जिल्हा.

१ बोथा, २ महारखेड, ३ धाटबोरी.

वणी जिल्हा.

१ कोसदाणी २ बेरि, ३ आरणी, ४ काप, ५ पुनवत.

लेफटेनंट हेग साहेब यांची बदली कडकत्यास झाल्यामुळें त्यांच्या जागेची बढती येणेंप्रमाणें दिली आहेः—

| नांव | बढतीचा हुद्दा |
|---|---|
| क्याप्टन माडिट | डेपुटी कमिशनर वर्ग ३. |
| लेफ० मॉरिस स्पेशल असि. कमिशनर. | |
| मुनशी अजिझुद्दीन | आसि० कमिशनर वर्ग १. |

---


## जाहिरात

किंमत ।= केसरीकर्ते सहा आणे

**ना० टिळक.**

पृष्ठें ८० ह्यांचें चरित्र कागद ग्लेझ

पत्ताः— के. बा. सहस्त्रबुद्धे.

गिरगांव मुंबई.


---

नोटीस

रा. एकोजी वल्लद नवलाजी काळे व कुकाजी वल्लद नवलाजी काळे व किटकुल्या उर्फ श्रावण वल्लद नरसाजी काळे आज्ञान पालकरणार मातोश्री भागाई मर्द नरसाजी काळे वस्ती मालवड तालुके बाळापूर यांस.

हेमराज ग्यानचंद मारवाडी दुकान लोणाग्र तालुके अकोलें यांज कडून— नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी सर्वजण मिळून हिंदुधर्मशास्त्रा प्रमाणें समाईक हिंदु कुटुंब आह्मां तुह्मां सर्वां करितां व सर्वांच्या तर्फें व सर्वांचा कारभारी या नात्यानें एकोजी वल्लद नवलाजी याणी सर्व कुटुंबाचे फायद्या करितां दोन शेरी मापची जवारी ७।३॥ सात खंडी पावणेनऊ मण व गहू ।२ सात मण व जवस ८२। पायली असें धान्या बद्दल हिशेब करून वहीवर टिकीट लाऊन दिलें माल हंगामावर तोंडी देण्याचे कबूल केलें त्या प्रमाणें दिलें नाहीं. शिवाय तुमचे सर्व कुटुंबाचे फायद्याकरितां तुमचे सर्व कुटुंबाचे कारभारी या नात्यानें एकोजी वल्लद नवलाजी व कुकाजी वल्लद नवलाजी या दोघांनीं मिळून आमचे दुकानावरून कर्ज काढलें. व त्याजबद्दल उभयतांनीं आपल्या सहीचा पुर्जा करून दिला तेही रुपये दिले नाहीं सबब या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत बाजारभाव प्रमाणें ह्मणजे जवारी दरखंडीस रुपये ६० व गहू दर खंडीस रुपये ८० व जवस दर खंडीस रुपये ५० या प्रमाणें मालाचे दाम व रोख्याचे रुपये व्याजासह आणून देऊन पावती घ्यावी तसें न केल्यास रीतीप्रमाणें फिर्याद करून खर्चासुद्धां घेण्यांत येईल व या नोटीशीचा खर्च द्यावा लागेल कळावें, तारीख ११।९।९७ इसवी.

( सही )

हेमराज ग्यानचंद शेट दुकान लोनाग्र तालुके आकोला दस्तुर खुद्द.

---

नोटीस

नोटीस घेणारी लक्षुमण वल्लद सिवरामजी सइतवाड राहणार शहर अकोलें यास.

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मी तुमचे पाशीं नांदणी झाल्यावर कांहीं दिवस राहिले पुढें तुह्मी मजला माहेरीं धाडल्या नंतर मी स्वतः एकवेळ व माझा बाप एक दोन वेळ आले असतां मजला न ठेवितां परत वाटेस लाविलें पुढें पंचाईत होऊन पंचांनींही मजला ठेवण्यास तुजला सांगितलें असतां तूं ठेविलें नाहींस. या मुळें मी आपले आईबापाचे घरीं राहत आहे परंतु माझे आईबाप गरीब असल्या मुळें मी लोकांचें कर्ज काढून आपला निर्वाह केला हल्लीं मजला खावटी बद्दल लोकांचें कर्ज रुपये ५० पन्नास झाले आहेत ते रुपये देऊन मजला घेऊन जावें ह्या प्रमाणें पंधरा दिवसांत न केल्यास नोटीस हीच फारकत समजून दुसरें गंधर्व करीन कळावें तारीख ७ माहे सपटेंबर सन १८९७ इसवी.

सहीची निशाणी— तानी मर्द लक्ष्मण सइतवाड रहणार हल्लीं शिवर इथे हातची बांगडी असे.

---

## वर्तमानसार

अलीकडे प्लेग ह्या भयंकर रोगाची सांथ कित्येक जिल्ह्यांतून वाढत चालली आहे. व त्यामुळें पुन्हा लोकांस जबरदस्त चिंता उत्पन्न झाली आहे. गेल्या शुक्रवारपर्यंतच्या आठवड्याचा जो सरकारि रिपोर्ट बाहेर पडला आहे त्यावरून असें समजतें कीं, ह्या आठवड्यांत पुणें जिल्ह्यांत २९१ लोक लागले व २४१ मरण पावले, सातारा जिल्ह्यांत ३९८ लागले व २६९ मरण पावले नाशीक जिल्ह्यांत २७ लागले व १७ मरण पावले, सुरत जिल्ह्यांत ३४ लागले व ९ मरण पावले, ठाणे जिल्ह्यांत १२ लागले व ११ मेले, कच्छ ७८ लागले व ९१ मेले. पालनपूर ११ लागले ४ मरण पावले होते. मुंबई, पुणें व कराची येथील मरणसंख्येचें प्रमाण पुष्कळ वाढतेंच आहे. पुण्याचे आसपास, सुरत शहरांत व सातारा जिल्ह्यांत सांथीच्या रोगाचा जोर पुष्कळ वाढता असल्यामुळें सरकाराकडून प्लेग निवारणार्थ तिकडें सक्तीचे उपाय घेण्यांत येत आहेत. मुंबईससुद्धां ह्या भयंकर सांथीस रोजचे पांच सहा बळी पडूं लागले आहेत! व त्यामुळें सर्वत्र पुन्हां जबरदस्त काळजी वाटूं लागली आहे; कालरा व दुष्काळ या दोन्हि संकटांनीं लोकांस गांजून सोडलेलें आहेच, तशांत ह्या नरम पडलेल्या सांथीनें पुन्हा जोर केलेला पाहून मोठी भीति वाटूं लागली आहे.

अतिवृष्टीमुळें ब्केटांच्या शेजारीं रेल्वेच बराच रस्ता वाहून गेला.

हैद्राबादेजवळ पाटलुरास पावसानें १ घर पडून त्या खालीं ७ मनुष्यें सांपडून मेलीं.

चायनीज ईस्टर्न रेलवेच्या सुरवातीच्या कामाचा मुहूर्त स्टेनिल्झ येथें करण्यांत आला.

ठाणे व कल्याण येथें कालरा व सांथ यांचा पुन्हा उद्भव झाला असून कल्याण येथें घरतपासणींही चालू झाली आहे.

सांप्रतचे हिंदुस्थानचे कमांडर-इन्-चीफ यांचे जागीं बहुधा सर वुइलियम लॉकहार्ट यांचीच नेमणूक होईल अशी बातमी आहे.

हिंदुस्थानांतील दुष्काळ फंडाची रक्कम आज मित्तीस १६०३१७६० रुपये जमली आहे. रक्कम बरीच आहे पण तिचा योग्य उपयोग केव्हां होणार ?

बंगाल इलाख्यांत शेतकरी रयतेस शेतकीसाठीं कर्जाऊ रकम देण्यासाठीं नऊ लक्ष रुपयांची मंजुरी देण्यांत आली होती, परंतु आतां आणखी जास्त ९ लक्ष रुपयांची मंजुरी देण्यांत आली आहे.

बगीरहत्त तालुक्यांत खुलना या गांवीं मुसलमान बदमाशांनीं दिवसाढवळ्या बायका उचलून नेण्याचा क्रम चालविला आहे. नुकतीच एक पंधरा वर्षांची मुलगी या बदमाषांनीं नेली व आपली मनीषा तृप्त केली. तिच्या नवऱ्यानें पोलिसाला वर्दी दिली व पोलिसांनीं लागलींच या मंडळींपैकीं एक मुख्य व त्याच्या साथीदारांस पकडलें. झाडत्यांअंतीं बराच चोरीचा माल या लोकांच्या घरांत सांपडली. विशेष आश्चर्याची व हास्यास्पदाची गोष्ट ही कीं, सदर मुलगी पळविण्याचे कामांत ते दोषमुक्त करण्यांत आले.

स० व्रि०

### ग्लाडस्टन साहेबांचा तरुणांस उपदेश.

"तरुण मित्रांनें, आपलें या जगांत काय काम आहे, आपल्या हातून काय होणार आहे, असें कधीं ह्मणूं नका. बाबांनों तुमच्यापैकीं प्रत्येकाला कांहींना कांहीं तरी या जगांत कर्तव्य आहे. या पृथ्वीवर तुमची जागा, तुमचें कार्य अगदी नेमलेलें आहे मात्र ती जागा कोणची, आणि तें कार्य कोणचें, हें तुमचे तुह्मीच स्वतः शोधून काढलें पाहिजे. जे असें ह्मणतात कीं, जो जिंकील त्यानेंच मिळविली बाकिच्यांत कांहीं अर्थ नाहीं, त्यांच्या बोलण्यावर तुह्मी विश्वास ठेवूं नका. उगीच अचानक कांहीं अनुकूल गोष्ट घडून जर एखाद्याला कोणच्या गोष्टींत कांहीं सिद्धी आली तर त्या सिद्धीपासून फायदा होण्याच्या ऐवजीं पुष्कळवेळां तोटा होतो, सहजी जय मिळविणाराचे डोळे फाटतात. त्यांना धुंदी चढते आणि आपण काय करूं आणि काय नाहीं असें त्यांस होऊन जातें. असें होणें त्यांच्या भावी उद्योगांस फार विघातक आहे. पण प्रयत्न,- प्रामाणिकपणानें, नम्रपणानें, धैर्यानें केलेला प्रयत्न- हा कोणत्याही कार्यांत सिद्धी मिळविण्यास इतकें उत्तम साधन आहे कीं त्याच्या पासून अन्य तऱ्हेनेंही फारच फायदा असतो. तुमच्या पैकीं जितक्यांना ज्ञान मिळविण्याची संधि सांपडेल तितक्यांनीं तें अवश्य मिळवावें. जें काय करायचें असेल तें अगदीं पक्कें नेटानें करावें. अपुरें अर्धवट असें ठेवूं नये, आणि हें एक ध्यानांत नेहमी बाळगावें कीं अज्ञानामुळें झालेली चुकी पुरवली, पण रिकामी आव घालणें ह्मणजे केवळ निंद्य होय. तेव्हां, नाहीं तर नाहीं ह्मणावें, पण खोटाच दिमाख कधीं दाखवूं नये. दृढनिश्चय धरावा आणि त्याचा उपयोग करावा. शरीर दृढ ठेवावें आणि त्याच्या दृढतेचा लोकांस चांगला उपयोग होईल अशा कामीं तें झिजवावें. आपल्या श्रमांचा झोंक नेहमीं पुढें असावा आणि मनांतला हेतु उदात्त असावा. ह्मणजे कधीं कोणाचें सुद्धां भय बाळगण्याचें कारण रहात नाहीं. अशा तऱ्हेनें राहिल्यास परमेश्वर तुमचीं संकटें दूर करील, तुमचें ज्ञान वाढवील आणि जें जें कांहीं हातीं घ्याल त्यांत त्यांत तुह्माला यश देईल.

थोड्या दिवसांपूर्वीं इंग्लंडांतील एका वर्तमानपत्रानें "गृह ह्मणजे काय?" या प्रश्नाला जो उत्तम उत्तर पाठवील, त्यास बक्षीस देण्याचें योजिलें होतें. अर्थातच त्या बक्षिसाच्या आशेनें ज्याला ह्मणून जें उत्तर सुचलें, तें त्यानें पाठविलें. त्यांतलीं कांहीं शेलकी खालीं उतरून घेतलीं आहेत.:—

संसारवृक्षाचें गृह हें फूल आहे आणि स्वर्गप्राप्ति हें फळ. ज्यांत कलहाचें वारें नाहीं आणि प्रेमाचें भरतें सदैव आहे तें गृह.

गृह ह्मणजे एक कोंदण असून त्यांत माता हें अद्वितीय रत्न होय.

गृह ह्मणजे ती जागा कीं, जेथें आपल्या अवगुणावर पांघरून पडून गुणांचें मात्र चीज होतें.

गृह ह्मणजे अशी जागा कीं, जेथें कधीं कधीं जगाच्या दृष्टीनें मोठे ते अगदीं यत्किंचित् लहान दिसतात, आणि जगाच्या दृष्टीनें यःकश्चित् ते बहुशः मोठे ह्मणून मिरवितात.

गृह ह्मणजे बापाचें राज्य, मुलांचा स्वर्ग आणि आईचें विश्व.

गृह ह्मणजे असें स्थान कीं, जेथें तुमची व्यवस्था उत्तम असते, पण तुमची कुरकुरही फार असते.

इंग्लंडचा राजा पहिला जार्ज, हा राज्यपदारूढ होऊन थोडे दिवस झाल्यावर आपल्या दरबारची कित्येक खाशी मंडळी बरोबर घेऊन शिकारीस गेला. सावजाचा माग काढीत काढीत जात असतां या दरबार मंडळीला एका सद्गृहस्थाच्या शेतवाडीमधून जाण्याचा प्रसंग आला. पण त्याच वेळेस सहजी तो गृहस्थ हवा खाण्यास बाहेर निघाला होता. तो एकदम थेट राजापुढें गेला व क्रुद्धस्वरानें त्याला हटकून ह्मणतो, 'थांबा, महाराज, पुढें जाऊं नका, इकडून मुळींच रस्ता नाहीं.' त्या शिकारप्रिय राजाला असली भाषणसरणी अगदीं अपरिचित होती. लगेंच त्यानें त्या गृहस्थास, 'मी कोण, हे आपण जाणता काय ?' असा प्रश्न केला. त्यानें न चपापतां चटकन उत्तर केलें. 'होय, आपण इंग्लंडचे राजे आहांत हें मला ठाऊक आहे; परंतु माझ्या दौलतीचा मीही पण राजा आहे.' यावर मोठ्या आनंदी मुद्रेनें हर्षातिशयाच्या टाळ्यांप्रमाणें लगामाच्या वादीवर हात आपटून त्यास शोभविणाऱ्या मनाच्या मोकळेपणानें व मोठ्या समयोचित प्रसंगावधानानें, राजा पुढील शब्द उद्गारला 'तर मग साऱ्या जगांत मीच काय तो अतिशय मोठा व खरा सार्वभौम राजा आहे! कारण दुसरे सगळे राजे गुलामावर राज्य करितात, पण मीं तुमच्यासारख्या राजांचा राजा आहे!!" या उत्तरानें त्या गृहस्थास आपला मोठा आदर केल्यासारखें वाटलें व तत्क्षणींच राजाशीं स्वतः केलेल्या उद्धटपणाबद्दल कांहीं लाज वाटून त्यानें लवून नम्रतेनें राजाला मुजरा केला, व सरकारस्वारीला शिकारी मंडळीस जाऊन मिळण्यास तेथून जाऊं दिलें.

गृह ह्मणजे जगाच्या काळज्या आणि त्रास यांच्या पासून कांहीं वेळ तरी आपलें रक्षण होण्यासाठीं तयार असलेली निवाऱ्याची जागा.

क. म.

जोधपूरचा राजा प्रतापसिंह हा ज्युबिली करितां विलायतेस गेला होता. तेथें सुमारें तीन महिने राहिल्यानंतर तो परवां मुंबईस परत आला. मुंबईच्या मारवाडी आणि मुसलमान लोकांनीं त्यास मोठा थाट करून पानसुपारी केली. ज्या मारवाड्यांचा मारवाडाशीं व्यापार आहे, ते मारवाडी या सभेंत होते. मुसलमान लोकही मुद्दाम निवडून या सभेंत बोलाविले होते. प्रतापसिंह यांचे गळ्यांत लोकांनीं फुलांच्या माळा इतक्या घातल्या कीं, त्याखालीं त्यांचें तोंड झांकून गेलें. नंतर रुपयांनीं भरलेलीं ताटें लोकांनीं त्यास नजर केली. त्या ताटांस हात लावून राजे साहेब यांनीं ताटें परत केलीं. नंतर टाईम्स आफ इंडिया पत्राचा रिपोर्टर त्यांचे रहाते बंगाल्यावर त्यांचे भेटीकरितां गेला. त्यानें पहिला प्रश्न राजेसाहेबास विचारला कीं, ज्युबिली पाहून तुह्मास काय वाटलें. राजेसाहेबांनीं सांगितलें कीं, थाट मोठा अवर्णनीय होता. तो वर्णन करण्यास शंभर जिव्हा पुऱ्या होणार नाहींत. तेथील लोकांनीं फारच प्रीति व ममता दाखविली. त्यामुळें मला असें वाटलें कीं, मी आपल्या घरींच आहे. मारवाड आणि विलायत येथें जें मला सुख वाटलें तसें सुख इतर देशांत मिळणार नाहीं असें जाणून मी दुसरे देश पहावयास गेलों नाहीं मला जास्त दिवस राहण्याची परवानगी नव्हती. नाहीं तर ७-७ महिने मी विलायतेस राहिलों असतों. सर्व राजांपेक्षां या प्रसंगीं जोधपूरच्या राजास विलायतेंत अधिक मान दिला होता. नंतर मुंबईहून लागलीच राजेसाहेब जोधपुराकडे रवाना झाले.

डोव्हेरच्या सामुद्रधुनीजवळून जर्मनीनें चिठ्या बांधून शेंपन्नास खबुतरें उडवून पाहिलीं. तीं नेमलेल्या ठिकाणीं जर्मनींत परत आलीं. सारींच खबुतरें परत आलीं नाहींत. परंतु बहुतेक आलीं. त्यांस संवय होण्याकरितां नेहमी पुढें त्या ठिकाणाहून जर्मनी खबुतरें उडविणार असें ह्मणतात. या गोष्टीवरून विलायतेंत मोठी एकदम गरबड उडाली. जर्मनीचा इंग्लंडावर स्वारी करण्याचा जो विचार आहे, त्याचें हें पूर्व चिन्ह होय, असें ह्मणतात.

आ० व०

उंच मनुष्यांत बुद्धी कमी असते, ठेंगणी माणसें दुष्टबुद्धी असतात; उंच स्त्री दुर्वर्तनीय असते आणि ठेंगणी स्त्री त्रासदायक असते. पुरुषांनीं लहान बायकांशीं लग्न करावें हें चांगलें, कारण तशा लहान बायका विशेष चांगल्या असतात. तसेंच लठ्ठ पुरुष शांत स्वाभावाचे असतात. वाकडमाने तामसी असतात. दाढी नसणारे निखाडू लोक मूर्ख असतात. दाढीवाल्या नायका शहाण्या व दुष्ट स्वभावाच्या असतात. तांबुस रंगाच्या केसांची माणसें दुष्ट असतात. लांब केसांच्या बायका वेडगळ असतात. केसाळ पुरुष बुद्धिवान असतात, पण वाईट मार्गाकडे वळणारे असतात. बारीक डोळ्याचे लोक वर्ज करावे. नाक मोठें असणें हें निश्चयीपणाचें लक्षण आहे. वाकडें नाक गुन्हे करण्याचें लक्षण आहे. उशिरां दांत येणारीं मुलें जास्त वाचतात. अखूड हाताचे लोक बुद्धीवान असतात आणि लांब हातांच्या लोकांचें मन नेहमीं शांत असतें असें एका युरोपिनाचें ह्मणणें आहे.

अमेरिकेंतल्या खाणीच्या कांहीं व्यापाऱ्यांनीं खाणीतले दगड बाहेर काढण्याच्या कामावर माकडांच्या नेमणूका करण्याचें सुरू केलें आहे. तीं माकडें अशा रीतीनें शिकवून तयार केलीं आहेत कीं, तीं नेमलेल्या जागेचे दगड उचलून बिनबोभाट नेमलेल्या जागीं आणून ठेवतात. त्यांस पगार वगैरे कहीं द्यावा लागत नसून त्यांचें नेमलेलें भक्ष्य त्यांस नेमलेल्या वेळीं दिलें ह्मणजे तीं चांगलीं संतुष्ट राहात असल्यामुळें त्यांस हें मजूर चगले फायदेशीर होत आहेत.

टा. अ.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................०४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०६
दुसरे खेपेस .... .......०१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................ 4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Peline......3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR
VOL XXXI AKOLA MONDAY 20 SEPTEMBER 1897 NO 37
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २० माहे सप्टेंबर सन १८९७ इ० अंक ३७

## जाहिरात

ऱ्ही गणेश आणि मंडळीची अत्तरांचे पन्याची जाहिरात व पेंडसे याची औषधाची जाहिरातगेल्या अंकाबरोबर वाटली तिकडे वाचकानीं अवश्य लक्ष द्यावें.

## नाशिकचा माल

चांदी, पितळ, व तांबें वगैरेचीं भांडीं उपकरणीं वगैरे सोन्याचे दागिने सुद्धां हर-एक प्रकारचा माल घेऊन व्ही. पीनें पाठवूं. कमिशन रुपयास ६ पै.

पत्ता— आबाजी सीताराम मोडक
नासिक.

॥ श्लोक ॥

॥ मूर्धानास्थीं धरूनि जणु ही दीन वेषास हिंद ॥
॥ रंगस्थानीं व्यथितहृदया येतसे मंद मंद ॥
॥ वर्णी दुःखा, मम सुत वदे जाहले हीन कैसे ॥
॥ त्यांना त्राता कुणि न उरला, उग्र कीं सर्व भासे ॥

२

॥ वृष्टी जेव्हां जलद न करी काय झाली स्थिती हो ॥
॥ प्राणीमात्रें रजानें दिनिं किती फोडिला नित्य टाहो ॥
॥ दुष्काळानें छळुनि गिळुनी दाविला स्वर्ग लोकां ॥
॥ जीणें भासे विफल सकला दुःस्थिती ही विलोका ॥

३

॥ वाटे लोकां घन करि जरी वृष्टि आतां विपूल ॥
॥ आशां होई सुख किति तरी येऊं ऐशी सुवेळ ॥
॥ केलें मेवे मुदित सकलां वृष्टि जेव्हां करोनी ॥
॥ उत्कंठेनें जन जणु सुखी फार केला वरोनी ॥

४

॥ आशा, चिंता, करिति व्यथिता त्रस्त जेव्हां बहूत ॥
॥ होतें तेव्हां जनमनरूपीं चित्र मोठें विचित्र! ॥
॥ पीकें आलीं परि न अजुनी स्वस्तता हाय हाय !
॥ ऐसें सारा वदुनि जन हा मोकली फार धाय !! ॥

५

॥ हा ! हा ! ! दैवा ! हतगति कसी जाहली ह्या जनांची ॥
॥ थारा कोठें मिळत न चे, हीं लक्षणें कां सुखाची ॥
॥ आशा जाळीं ह्मणुनि जन हे दग्धरूपीं रहाता ॥
॥ देती सौख्या तरिच जिविता जीवसंज्ञा उरे ती ॥

६

॥ जैसे आले कुदिन गरिबां तेवि थोरां न भेद ॥
॥ पूर्वींचे ते सुदिन स्मरतां होतसे फार खेद
॥ अन्नासाठीं जरि दशदिशा धुंडिल्या दीन वेषें ॥
॥ काणी कांहीं मुळिंच नच दे, कंठ अत्यंत शोषें ॥

७

॥ पोटासाठीं फिरति धरुनी वेष जेव्हां अनेक ॥
॥ नेत्रद्वारें करुणरस ते गाळिती सर्व लोक ॥
॥ कष्टी आह्मी उपकृति-बला-भाव कैसें करावें ॥
॥ वाटे, ऐसें वदति जन जें, युक्त हें कीं मरावें ॥

८

॥ पाहेनिाया सदयहृदया ही स्थिती शोचनीय !
॥ येई शोका भरति न कशी दुःस्थिती हाय ! हाय ! !
॥ धांवा धांवा प्रभु नत जना सोडवावें त्वरेनें ॥
॥ दुष्काळानें व्यथित सगळे काळ लोकां पहा ने ॥

९

॥ आहे आशा सकल मनुजां मूल आधाररूपीं ॥
॥ हेतु जाणा सुकृतिविकृतीरूप बीजास रोपी ॥
॥ ईशें ऐसें सुचक घटनाचित्र केलें ह्मणोनी ॥
॥ राहे लोकीं सतत स्वमनीं सौख्य मानूनि प्राणी ॥

आकोला
१०।९।९७ } बाण

रा. रा. वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस वि० वि०

गणपती महोत्छव

सालाबाद प्रमाणें श्री गणपतीचा उत्सव येथील नेटिव्ह क्लबचे मंडळीनें निर्विघ्नपणें पार पाडला कारण यंदा दुष्काळा मुळें वर्गणी पुरेसी गोळा होऊन प्रसंग शोभिवंत होण्याची बऱ्याच लोकांनां भिती वाटत होती. गेल्या रविवारी गांवांतील प्रमुख लोकांस पानसुपारी करितां निमंत्रण दिल्याप्रमाणें बरीच सभ्य गृहस्थांची गर्दी जमली होती. जागेचे उणिवी मुळें कित्येकांना क्लबचे समोरील सडकेचा भाग आपल्या उभे राहण्यानें शोभिवंत करावा लागला. प्रथमतां एकदोन मनुष्यांचें पेटीवर गायन होऊन नंतर पानसुपारी देण्यांत आली. जागा संकोचित असून, हंड्या वगैरे लावल्यामुळें ती फारच सुशोभित दिसत होती. आठच्या सुमारास मंडळी वापस जाऊं लागली. पानसुपारी देण्याची वगैरे व्यवस्थापकानें फार उत्तम व्यवस्था ठेविली होती. गेल्या बुधवारीं वर्गणीदार लोकांस क्लबचे तर्फेनें मेजवानी देण्यांत आली. व ही मेजवानी दरसालचे प्रमाणेंच कडाक्याची झाली. यंदा ही मेजवानी देण्याच्या पूर्वीं व्यवस्थापक मंडळीनें विचार करून गोळा झालेली वर्गणी दुष्काळपिडित, अनाथ लोकांस साधें जेवण देण्यांत, अगर त्याना कपडे वाटण्यांत खर्च केली असती तर, ज्याना दररोज मिष्टान्नें ओतप्रोत खाण्यास मिळतात अशा लोकांस मिष्टान्न जेवण्यास घातल्यानें जें पुण्य व जी कीर्ति होईल त्यापेक्षां सहस्रपटीनें जास्त पुण्य व कीर्ति झाली असती; हें आमचे सुज्ञ मित्र कबूल करतीलच. गणपतीचें विसर्जन गेल्या शुक्रवारीं झालें. पाऊस असल्यामुळें जलसा बिलसा कांहीं झाला नाहीं. असो अशा उत्सवा पासून तरी आमच्यांत ऐक्यता वाढो ह्मणजे झालें. आमची या मंडळीस सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांनीं गाणेबजावणें या कडेस सर्व वेळ न घालविता तेथें कांहीं सुशिक्षित लोकांची सामाजिक औद्योगिक विषयांवर भाषणें होऊन त्या पासून समाजा विशेष फायदा होईल अशी कांहीं सोय करावी.

हालहवाल—पर्जन्यवृष्टी सपाट्याची सुरू आहे. लोक कंटाळून गेलेत. पिकें नाश होतील असें वाटतें. सध्यां पिकें साधारण बरीं आहेत. नदीला भयंकर पूर येतात. नदीचे कांठचे लोकांस रात्र फार काळजींत घालावी लागते. भिंती पडण्यांचें काम सपाट्यानीं चाललें. रोगराई साधारण आहे. धान्याच्या भावांत फरक पडत नाहीं. लोक फार त्रस्त झाले व गरिब अनाथ लोकांना अजून पुष्कळ मदत पाहिजे.

भिकाऱ्यांचा असा त्रास आहे. रात्रीं बारा बारा वाजेपर्यंत एकसारखें ओरडत असतात. त्यांत लहान लहान मुलांची स्थिति पाहून तर हृदय फार द्रवतें. असो. ईश्वरी इच्छेस इलाज नाहीं. हेही दिवस जाऊन आनंदाचे दिवस येतील. मात्र जगन्नियंत्यावर विश्वास पाहिजे.

मोर्शी,
१३-९-९७ } आपला
एक मित्र.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ९ शके १८१९

## अबकारी खातें

(नं. २.)

दोन्ही प्रकारच्या क्रमामध्यें दारूच्या दुकानांची संख्या नेमस्त असते आणि सरकारी हुकूमा शिवाय नवीन दुकान घालतां येत नाहीं.

सरकारी भट्टीची पद्धती उमरावती व इलिचपूर जिल्ह्यांत दोन वर्षांपासून चालली असून तिचा प्रसार हल्लीं अकोला जिल्ह्यांत व बुलढाणा जिल्ह्यांतील मलकापूर तालुक्यांत केला आहे. मक्त्याच्या भट्टीची वहिवाट अजून वणी व वाशिम या दोन जिल्ह्यांत व बुलढाणा जिल्ह्यांतील चिखली व मेहकर या दोन तालुक्यांत चालूंच आहे. दुष्काळ पडल्यामुळें सर्व बुलढाणा जिल्ह्यांत व वाशिम जिल्ह्यांत सरकारी भट्टीतली दारू पुरविण्याची जबाबदारी घेण्यास कोणी कंत्राटदार धजला नाहीं. हल्लीं सरकारी भट्टीची पद्धत १३ तालुक्यांतून चालूं आहे. मेळघाट तालुका धरून सपाटी वरील सर्व तालुक्यांत तिचा प्रसार करण्यांत आला. वऱ्हाडच्या दक्षिण भागांतील डोंगरा तालुक्यांतून मक्त्याच्या भट्टा चालतात. पूर्व वऱ्हाडांतील सरकारी भट्टीचें कंत्राट मेसर्स उमरीगर आणि कंपनी यांच्याकडे आहे आणि त्या कंपनीनें ३,३९००० रुपयांस हें कंत्राट घतलें आहे. पश्चिम वऱ्हाडांतील सरकारी भट्टीचें कंत्राट मि० बी. ए. दलाल या पार्शी गृहस्थांनीं घेतलें असून त्यांनीं सरकारास निदान २,११,०० रुपये देण्याचें कबूल केलें आहे. हीं दोन्ही कंत्राटें १८९९ सालीं पुरीं झालीं ह्मणजे सरकारी भट्टीची शिस्त सर्व प्रांतभर अमलांत येईल.

देशी दारू संबंधानें हल्लीं जो कायदा चालूं आहे तो सरकारी भट्टीच्या पद्धतीला बरोबर लागूं पडत नाहीं. ह्मणून तो बदलून दुसऱ्या कायद्याचा मसुदा तयार करून तो मेजर वारन हेस्टिंग यांनीं इंडिया सरकाराकडे पाठविला आहे.

सरकारी भट्टीचा कारखाना उमरावती व इलिचपूर जिल्ह्यांस प्रथम लागूं केला तेव्हां कंत्राटदारानें गाळलेल्या दारूवर जें कराचें उत्पन्न झालें तें त्यानें कबूल केलेल्या रकमे इतकें होतें. १८९५।९६ सालीं त्याच कंत्राटदाराला ९६६३८ रुपये नुकसानी बद्दल आपल्या पदरचे भरावे लागले. सन १८९६ च्या मार्च ३१ ला २२८३३ ग्यालन दारू शिल्लक होती परंतु १८९७ सालीं दारूचा खप चांगला न झाल्यामुळें गेल्या मार्च ३१ वे तारखेला ६५०३३ ग्यालन दारू शिलकींत होती. गेल्या वर्षांत दारूची विक्री फार कमी होण्याला कारणें दुष्काळ व महर्गता हीं होतीं तथापि आलिशान रेसिडेन्ट साहेबांचा अभिप्राय असा पडतो कीं दर्यापू-

र, मोर्शी, चांदूर व मूर्तिजापूर या तालुक्यांत चोरून तयार केलेल्या दारूचा उपयोग होत असावा आणि ह्मणून सरकारी भट्टींतल्या दारूची विक्री फार कमी दिसते. याशिवाय १८९१।९२ व १८९२।९३ या सालीं इलिचपूर जिल्ह्यांतील ७४ व उमरावती जिल्ह्यांतील १२१ दारूचे गुत्ते बंद करण्यांत आले. या दुकानांतून पूर्वी निरनिराळी भट्टी असे व तेथें जुन्या चाली प्रमाणें दारू गाळीत असत. तेव्हां रेसिडेंट साहेबांनीं सर्व डिपुटी कमिशनरांस हुकूम फर्मावला आहे कीं त्यांनीं जुन्या भट्ट्या बंद असल्या विषयीं खबरदारीनें काळजी घ्यावी आणि गैरकायदा तयार केलेली दारू उपयोगांत आणूं देऊं नये. उमरावती व इलिचपूर हे दोन जिल्हे मिळून सन १८९२-९३ साला पर्यंतच्या पांच वर्षांतील सरासरीचें वार्षिक उत्पन्न देशी दारू बद्दल मक्त्याच्या पद्धतीनें सरासरी ६॥ लक्ष रुपये होत होतें. पण सरकारी भट्टीमुळें एकंदर गाळलेल्या दारूवर उत्पन्न ३६४९१ रुपये झालें व कत्रांटदारानें ३,३५,००० रुपयांचा जिम्मा घेतला होता ह्मणजे प्रत्यक्ष उत्पन्न १९९९१ रुपयांनीं जिम्याच्या रकमेपेक्षां अधिक आहे. सरकारी भट्टीच्या कंत्राटदाराला सरकारी मदत मुबलक देण्याविषयीं स्पष्ट हुकूम करण्यांत आला आहे.

देशी दारूच्या मक्त्याचें उत्पन्न बुलढाणा जिल्ह्यांत फारच कमी आलें ही गोष्ट अलिशान रेसिडेंट साहेबांस मोठ्या दिलगिरीची वाटली. दुष्काळ व महर्गता हीं कारणें सर्वस्वी बरोबर नाहींत कारण हीं वाशिम जिल्ह्यांत विद्यमान होतीं पण तेथें उत्पन्नाचा आंकडा इतका उतरला नाहीं. या शिवाय वणी जिल्हा ह्मणजे बहुतेक जंगली लोकांचा आहे आणि तेथें गैरकायदा दारू गाळण्यांत येऊन ती उपयोगांत येण्याचा संभव मोठा आहे. त्या अर्थी वणी जिल्ह्यांत दुकानें स्थापून देशी दारू पासून उत्पन्न यथायोग्य येईल अशी व्यवस्था चालूं करण्या बद्दल विशेष दक्षता प्रांतिक अधिकाऱ्यांनीं घेतली पाहिजे.

( पुढें चालेल )

---

तारीख १५ जूनच्या केसरींतील दोन लेखांनीं अराजनिष्ठा पसरण्याचा प्रयत्न केला अशा आरोपावर नामदार बाळ गंगाधर टिळक यांस नामदार न्यायमूर्ती स्ट्रेची साहेबांनीं दीड वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा गेल्या मंगळवारीं दिली. जुरीमध्यें ९ गृहस्थ होते. त्या पैकीं ५ युरोपियन, १ ज्यू, २ हिंदु, व १ पार्शी असे होते. अपराधाच्या शाबिती विषयीं ६ मतें होतीं आणि ३ मतें विरुद्ध होतीं. सहा जणांच्या बहुमताला संमोदक असें न्यायमूर्तींचें मत पडलें आणि अखेरीस दयाळूपणानें फक्त १८ महिन्यांचीच सक्त मजूरी आरोपीला सुनावण्यांत आली. आह्मास पराकाष्ठेचें दुःख वाटतें कीं नामदार टिळका सारखा विद्वन्मणि कायद्याच्या चक्राखालीं चुरडला गेला! ही हानी मोठी आहे. अराजनिष्ठेबद्दल शिक्षा एका राजभक्त लोकनायकास झाली हें देशाचें दुर्भाग्य होय. ईश्वरी संकेत बऱ्या साठींच असतो अशा समजुतीवर काळ कंठला पाहिजे! तुरुंगखान्यांतील देहदंड नामदार टिळकास भोगलाच पाहिजे पण साऱ्या देशाची सहानुभूती व परमेश्वरी कृपा हीं त्यांस देहदंड भोगण्यास समर्थ करोत.

नामदार टिळकांस शिक्षा दिली खरी पण ही शिक्षा सर्व नेटिव पत्रकारांस अप्रत्यक्ष आहे. नामदार टिळकांच्या लेखांत राजद्रोह नाहीं. तथापि सरकारी न्यायपद्धतीनें ते लेख राजद्रोहात्मक ठरले आहेत तेव्हां प्रत्यक्ष शिक्षा झाली नाहीं तरी त्या शिक्षेमुळें आह्मी आपला लेखनक्रम बदलला पाहिजे. आह्मी शिक्षेला भितों ह्मणून असें ह्मणत नाहीं. आजपर्यंतच्या आमच्या राजनिष्ठेच्या बळावर आह्मी इंग्रजी उदार राजनीतीनें सांप्रतच्या उच्च स्थितीला पोंचलों. राज्यकर्त्यांशीं स्नेहभावानें व प्रेमळपणानें आमच्या सुखसमाधानच्या गोष्टी होऊं लागल्या आणि त्या आनंदाचा हृदयंगम देखावा गेल्या जुबिलीच्या वेळीं हिंदुस्तानभर दिसून आला. राज्यकर्ते व इंडियन हे महाराणी सरकारच्या छत्राखालीं एकवटले. आणि प्रजाधर्मानें आह्मी राजकर्त्यांशीं अन्तरात्म्यानें एकजीव बनलो. वस्तुस्थिती प्रमाणें इंडियनांस राजभक्तीचेच मार्ग उपयोगीं पडतील. जगांतील आशासर्वस्व राजनिष्ठे मध्येंच केंद्रस्थ झालें आहे. लाभदृष्टीनें आह्मास राज्यकर्त्यांची कांस सोडताच येत नाहीं. अशा स्थितींत इंडियन पत्रकारांवर सरकारची अवकृपा झाली, त्यांचा निस्पृह सत्ययक्तेपणा सरकारास रुचला नाहीं, उभयतांच्या कल्याणाचा राजमार्ग नावडता झाला आणि कायद्याच्या कलमाखालीं सरकारी प्रचंड शक्ती आह्मावर गाजविली तर आह्मी हे दुर्दैवाचे विलास मानून भविष्यकालावर नजर दिली पाहिजे. कालगतीनें सरकारची चूक सरकारास कळेल आणि मग कृपादृष्टीनें आह्मी सरकारचे खरे भक्त ठरूं अशी आह्मास बळकट आशा आहे. आमच्या प्रगतीचें घड्याळ बंद पडलें इतकेंच नाहीं तर त्याचीं सर्व चक्रें अस्ताव्यस्त झालीं आहेत. वर्तमानपत्रें या पुढें सरकारच्या स्तोत्रपाठांनीं ओतप्रोत झालीं पाहिजेत पण सरकारची व इंडियनांचीं मनें परस्पराविषयीं कलुषित झालीं आहेत हें निर्विवाद आहे. अराजनिष्ठेची मीमांसा न्यायमूर्ती स्ट्रेची यांनीं केली आहे ती आज पासून वर्तमानपत्रकर्त्यांची गीता होय.

---

सरकारा विषयीं लेखानें किंवा भाषणानें असंतोष उत्पन्न करणें किंवा तो उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें गुन्हा होतो. परंतु सरकारच्या कार्याविषयीं अमान्यता दर्शविणें गुन्हा होत नाहीं आणि ही अमान्यता सरकारी हुकूम पाळण्याला व सरकारला मदत करण्याला प्रतिरोधक नसावी. असंतोष ह्मणजे संतोषाचा अभाव होय. त्याचा अर्थ सरकारा बरोबर असलेला विरोध, वैर, अप्रीती, तिरस्कार किंवा अन्य प्रकारची वाईट भावना असा होतो. असंतोषाला दुसरा समानार्थक शब्द ह्मणजे अराजनिष्ठा. या शब्दांत बहुतेक सर्व अर्थांचा समावेष होतो. प्रत्यक्ष बंड, राज्यक्रांती, किंवा जुलूमाची दांडगाई हीं कांहीं असंतोषाला आवश्यक नाहींत. सरकारा विषयीं असंतोष उत्पन्न होण्याची देखील जरूर नाहीं. कृती घडो किंवा निव्वळ प्रयत्नांतच तिचा लय होवो असंतोषजननाचा आरोप सारखाच लागूं पडतो. कांहीं प्रकारची टीका असंतोषकारक असेत पण त्या पासून सरकारच्या कार्या विषयीं फक्त अमान्यता दर्शित होते आणि ही अमान्यता अपराधाच्या स्वरूपाची होत नाहीं. सरकारच्या हुकूमाची बेअदबी होणार नाहीं व सरकारच्या राज्यव्यवस्थेला साह्य मिळत जाईल अशा प्रकारची अमान्यता गुन्ह्या खालीं येत नाहीं. ही मीमांसा अराजनिष्ठेची झाली. दुसरा अर्थ वरिष्ठ न्यायकोर्टा कडून प्रकाशित होई पर्यंत हाच अर्थ आह्मा सर्व इंडियनास शिरसावंद्य मानला पाहिजे. हा अर्थ विकत मिळण्या पूर्वीं एका उत्तम पत्रकर्त्याचा देह राजदंडाला बळी पडला ह्मणून आह्मी ही अक्कल मोठ्या अपूर्वतेनें प्राणाहून ही श्रेष्ठ मानण्यास शिकूं.

---

पुण्या मुंबईच्या बातम्या संबंधानें वातावरणांत हल्लीं उल्कापात होत आहेत. लार्ड हामिल्टन यांनीं मागें जें भविष्य सांगितलें तें निदर्शनास येत आहे. पण दुःखाची गोष्ट कीं लेफटनंट एअर्स्ट व रॅंड यांचे वध करणाऱ्या चांडाळांचा नापत्ता आहे. जादा पोलीस बसविलें, सरदार नातूंस बंदींत टाकलें, प्रतोद कर्त्यांस काळ्या पाण्यावर पाठविलें, नामदार टिळकांस तुरुंगवासाची शिक्षा दिली, 'पुणेवैभव' कर्त्यांचा खटला चालूं आहे, आणि 'मोदवृत्ता' वर खटला चालणार आहे परंतु खुनाच्या बातमीचा लेशमात्र देखील नाहीं. सर्व प्रकारचे संहारक उपाय एकदम चालूं केले आहेत.

परंतु खुनी माणसांचा पत्ता कोठें आहे! पुण्यासारख्या शहरीं असे खून व्हावे व त्याचा पत्ता तेथील अनुभवी व हुशार पोलीसला अगर सरकारचे नव्या लाडक्या प्युनिटिव्ह पोलीसाला ही लागूं नये ही वाईट गोष्ट आहे. खूनी माणूस तर अजून या पोलीसच्या कमकुवत पणाबद्दल हसून गर्वानें छाती काढून फिरत असेल!

ह्या पोलीसांनीं काय गोंधळ चालविला आहे ह्याचा कांहीं थांगच लागत नाहीं. गेल्या नारळी पौर्णिमेचे सुमारास दोघां हिंदूस मुंबईहून धरून नेलें. त्यांनीं पुण्यास काय जबान्या दिल्या ह्या आजपर्यंत गुलदस्तांतच होत्या. परवां त्या दोघां पासून जामीनही घेतले. परंतु मौजेची गोष्ट ही कीं पूर्वींच्या जबान्या पोलिसच्या दपटशामुळें व त्यांच्या ताब्यांत असल्यामुळें दिल्या असें ते आतां सांगतात. यावरून आपणा तिऱ्हाईतास मथितार्थ कांहींच काढता येत नाहीं. पोलिस तर लबाड नसेलच परंतु पूर्वींच्या जबान्या अगर कबूल जबाब प्रसिद्धपणें घेतले नसल्यामुळें ह्याही गृहस्थांस खोटें ठरवितां येणार नाहीं.

---

'पुणे वैभव' पत्राचे संपादक रा. रा. नारायण गणेश केळकर व प्रकाशक रा. रा. बळवंत कृष्ण पुरंदीकर यांजवर 'पुणे वैभवा' च्या ११ एप्रिलच्या अंकांत प्लेग प्रकरणा संबंधानें लिहिलेल्या लेखांनीं सरकाराविरुद्ध अराजनिष्टेची प्रेरणा करण्याचा प्रयत्न केल्या बद्दल गेल्या बुधवार पासून मुंबईच्या सेशन कोर्टांत नामदार स्ट्रेची साहेबा समोर खटला चालूं होता. जूरीमध्यें मतभेद पडला. ५ जण एका मताला व ४ जण उलट मताचे होते. आरोपींवर पुन्हा दुसऱ्या जुरी पुढें खटला चालावा असा हुकूम झाला. पुन्हा खटला चालविणे ह्मणजे खरोखर, मोठा दुःखाचा प्रसंग! लोकहिताच्या गोष्टी अशाच धोक्याच्या, सरकारच्या शिक्षेच्या पण लोकवंद्यतेच्या असतात!

---

नामदार टिळक यांचा खटला प्रिव्ही कौंसिल समोर नेण्याची परवानगी नामदार न्यायमूर्ती चीफ जास्टिस फॅरन यांजकडे मागितली आहे. या अर्जांत मुख्य मुद्दे असे आहेतः—

( १ ) राजद्रोहाबद्दल खटला करण्याची सरकारची मंजुरात कायद्या प्रमाणें पुरेशी नाहीं. ( २ ) ही मंजुरात योग्य प्रकारची नसल्यास सेशन कोर्टास हा खटला चालविण्याचा अधिकार पोंचतो काय? ( ३ ) जज्यांनीं खटला समजून देतांना जूरीला चुकीचा कायदा सांगितला काय! आणि [ ४ ] सरकार तर्फेचा पुरावा काय होता? या अर्जीचा विचार नामदार फारन व स्ट्रेची या या दोन न्यायमूर्ती पुढें गेल्या शनिवारीं चालणार होता. पण बारिस्टर्स प्यु व गार्थ विलायतच्या आगबोटीनें निघाल्या मुळें हा अर्ज पुढील आठवड्यापर्यंत तहकूब राहिल.

---

'मोदवृत्त' कर्ते रा. रा. काशिनाथ वामन लेले हे फार आजारी असल्यामुळें त्यांचा खटला पुढील सेशनपर्यंत तहकूब ठेवण्यांत आला. राजश्री लेले यांच्यातर्फे बॅरिस्टर रॉबर्टसन आहेत. प्रतोदपत्रावरील अपील हायकोर्टाच्या फूल बेंचापुढें चालणार आहे असें कळतें.

---

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 20, 1897

Mr. Tilak is sentenced to 18 months' rigorous imprisonment. So ends the memorable trial casting a deep gloom over the whole nation. Doubtless the Anglo-Indian press which is mainly responsible for these trials, is jubilant over the event. Intense excitement sinks into utter despair and hopelessness. Let us analyse the trial a little.

In the interests of law we must bow down to the judgment of the Bombay. High Court at the Criminal Sessions on the Hon'ble Mr. Bal Gangadhar Tilak. That judgment lays down the law of sedition and we must accept it as gospel truth until it is reversed and set aside. Law has its own victims. And we are sorry that the penal law is in full swing against a poor loyal subject of Her Majesty the Queen-Empress. Pity that sedition is brought home to him who is the staunchest adherant and the best product of the British rule in India. The Indian press trembles under the iron rod of a penal provision. The section of sedition thrusts new lessons and terrors in the hearts of Indian journalists when we read it in the light of the learned disquisition of the Hon'ble Mr. Justice Strachey. The judgment practically asks us to close our offices if we do not fill in our columns with praises and songs in honor of the administrative machinery. The lip-praises will save us from the thraldom of the jail; but to a loyal and truthful mind of the type of Mr. Tilak's.

" Stone walls do not a prison make

Nor iron bars a cage."

The system of a jury-trial is not the surest way to attain to justice especially in India. It is the best means available. It is a human machinery with inherent imperfections. Mr. Tilak had to take his trial before a group of jurors of whom 5 were Europeans, one Jew, 2 Hindus and one Parsee. The vigor, eloquence, and decisive opinions of the judge formulated the verdict of the jury. Unanimity was found impossible and a majority of six against 3 gave weight, dignity and practical turn to the summing up of the judge. It was afterwards a light job to take up the verdict and to give a signal and triumphant finish to the trial. Mr. Tilak goes to jail and we hope he will bear up with fortitude the iniquities of law. The highest aims of law are justice pure and simple; but sometimes the effects of law—and that too misunderstood and misread in the idols of a few gentlemen—are most unjust, and ruinous. The judgment of the Bombay High Court has revolutionized our ideas of sedition. We were ignorant of the cheap *disaffection* the Penal Code provides against. The Hon'ble Mr Tilak is a victim to the Penal Code with its judicial commentary. With such a powerful and despotic law in hand the Government can crush the liberty of the press and we are awakened to tremendous and gigantic powers of our Government. If an apology could help us for our writings in the past we submit it with a humble prayer that the law of sedition, as read and explained by the Hon'ble Mr. Justice Strachey, is more seditious in its effects.

The Hon'ble Mr. Justice Strachey paid a tribute to Mr. Tilak when he appreciated his towering influence, his high learning, and his mental capacity of the highest utility. He recognizes in him a useful *force* in the State but he regrets the misuse of Mr. Tilak's abilities. If so, we think that ends of law will have been quite satisfied if the so-called justice has been tempered with mercy. The triumph of law was enough with the assertion of conviction. Simple fine would have taught to Mr. Tilak to desist from his seditious writings because he is loyal to the core and he will gladly wait till time changes the current views of sedition But no ! The lip-sympathy of the judge fell short and a *useful force* in the state is sacrificed at the altar of law. The punishment exasperates people and makes, we confess at the penalty of a similar punishment, people's minds more dis—affected and estranged. A wide gulf opens the breach and we are extremely sorry for such a sad result. It is a bad policy to institute state-prosecu—tions on legal quibbles when education, warning and a threatening mood will have silenced people. Loyalty of the Indian people is unimpeachable and hence we say that the sooner the alienations of people's hearts are remedied the better.

We have been from the beginning against these State prosecutions of Native journalists. It indeed lowers the dignity and nobleness of a powerful and benevolent Government like the British administration. Vocal or written seditions have no meaning and significance with people of all grades and social standings. If so, the Government ought to be humane and not vindictive. A golden proposal is before the Lieutenant Governor of Bengal in this connection. The Hon'ble Mr. Surrendranath Bannerji as Secretary of the Native Press Association has addressed the Bengal Government in the following eloquent manner:—

"We need hardly assure your honour that freedom of speech and writing is one of the greatest blessings of British rule, beneficial alike to the people and the Government, and restrictions imposed upon it would not only deal a heavy blow at the cause of progress and enlightenment, but would deprive the Government of a valuable index of popular feeling. In times of excitement the services of a free Press can scarcely be exggerated. In the language of a well-known London daily paper " it is no mere sentiment in favour of free speech that has led the practical English people to allow absolute freedom to the Press of India. " To deprive the Press of its freedom is to sit on the safety-valve, inviting more serious disaster. For our own part, we may say that we disclaim all sympathy with writings which are calculated to create disaffection towards British rule. We condemn them at being alike foolish and unpatriotic; for the history of British rule in India, notwithstanding its defects and drawbacks which all must admit, has been the history of an enlightened and progressive administration; and we feel that the advacement of the people in the paths of progress is bound up with the continuance of British rule and the peaceful maintenance of the existing order of things. We cannot believe that an educated and patriotic Indian who is familiar with the history of British rule in India and can form an intelligent forecast of the possibilities of good to his countrymen which are associated with its stability, can really persuade himself to indulge in the language of sedition. If carried away by the excitement of the moment, writers in the Press may occasionally overstep the limits of legitimate criticism, and so far forget themselves as to indulge in seditious writing, we venture to submit that the existing law is amply sufficient to deal with them. That, indeed, is the opinion of high authorities, such as Mr. Justice Budrudin Tyabji of the Bombay High Court and others. In this connection we desire to make a suggestion to which we are confident your Honour will be pleased to extend that sympathetic consideration which your Honour is accustomed to bestow upon all proposals made by public bodies and calculated to secure to the orders of Government the active support of public opinion. We desire to submit that when Government considers any writing in the Press as being seditious, the writer should not in the first instance be prosecuted, but that his case should be referred to the Press Association to be dealt with by that body; and if, in spite of any warning which the Association may administer to him the writer should again be found to indulge in similar writings, he may be prosecuted according to the law. Such a prosecution would then be undertaken with the full concurrence of public opinion, and the offending journalist would fail to secure t himself much of that popular sympathy which generally attends a State prosecution. Further, in most cases the warning addressed by the Association will suffice, for the offending journalist will then feel that if there was to be a prosecution after such a warning, he would be left alone to make his defence, unsupported by the sympathy of his colleagues in the Press. "

## वऱ्हाड

हवामान— थोडा पाऊस होऊन उघाडी ही चांगली आहे. हवा आरोग्य कारक आहे. एकंदर पाणी २० इंच झालें. दुष्काळाचा कडाखा कमी कमी वाटत आहे.

रा० रा० माधवराव अण्णाराव तहशिलदार जळगांव यांस आजारी पणाबद्दल सहा महिन्यांची रजा मिळाली आहे.

आणि त्यांच्या रजेंत मौलवी रहितुल्ला हकीमुद्दीन तहशिलदार. मलकापूर यांनीं आपली रजा रद्द केल्यावरून त्यांस जळगावांस बदललें.

डिपार्टमेंटल परीक्षे संबधोंने पुष्कळ आफिसर मंडळी उमरावतीस एकत्र झाली होती ती या आठवड्यात आपापल्या जागीं दाखल होईल.

न्यायमूर्ती आर० आबर्ड साहेब हे हैदराबादेहून परत गेल्या शनिवारीं आले. यांच्या, नामश्रवणानेंच पुष्कळास त्यांच्या गुणाबद्दल मोठी आनंद वाटतो.

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे ए० अ० कमिशनर, मलकापूर तीन महिन्यांची रजा घेणार असून त्यांच्या रजेंत मि. सुब्रायलू नायडू ए० अ० कमिशनर यांस यवतमाळाहून बदलणार असल्याचें कळतें.

पूर्व संकेताप्रमाणें काल रविवारीं वऱ्हाड सामाजिक सभेमार्फतै येत्या सोशल कान्फरन्सेचे व्यवस्थेसंबंधानें विचार करण्यासाठीं उमरावती येथील लायब्ररींत सामाजिक सुधारकांची सभा भरणार होती.

पुसदचे तहशिलदार मि० विठूजी नारायण यांनीं सहा महिन्याची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं मि० रघुपतराव तहशिलदार यांची बदली झाली.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९१ रुपये |
| जवारी | ९५—१०५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १३५ रु० |
| ,,( बनशी ) | १५० रु० |
| चणे | १३५ रु० |
| तेल | ६।॥= रु० मण |
| तूप | ८॥ मण |
| सोनें | २५!॥ तोळा |
| चांदी | ७३ |

नोटीस

रा. रा. सुरजमल सीवबकस मारवाडी राहणार लाखनवाडा तालुके बाळापूर जिल्हे अकोला यांस:—

नोटीस देणार गिरधारीलाल सीवबकस मारवाडी राहणार इसोली तालुके चिखली जिल्हे बुलडाणा याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आदमासे दोन वर्षे होऊन गेलीं त्यावेळेस तुमचा आमचा ठराव असा जाहला कीं ५००० पांच हजार रुपये तुह्मी आह्मास द्यावे. असा ठराव जाहला त्याचा तपशील.

१००० जवारी खंडी ११ अकरा देण्याचे रुपये हजार मध्यें.

१००० सोनें तोळे ३५ रुपये हजार मध्यें देणें.

२००० रुपये नगद देण्याचें.

१००० सदरील पांच हजारापैकीं बाकी राहिलेले हजार रुपये कार्तिक माशीं फैसल झाल्या दिवसापासून येत्या कार्तिकापर्यंत दरशेंकडा ०८ आणेप्रमाणें व्याजासुद्धां देण्याचें ठरलें आहे.

———

५०००

सदर्हु वर नमूद केलेल्या कलमापैकीं तुह्माकडून आह्मास ७ खंडी जवारी मिळाली व १८१० अठराशें दहा रुपये रोख दिले व सोनें तोळे ८४ आठ तोळे चार मासे तुह्मी दिले. बाकी सदरील लिहिलेल्या कलमापैकीं जे जे आमचें घेणें नगदी जवारी सोनें व या सर्वत्राचें व्याज असे मिळून ही नोटीस पावले दिवसापासून १५ दिवसाचे आंत निकाल करावा, व आह्मास तुह्मापासून जी जवारी राहिलेली घेणें आहे ती तुह्मास मागितली असतां तुह्मी दिली नाहीं सबब आतां आह्मास जवारी घेणें नाहीं. आज मितीस जवारीचा बाजारभाव जो आहे त्याप्रमाणें दाम घेतले जातील. येत्या कार्तिकमाशीं नगदी रुपये १००० एक हजार व्याजासुद्धां ठरल्याप्रमाणें आणून द्यावें, न दिल्यास याजबद्दल काम चालविलें जाईल.

सदर्हु नोटिशीत कळविल्याप्रमाणें वरील कलमवारीचा निकाल तुमच्याकडून दिलेल्या मुदतींत निकाल न केल्यास तुमचेवर रिती प्रमाणें काम चालविलें जाईल. व खर्चासमेत जें नुकसान अखेर निकाल होईपर्यंत तें भरून घेतले जाईल कळावें तारीख १९।९।९७ इसवी.

सही
गिरधारीलाल शीवबकस मारवाडी राहणार इसोली
दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

मुंबईच्या एका मुसलमानीं वर्तमानपत्रकारास २४ तासांच्या आंत मुंबई सोडण्या विषयीं हुकूम झाला आहे. पोर्तुगीज लोकांच्या दमन कडे जातांना त्यांस वाटेंतच पकडलें आहे.

कानफुचूस एक वेळ ह्मणाला, धर्मशास्त्रांत हजारों बोधपर वचनें आहेत, पण त्या सगळ्यांचें सार एका वाक्यांत आहे. तें वाक्य असें—" दुर्विचार ह्मणून मनांत शिरूं देऊं नका. सत्य काय हें समजून त्याप्रमाणें न करणें ह्मणजे कमकुवतपणाच होय."

आपला शेजार उत्तम केव्हां ह्मणावा ? जेव्हां शेजाऱ्याची रीतभात सच्छिलाची असेल तेव्हां. सच्छिलाकडे मन नित्य गुंतवलें कीं कधीं दुवर्तन होईल अशी भीतीच नको."

श्रेष्ठ तो कीं जो सच्छिलाकडे मन गुंतवतो, जो स्वसुखाकडेच मन गुंतवील तो अधम एकानें कानफुचूसास विचारलें "आपण काय हेतु बाळगतां ? त्यानें उत्तर दिलें, " वृद्धास शांति देण्यास सांपडावी, मित्रास निर्मल चित्त, आणि तरुणास प्रेम हीं देण्यास सांपडावी हेच माझे हेतु."

ज्यांना सत्य कायतें कळतें त्यांची आणि ज्यांचें सत्यावर प्रेम आहे त्यांची कधींच बरोबरी होत नाहीं.

सच्छील मनुष्य आपलें हित साधूं लागला, तर त्यांत दुसऱ्याचें हित साधणा;

र, मोर्शी, चांदूर व मूर्तिजापूर या तालुक्यांत चोरून तयार केलेल्या दारूचा उपयोग होत असावा आणि ह्मणून सरकारी भट्टींतल्या दारूची विक्री फार कमी दिसते. या शिवाय १८९१।९२ व १८९२।९३ या सालीं इलिचपूर जिल्ह्यांतील ७४ व उमरावती जिल्ह्यांतील १२१ दारूचे गुत्ते बंद करण्यांत आले. या दुकानांतून पूर्वी निरनिराळी भट्टी असे व तेथें जुन्या चाली प्रमाणें दारू गाळीत असत. तेव्हां रेसिडेंट साहेबांनीं सर्व डिपुटी कमिशनरांस हुकूम फर्माविला आहे कीं त्यांनीं जुन्या भट्ट्या बंद असल्या विषयीं खबरदारीनें काळजी घ्यावी आणि गैरकायदा तयार केलेली दारू उपयोगांत आणूं देऊं नये. उमरावती व इलिचपूर हे दोन जिल्हे मिळून सन १८९२-९३ साला पर्यंतच्या पांच वर्षांतील सरासरीचें वार्षिक उत्पन्न देशी दारू बद्दल मक्त्याच्या पद्धतीनें सरासरी ६॥ लक्ष रुपये होत होतें. पण सरकारी भट्टीमुळें एकंदर गाळलेल्या दारूवर उत्पन्न ३६४५१ रुपये झालें व कन्त्राटदारानें ३,३५,००० रुपयांचा जिम्मा घेतला होता ह्मणजे प्रत्यक्ष उत्पन्न १९९९१ रुपयांनीं जिम्याच्या रकमेपेक्षां अधिक आहे. सरकारी भट्टीच्या कंत्राटदाराला सरकारी मदत मुबलक देण्याविषयीं स्पष्ट हुकूम करण्यांत आला आहे.

देशी दारूच्या मक्त्याचें उत्पन्न बुलढाणा जिल्ह्यांत फारच कमी आलें ही गोष्ट अलिशान रेसिडेंट साहेबांस मोठ्या दिलगिरीची वाटली. दुष्काळ व महर्गता हीं कारणें सर्वस्वी बरोबर नाहींत कारण हीं वाशिम जिल्ह्यांत विद्यमान होतीं पण तेथें उत्पन्नाचा आंकडा इतका उतरला नाहीं. या शिवाय वणी जिल्हा ह्मणजे बहुतेक जंगली लोकांचा आहे आणि तेथें गैरकायदा दारू गाळण्यांत येऊन ती उपयोगांत येण्याचा संभव मोठा आहे. त्या अर्थीं वणी जिल्ह्यांत दुकानें स्थापून देशी दारू पासून उत्पन्न यथायोग्य येईल अशी व्यवस्था चालूं करण्या बद्दल विशेष दक्षता प्रांतिक अधिकाऱ्यांनीं घेतली पाहिजे.

( पुढें चालेल )

---

तारीख १५ जूनच्या केसरींतील दोन लेखांनीं अराजनिष्ठा पसरण्याचा प्रयत्न केला अशा आरोपावर नामदार बाळ गंगाधर टिळक यांस नामदार न्यायमूर्ती स्ट्रेची साहेबांनीं दीड वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा गेल्या मंगळवारीं दिली. जुरीमध्यें ९ गृहस्थ होते. त्या पैकीं ५ युरोपियन, १ ज्यू, २ हिंदु, व १ पार्शी असे होते. अपराधाच्या शाबिती विषयीं ६ मतें होतीं आणि ३ मतें विरुद्ध होतीं. सहा जणांच्या बहुमताला संमोदक असें न्यायमूर्तींचें मत पडलें आणि अखेरीस दयाळूपणानें फक्त १८ महिन्यांचीच सक्त मजूरी आरोपीला सुनावण्यांत आली. आह्मास पराकाष्ठेचें दुःख वाटतें कीं नामदार टिळका सारखा विद्वन्मणि कायद्याच्या चक्राखालीं चुरडला गेला! ही हानी मोठी आहे. अराजनिष्ठेबद्दल शिक्षा एका राजभक्त लोकनायकास झाली हें देशाचें दुर्भाग्य होय. ईश्वरी संकेत बऱ्या साठींच असतो अशा समजुतीवर काळ कंठला पाहिजे! तुरुंगखाल्यांतील देहदंड नामदार टिळकास भोगलाच पाहिजे पण साऱ्या देशाची सहानुभूती व परमेश्वरी कृपा हीं त्यांस देहदंड भोगण्यास समर्थ करोत.

नामदार टिळकांस शिक्षा दिली खरी पण ही शिक्षा सर्व नेटिव पत्रकारांस अप्रत्यक्ष आहे. नामदार टिळकांच्या लेखांत राजद्रोह नाहीं. तथापि सरकारी न्यायपद्धतीनें ते लेख राजद्रोहात्मक ठरले आहेत तेव्हां प्रत्यक्ष शिक्षा झाली नाहीं तरी त्या शिक्षेमुळें आह्मी आपला लेखनक्रम बदलला पाहिजे. आह्मी शिक्षेला भितों ह्मणून असें ह्मणत नाहीं. आजपर्यंतच्या आमच्या राजनिष्ठेच्या बळावर आह्मी इंग्रजी उदार राजनीतीनें सांप्रतच्या उच्च स्थितीला पोंचलों. राज्यकर्त्यांशीं स्नेहभावानें व प्रेमळपणानें आमच्या सुखसमाधानच्या गोष्टी होऊं लागल्या आणि त्या आनंदाचा हृदयंगम देखावा गेल्या जुबिलीच्या वेळीं हिंदुस्तानभर दिसून आला. राज्यकर्ते व इंडियन हे महाराणी सरकारच्या छत्राखालीं एकवटले. आणि प्रजाधर्मानें आह्मी राजकर्त्यांशीं अन्तरात्म्यानें एकजीव बनलों. वस्तुस्थिती प्रमाणें इंडियनांस राजभक्तीचेच मार्ग उपयोगीं पडतील. जगांतील आशासर्वस्व राजनिष्ठे मध्येंच केंद्रस्थ झालें आहे. लाभदृष्टीनें आह्मास राज्यकर्त्यांची कांस सोडताच येत नाहीं. अशा स्थितींत इंडियन पत्रकारांवर सरकारची अवकृपा झाली, त्यांचा निस्पृह सत्यवक्तेपणा सरकारास रुचला नाहीं, उभयतांच्या कल्याणाचा राजमार्ग नावडता झाला आणि कायद्याच्या कलमाखालीं सरकारी प्रचंड शक्ती आह्मावर गाजविली तर आह्मी हे दुर्दैवाचे विलास मानून भविष्यकालावर नजर दिली पाहिजे. कालगतीनें सरकारची चूक सरकारास कळेल आणि मग कृपादृष्टीनें आह्मी सरकारचे खरे भक्त ठरूं अशी आह्मास बळकट आशा आहे. आमच्या प्रगतीचें घड्याळ बंद पडलें इतकेंच नाहीं तर त्याचीं सर्व चक्रें अस्ताव्यस्त झालीं आहेत. वर्तमानपत्रें या पुढें सरकारच्या स्तोत्रपाठांनीं ओतप्रोत झालीं पाहिजेत पण सरकारची व इंडियनांचीं मनें परस्पराविषयीं कलुषित झालीं आहेत हें निर्विवाद आहे. अराजनिष्ठेची मीमांसा न्यायमूर्ती स्ट्रेची यांनीं केली आहे ती आज पासून वर्तमानपत्रकर्त्यांची गीता होय.

---

सरकारा विषयीं लेखानें किंवा भाषणानें असंतोष उत्पन्न करणें किंवा तो उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें गुन्हा होतो. परंतु सरकारच्या कार्याविषयीं अमान्यता दर्शविणें गुन्हा होत नाहीं आणि ही अमान्यता सरकारी हुकूम पाळण्याला व सरकारला मदत करण्याला प्रतिरोधक नसावी. असंतोष ह्मणजे संतोषाचा अभाव होय. त्याचा अर्थ सरकारा बरोबर असलेला विरोध, वैर, अप्रीती, तिरस्कार किंवा अन्य प्रकारची वाईट भावना असा होतो. असंतोषाला दुसरा समानार्थक शब्द ह्मणजे अराजनिष्ठा. या शब्दांत बहुतेक सर्व अर्थांचा समावेष होतो. प्रत्यक्ष बंड, राज्यक्रांती, किंवा जुलूमाची दांडगाई हीं कांहीं असंतोषाला आवश्यक नाहीं. सरकारा विषयीं असंतोष उत्पन्न होण्याची देखील जरूर नाहीं. कृती घडो किंवा निव्वळ प्रयत्नांतच तिचा लय होवो असंतोषजननाचा आरोप सारखाच लागूं पडतो. कांहीं प्रकारची टीका असंतोषकारक असेत पण त्या पासून सरकारच्यां कार्यां विषयीं फक्त अमान्यता दर्शित होते आणि ही अमान्यता अपराधाच्या स्वरूपाची होत नाहीं. सरकारच्या हुकूमाची बेअदबी होणार नाहीं व सरकारच्या राज्यव्यवस्थेला साह्य मिळत जाईल अशा प्रकारची अमान्यता गुन्ह्या खालीं येत नाहीं. ही मीमांसा अराजनिष्ठेची झाली. दुसरा अर्थ वरिष्ठ न्यायकोर्टा कडून प्रकाशित होई पर्यंत हाच अर्थ आह्मा सर्व इंडियनास शिरसावंद्य मानला पाहिजे. हा अर्थ विकत मिळण्या पूर्वीं एका उत्तम पत्रकर्त्याचा देह राजदंडाला बळी पडला ह्मणून आह्मी ही अक्कल मोठ्या अपूर्वतेनें प्राणाहून ही श्रेष्ठ मानण्यास शिकूं.

---

पुण्या मुंबईच्या बातम्या संबंधानें वातावरणांत हल्लीं उल्कापात होत आहेत. लार्ड हामिल्टन यांनीं मागें जें भविष्य सांगितलें तें निदर्शनास येत आहे. पण दुःखाची गोष्ट कीं लेफटनंट एअर्स्ट व रॅांड यांचे वध करणाऱ्या चांडाळांचा नापत्ता आहे. जादा पोलीस बसविलें, सरदार नातूंस बंदींत टाकलें, प्रतोद कर्त्यास काळ्या पाण्यावर पाठविलें, नामदार टिळकांस तुरुंगवासाची शिक्षा दिली, 'पुणेवैभव' कर्त्याचा खटला चालूं आहे, आणि 'मोदवृत्ता' वर खटला चालणार आहे परंतु खुनाच्या बातमीचा लेशमात्र देखील नाहीं. सर्व प्रकारचे संहारक उपाय एकदम चालूं केले आहेत.

परंतु खुनी माणसांचा पत्ता कोठें आहे! पुण्यासारख्या शहरीं असे खून व्हावे व त्याचा पत्ता तेथील अनुभवी व हुशार पोलीसला अगर सरकारचे नव्या लाडक्या प्युनिटिव्ह पोलीसाला ही लागूं नये ही वाईट गोष्ट आहे. खूनी माणूस तर अजून या पोलीसच्या कमकुवत पणाबद्दल हसून गर्वानें छाती काढून फिरत असेल!

ह्या पोलीसांनीं काय गोंधळ चालविला आहे ह्याचा कांहीं थांगच लागत नाहीं. गेल्या नारळी पौर्णिमेचे सुमारास दोघां हिंदूस मुंबईहून धरून नेलें. त्यांनीं पुण्यास काय जबान्या दिल्या ह्या आजपर्यंत गुलदस्तांतच होत्या. परवां त्या दोघां पासून जामीनही घेतले. परंतु मौजेची गोष्ट ही कीं पूर्वींच्या जबान्या पोलिसच्या दपटशामुळें व त्यांच्या ताब्यांत असल्यामुळें दिल्या असें ते आतां सांगतात. यावरून आपणा तिऱ्हाईतास मथितार्थ कांहींच काढता येत नाहीं. पोलिस तर लबाड नसेलच परंतु पूर्वींच्या जबान्या अगर कबूल जबाब प्रसिद्धपणें घेतले नसल्यामुळें ह्याही गृहस्थांस खोटें ठरवितां येणार नाहीं.

---

'पुणे वैभव' पत्राचे संपादक रा. रा. नारायण गणेश केळकर व प्रकाशक रा. रा. बळवंत कृष्ण पुरंदीकर यांजवर 'पुणे वैभवा'च्या ११ एप्रिलच्या अंकांत प्लेग प्रकरणा संबंधानें लिहिलेल्या लेखांनीं सरकाराविरुद्ध अराजनिष्टेची प्रेरणा करण्याचा प्रयत्न केल्या बद्दल गेल्या बुधवार पासून मुंबईच्या सेशन कोर्टांत नामदार स्ट्रेची साहेबा समोर खटला चालूं होता. जूरीमध्यें मतभेद पडला. ५ जण एका मताला व ४ जण उलट मताचे होते. आरोपींवर पुन्हा दुसऱ्या जुरी पुढें खटला चालावा असा हुकूम झाला. पुन्हा खटला चालविणें ह्मणजे खरोखर, मोठा दुःखाचा प्रसंग! लोकहिताच्या गोष्टी अशाच धोक्याच्या, सरकारच्या शिक्षेच्या पण लोकवंद्यतेच्या असतात!

---

नामदार टिळक यांचा खटला प्रिव्ही कौंसिल समोर नेण्याची परवानगी नामदार न्यायमूर्ती चीफ जास्टिस फॅारन यांजकडे मागितली आहे. या अर्जांत मुख्य मुद्दे असे आहेतः—

( १ ) राजद्रोहाबद्दल खटला करण्याची सरकारची मंजुरात कायद्या प्रमाणें पुरेशी नाहीं. ( २ ) ही मंजुरात योग्य प्रकारची नसल्यास सेशन कोर्टास हा खटला चालविण्याचा अधिकार पोंचतो काय? ( ३ ) जज्यांनीं खटला समजून देतांना जूरीला चुकीचा कायदा सांगितला काय! आणि [ ४ ] सरकार तर्फेचा पुरावा काय होता? या अर्जीचा विचार नामदार फारन व स्ट्रेची या या दोन न्यायमूर्ती पुढें गेल्या शनिवारीं चालणार होता. पण बारिस्टर्स प्यु व गार्थ विलायतच्या आगबोटीनें निघाल्या मुळें हा अर्ज पुढील आठवड्यापर्यंत तहकूब राहील.

---

'मोदवृत्त' कर्ते रा. रा. काशिनाथ वामन लेले हे फार आजारी असल्यामुळें त्यांचा खटला पुढील सेशनपर्यंत तहकूब ठेवण्यांत आला. राजश्री लेले यांच्यातर्फे बॅरिस्टर रॅाबर्टसन आहेत. प्रतोदपत्रावरील अपील हायकोर्टाच्या फूल बेंचापुढें चालणार आहे असें कळतें.

---

## The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 20, 1897

Mr. Tilak is sentenced to 18 mouths' rigorous imprisonment. So ends the memorable trial casting a deep gloom over the whole nation. Doubtless the Anglo-Indian press which is mainly responsible for these trials, is jubilant over the event. Intense excitement sinks into utter despair and hopelessness. Let us analyse the trial a little.

In the interests of law we must bow down to the judgment of the Bombay. High Court at the Criminal Sessions on the Hon'ble Mr. Bal Gangadhar Tilak. That judgment lays down the law of sedition and we must accept it as gospel truth until it is reversed and set aside. Law has its own victims. And we are sorry that the penal law is in full swing against a poor loyal subject of Her Majesty the Queen-Empress. Pity that sedition is brought home to him who is the staunchest adherant and the best product of the British rule in India. The Indian press trembles under the iron rod of a penal provision. The section of sedition thrusts new lessons and terrors in the hearts of Indian journalists when we read it in the light of the learned disquisition of the Hon'ble Mr. Justice Strachey. The judgment practically asks us to close our offices if we do not fill in our columns with praises and songs in honor of the administrative machinery. The lip-praises will save us from the thraldom of the jail; but to a loyal and truthful mind of the type of Mr. Tilak's.

"Stone walls do not a prison make

Nor iron bars a cage."

The system of a jury-trial is not the surest way to attain to justice especially in India. It is the best means available. It is a human machinery with inherent imperfections. Mr. Tilak had to take his trial before a group of jurors of whom 5 were Europeans, one Jew, 2 Hindus and one Parsee. The vigor, eloquence, and decisive opinions of the judge formulated the verdict of the jury. Unanimity was found impossible and a majority of six against 3 gave weight, dignity and practical turn to the summing up of the judge. It was afterwards a light job to take up the verdict and to give a signal and triumphant finish to the trial. Mr. Tilak goes to jail and we hope he will bear up with fortitude the iniquities of law. The highest aims of law are justice pure and simple; but sometimes the effects of law—and that too misunderstood and misread in the *idols* of a few gentlemen—are most unjust, and ruinous. The judgment of the Bombay High Court has revolutionized our ideas of sedition. We were ignorant of the cheap *disaffection* the Penal Code provides against. The Hon'ble Mr Tilak is a victim to the Penal Code with its judicial commentary. With such a powerful and despotic law in hand the Government can crush the liberty of the press and we are awakened to tremendous and gigantic powers of our Government. If an apology could help us for our writings in the past we submit it with a humble prayer that the law of sedition, as read and explained by the Hon'ble Mr. Justice Strachey, is more seditious in its effects.

The Hon'ble Mr. Justice Strachey paid a tribute to Mr. Tilak when he appreciated his towering influence, his high learning, and his mental capacity of the highest utility. He recognizes in him a useful *force* in the State but he regrets the misuse of Mr. Tilak's abilities. If so, we think that ends of law will have been quite satisfied if the so-called justice has been tempered with mercy. The triumph of law was enough with the assertion of conviction. Simple fine would have taught to Mr. Tilak to desist from his seditious writings because he is loyal to the core and he will gladly wait till time changes the current views of sedition But no! The lip-sympathy of the judge fell short and a *useful force* in the state is sacrificed at the altar of law. The punishment exasperates people and makes, we confess at the penalty of a similar punishment, people's minds more disaffected and estranged. A wide gulf opens the breach and we are extremely sorry for such a sad result. It is a bad policy to institute state-prosecutions on legal quibbles when education, warning and a threatening mood will have silenced people. Loyalty of the Indian people is unimpeachable and hence we say that the sooner the alienations of people's hearts are remedied the better.

We have been from the beginning against these State prosecutions of Native journalists. It indeed lowers the dignity and nobleness of a powerful and benevolent Government like the British administration. Vocal or written seditions have no meaning and significance with people of all grades and social standings. If so, the Government ought to be humane and not vindictive. A golden proposal is before the Lieutenant Governor of Bengal in this connection. The Hon'ble Mr. Surrendranath Bannerji as Secretary of the Native Press Association has addressed the Bengal Government in the following eloquent manner:—

"We need hardly assure your honour that freedom of speech and writing is one of the greatest blessings of British rule, beneficial alike to the people and the Government, and restrictions imposed upon it would not only deal a heavy blow at the cause of progress and enlightenment, but would deprive the Government of a valuable index of popular feeling. In times of excitement the services of a free Press can scarcely be exggerated. In the language of a well-known London daily paper "it is no mere sentiment in favour of free speech that has led the practical English people to allow absolute freedom to the Press of India." To deprive the Press of its freedom is to sit on the safety-valve, inviting more serious disaster. For our own part, we may say that we disclaim all sympathy with writings which are calculated to create disaffection towards British rule. We condemn them at being alike foolish and unpatriotic; for the history of British rule in India, notwithstanding its defects and drawbacks which all must admit, has been the history of an enlightened and progressive administration; and we feel that the advacement of the people in the paths of progress is bound up with the continuance of British rule and the peaceful maintenance of the existing order of things. We cannot believe that an educated and patriotic Indian who is familiar with the history of British rule in India and can form an intelligent forecast of the possibilities of good to his countrymen which are associated with its stability, can really persuade himself to indulge in the language of sedition. If carried away by the excitement of the moment, writers in the Press may occasionally overstep the limits of legitimate criticism, and so far forget themselves as to indulge in seditious writing, we venture to submit that the existing law is amply sufficient to deal with them. That, indeed, is the opinion of high authorities, such as Mr. Justice Budrudin Tyabji of the Bombay High Court and others. In this connection we desire to make a suggestion to which we are confident your Honour will be pleased to extend that sympathetic consideration which your Honour is accustomed to bestow upon all proposals made by public bodies and calculated to secure to the orders of Government the active support of public opinion. We desire to submit that when Government considers any writing in the Press as being seditious, the writer should not in the first instance be prosecuted, but that his case should be referred to the Press Association to be dealt with by that body; and if, in spite of any warning which the Association may administer to him the writer should again be found to indulge in similar writings, he may be prosecuted according to the law. Such a prosecution would then be undertaken with the full concurrence of public opinion, and the offending journalist would fail to secure t himself much of that popular sympathy which generally attends a State prosecution. Further, in most cases the warning addressed by the Association will suffice, for the offending journalist will then feel that if there was to be a prosecution after such a warning, he would be left alone to make his defence, unsupported by the sympathy of his colleagues in the Press."

## वऱ्हाड

हवामान— थोडा पाऊस होऊन उघाडो ही चांगली आहे. हवा आरोग्य कारक आहे. एकंदर पाणी २० इंच झालें. दुष्काळाचा कडाखा कमी कमी वाटत आहे.

रा० रा० माधवराव अण्णाराव तहशिलदार जळगांव यांस आजारी पणाबद्दल सहा महिन्यांची रजा मिळाली आहे.

आणि त्यांच्या रजेंत मौलवि रहितुल्ला हकीमुद्दीन तहशिलदार. मलकापूर यांनीं आपली रजा रद्द केल्यावरून त्यांस जळगावांस बदललें.

डिपार्टमेंटल परीक्षे संबधोंन पुष्कळ आफिसर मंडळी उमरावतीस एकत्र झाली होती ती या आठवड्यात आपापल्या जागीं दाखल होईल.

न्यायमूर्ती आर० आवर्ड साहेब हे हैदराबादेहून परत गेल्या शनिवारीं आले. यांच्या, नामश्रवणानेंच पुष्कळास त्यांच्या गुणाबद्दल मोठी आनंद वाटतो.

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे ए० अ० कमिशनर, मलकापूर तीन महिन्यांची रजा घेणार असून त्यांच्या रजेंत मि. सुब्रायलू नायडू ए० अ० कमिशनर यांस यवतमाळाहून बदलणार असल्याचें कळतें.

पूर्व संकेताप्रमाणें काल रविवारीं वऱ्हाड सामाजिक सभेमार्फतें येत्या सोशल कान्फरन्सचे व्यवस्थेसंबंधानें विचार करण्यासाठीं उमरावती येथील लायब्ररींत सामाजिक सुधारकांची सभा भरणार होती.

पुसदचे तहशिलदार मि० विठूजी नारायण यांनीं सहा महिन्याची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं मि० रघुपतराव तहशिलदार यांची बदली झाली.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९१ रुपये |
| जवारी | ९५—१०५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १३५ रु० |
| ,,( बनशी ) | १५० रु० |
| चणे | १३५ रु० |
| तेल | ६।।।= रु० मण |
| तूप | ८।।। मण |
| सोनें | २५!।। तोळा |
| चांदी | ७३ |

नोटीस

रा. रा. सुरजमल सीवबकस मारवाडी राहणार लाखनवाडा तालुके बाळापूर जिल्हे अकोला यांस:—

नोटीस देणार गिरधारीलाल सीवबकस मारवाडी राहणार इसोली तालुके चिखली जिल्हे बुलडाणा याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आदमासे दोन वर्षे होऊन गेलीं त्यावेळेस तुमचा आमचा ठराव असा जाहला कीं ५००० पांच हजार रुपये तुह्मी आह्मास द्यावे. असा ठराव जाहला त्याचा तपशील.

१००० जवारी खंडी ११ अकरा देण्याचे रुपये हजार मध्यें.

१००० सोनें तोळे ३५ रुपये हजार मध्यें देणें.

२००० रुपये नगद देण्याचें.

१००० सदरील पांच हजारापैकीं बाकी राहिलेले हजार रुपये कार्तिक माशीं फैसल झाल्या दिवसापासून येत्या कार्तिकापर्यंत दरशेंकडा ०८ आणेप्रमाणें व्याजासुद्धां देण्याचें ठरलें आहे.

———

५०००

सदर्हु वर नमूद केलेल्या कलमापैकीं तुह्माकडून आह्मास ७ खंडी जवारी मिळाली व १८१० अठराशें दहा रुपये रोख दिले व सोनें तोळे ८४ आठ तोळे चार मासे तुह्मी दिले. बाकी सदरील लिहिलेल्या कलमापैकीं जे जे आमचें घेणें नगदी जवारी सोनें व या सर्वत्राचें व्याज असे मिळून ही नोटीस पावले दिवसापासून १५ दिवसाचे आंत निकाल करावा. व आह्मास तुह्मापासून जी जवारी राहिलेली घेणें आहे ती तुह्मास मागितली असतां तुह्मी दिली नाहीं सबब आतां आह्मास जवारी घेणें नाहीं. आज मित्तीस जवारीचा बाजारभाव जो आहे त्याप्रमाणें दाम घेतले जातील. येत्या कार्तिकमाशीं नगदी रुपये १००० एक हजार व्याजासुद्धां टरल्याप्रमाणें आणून द्यावें, न दिल्यास याजबद्दल काम चालविलें जाईल.

सदर्हु नोटिशीत कळविल्याप्रमाणें वरील कलमवारीचा निकाल तुमच्याकडून दिलेल्या मुदतींत निकाल न केल्यास तुमचेवर रितीप्रमाणें काम चालविलें जाईल. व खर्चासमेत जें नुकसान अखेर निकाल होईपर्यंत तें भरून घेतले जाईल कळावें तारीख १९।९।९७ इसवी.

सही

गिरधारीलाल शीवबकस मारवाडी राहणार इसोली

दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

मुंबईच्या एका मुसलमानीं वर्तमानपत्रकारास २४ तासांच्या आंत मुंबई सोडण्याविषयीं हुकूम झाला आहे. पोर्तुगीज लोकांच्या दमन कडे जातांना त्यांस वाटेंतच पकडलें आहे.

कानफुचूस एक वेळ ह्मणाला, धर्मशास्त्रांत हजारों बोधपर वचनें आहेत, पण त्या सगळ्यांचें सार एका वाक्यांत आहे. तें वाक्य असें—"दुर्विचार ह्मणून मनांत शिरूं देऊं नका. सत्य काय हें समजून त्याप्रमाणें न करणें ह्मणजे कमकुवतपणाच होय."

आपला शेजार उत्तम केव्हां ह्मणावा? जेव्हां शेजाऱ्याची रीतभात सच्छिलाची असेल तेव्हां. सच्छिलाकडे मन नित्य गुंतवलें कीं कधीं दुवर्तन होईल अशी भीतीच नको."

श्रेष्ठ तो कीं जो सच्छिलाकडे मन गुंतवतो, जो स्वसुखाकडेच मन गुंतवील तो अधम एकानें कानफुचूसास विचारलें "आपण काय हेतु बाळगतां? त्यानें उत्तर दिलें, "वृद्धास शांति देण्यास सांपडावी, मित्रास निर्मल चित्त, आणि तरुणास प्रेम हीं देण्यास सांपडावी हेच माझे हेतु."

ज्यांना सत्य कायतें कळतें त्यांची आणि ज्यांचें सत्यावर प्रेम आहे त्यांची कधींच बरोबरी होत नाहीं.

सच्छील मनुष्य आपलें हित साधूं लागला, तर त्यांत दुसऱ्याचें हित साधणा;

मर्कटसंन्याशी—माकडांची जात फार शाहणी असून कित्येक प्रसंगीं मानवी कृतीस लाजविण्यासारखींही अतर्क्य कृत्यें त्यांजकडून हात असतात; आणि त्यावरूनच मर्कटयोनींत संन्यासवृत्ति असावी असें कित्येकांनीं अनुमान केलेलें आहे. ह्या अनुमानसत्यतेचें एक अनुभविक उदाहरण बाबू काली कुमार मुजुमदार नांवच्या गृहस्थांनीं 'वसुमती' नामक बंगाली पत्रांत प्रसिद्ध केलें आहे; तें वाचनीय असल्यामुळें त्याचा संग्रह आह्मी मुद्दाम येथें करीत आहों.:—

गेल्या आषाढ मासीं गोलेंदो स्टेशनावरील एका बागणींत ४ माकडें शिरलेलीं तेथलि मजुराच्या दृष्टीस पडल्यावरून गाडीचीं दारें लावून त्यांस धरण्याचा प्रयत्न त्यांनीं केला; त्यांत एक सांपडलें व बाकीचीं ३ माकडें पळून गेलीं. तीं पळून गेलेलीं ३ माकडें कांहीं दिवस रस्त्या नजीकच एका झाडावर जाऊन राहिली होती. मनुष्यांची भीति त्यांना वाटत नसे. रस्त्यानें जाणारांपैकीं कोणीं केळें वगैरे पुढें केलें तर झाडावरून खालीं येऊन त्याचे हातांतून तें घेऊन तीं खात असत, इतकीं तीं माणसाळलेलीं होतीं; पण त्यांचा चमत्कार असा कीं बायकांनीं कांहीं जिन्नस पुढें केला तर त्याच्याकडे तीं ढुंकूनसुद्धां पाहतना; एवढेंच नव्हे; तर बायको आली तर तिजकडे पाठ करावी, अशी त्यांची वृत्ति !! इतकें असून एखादी बाई त्यांना त्रासच देऊन लागली तर बायको आली तर तिला १।२ चपराका देण्यास तीं कमी करीत नसत ! हें त्यांचें स्त्रीदर्शन विन्मुखतेचें तीव्र व्रत पाहून तीं माकडें संन्याशी वर्गापैकीं आहेत असें सर्व लोक ह्मणूं लागले. अशा रीतीनें हें मर्कटत्रय शांततेनें तेथें राहात असतां एक दिवस १०।१५ मुसलमान त्यांस धरण्याच्या हेतूनें तेथें आले व त्यांपैकीं एकानें त्यांस केळें दाखविलें. त्या आमिषाला भुलून एक माकड येतांच त्याच्या गळ्यास एकानें दोर बांधला व दुसरा शेपटी धरून वर उचलूं लागला; एकानें त्याच्यावर ब्लॅंकेट टाकून कांठीनें कांहीं फटकारेही दिले. ही त्याची विपत्ति पाहून झाडावरील दोन माकडांच्यानें राहवेना. तीं त्याच्या मदतीसाठीं ह्मणून खालीं आलीं; पण १०।१२ लठ्ठंभारत्यापुढें त्या बिचाऱ्यांचें तें काय चालणार ? तथापि त्यांनी होईल तितका प्रयत्न केला आणि कांहींच उपाय चालेना तेव्हां तीं झाडावर पळालीं. रस्त्यानें जाणारांपैकीं दुखीराम घोष नांवाचे मनुष्यास पाशबद्ध झालेल्या त्या माकडाची दया आली; परंतु ते मुसलमान त्याला सोडूं देईनात. शेवटीं त्या वाटेनें एक ह्मातारा मुसलमान जात होता, त्याला करुणा येऊन त्यानें हातांतील कोयतीनें त्याचें गळ्याचा दोर तोडून त्याला मोकळे केलें; त्याबरोबर ते झाडावर पळून गेलें. हें भूतदयेचें कृत्य मुसलमानांस सहन न होऊन त्यांनीं त्याचा चांगला रेंच काढला; ह्मणून दुखीराम त्या मुसलमानांवर फिर्याद करण्यासाठीं पोलिस ठाण्यांत गेला. त्यावेळीं मोठ्या आश्चर्याची गोष्ट अशी पाहण्यांत आली कीं तो पोलिस ठाण्यांत जाऊन पोंचतो आहे तों तेथें तीं तीनही माकडें समन्स केलेल्या माणसाप्रमाणें हजर ! एवढा चमत्कार नाहीं. तीं माकडें तेथून म्युनिसिपॉलिटीचे चेअरमन अंबिका बाबू यांचे घरीं गेलीं आणि झालेला सर्व प्रकार त्यांनीं खुणांनीं त्याला समजावून दाद घेण्याविषयीं त्याला हात जोडून विनंती केली ! पुढें बेंच मॅजिस्ट्रेटांपुढें जेव्हां हा खटला चालला, तेव्हां तेथेंही तीं तिन्हीं माकडें दत्त झालीं व आरोपीस आणि विशेषतः ज्यानें गळ्याला फांस घातला होता, त्या आरोपीस वळखण्याचे कामीं त्यांनीं खुणांनीं फिर्यादीला फारच चांगली मदत केली !! तें माकडांचें शहाणपण पाहून कोर्टांत जमलेली सर्व मंडळी थक्क होऊन गेलीं; आणि बेंच मॅजिस्ट्रेटाची आरोपींच्या कृत्याबद्दल बालंबाल खात्री होऊन त्यांस १५।१५ रुपये दंड त्यांनीं केला; एका ऑनररी मॅजिस्ट्रेटांनीं माकडाच्या गळ्यास त्यावेळेपर्यंत असलेला फांस काढून टाकण्याचा हुकूम केल्यावरून तो कापण्यास दुखीराम पुढें झाला. ही वेळपर्यंत त्या माकडाचा फांस कापण्यास जर कोणी आला, तर त्याला तीं फाडून टाकण्यास प्रवृत्त होत असत. ह्याचें कारण जणूं काय चौकशीच्या वेळीं कोर्टास दाखविण्यासाठीं त्यांनीं तो फांस पुरावा ह्मणून मुद्दाम राखूनच ठेविला होता !! पण कोर्टाचा हुकूम होऊन दुखीराम फांस कापण्यास येतांच त्यांनीं तो सुखानें त्याला कापूं दिला ! कोर्टांत जमलेल्या मंडळीनें त्या माकडांस मेवामिठाई, केळीं वगैरे मोठ्या कौतुकानें आणून घातली, व त्यांनींही तीं मोठ्या आनंदानें भक्षण करून जसा एखादा महर्षि भक्तजनांच्या कल्याणार्थ आपले वरदहस्त त्यांच्या मस्तकावर ठेवण्यासाठीं उभारितो, त्याप्रमाणें त्या मर्कट-संन्याशांनीं आपणांस मेवामिठाई खाऊ घालणाऱ्या मनुष्यांचें ईश्वर कल्याण करो असें जाणविण्यासाठीं आपले हात वर करून दाखवून रस्ता धरिला आणि त्या झाडावर तीं निघुन गेलीं ! मर्कटकृति तर खरीच, परंतु ती अत्याश्चर्यकारक व बोधपर आहे. ज्ञा. च.

ऑस्ट्रेलियांत १३ लक्ष ऐरिश लोक आहेत.

जर्मनींत ज्यांच्या घरीं नौकर असतील त्या घरमालकांनें आपल्या नौकरांचा विमा उतरलाच पाहिजे असा कायदा आहे.

ब्रह्मदेशांत सांभाऱ्यांत लाल मुंग्या वालण्याची व त्याच मुंग्याची निराळी उसळ करून खाण्याची चाल बरीच प्रचारांत आलेली आहे.

ऊष्ण हवेंत पिंवळ्या रंगाचे कपडे वापरणें हितकर आहे.

शत्रूच्या तोंडावर मोरचूत उडवितां येईल अशी एक बंदूक एका फ्रेंचानें तयार केली आहे.

झुलुलॅन्ड येथें पौर्णिमेच्या दिवशीं चंद्राचा इतका उजेड पडतो कीं, सात मैलावरील पदार्थ चांगल्या रीतीनें दिसतात. नुसत्या ताऱ्यांच्या प्रकाशानें छापील वर्तमानपत्र चांगल्या रीतीनें वांचतां येतें ह्मणतात. तेथें प्रकाशणारा चंद्र निराळा आहे. तो देश चंद्र लोकाच्या अगदीं जवळ आहे किंवा वरील गोष्टीस यापेक्षां दुसरें निराळें कारण आहे.

तुर्कस्थानचा सुलतान सगळ्या श्रीमान लोकांपेक्षांही धनसपन्न आहे. त्याच्या देशाचें दरसालचें उत्पन्न १० लक्ष पौंडांचें आहे. आज त्याच्याजवळ अतोनात संपत्ती आहे, पण त्यापैकीं फारच थोडा भाग तो तुर्कस्थानांत ठेवतो. त्याची ५० लक्ष पौंडाची रकम फक्त अमेरिकेंत पसरली आहे. गुराखी

पोहतां येईल तर लग्न— भूमध्यसमुद्रांत ग्रीसच्या किनाऱ्याबर हिमीया नांवाचीं कांहीं बेटें आहेत. तेथील लोक समुद्रांच्या बुडास जाऊन स्पंज काढितात व तो विकून त्यावर आपला निर्वाह करितात. टर्कीमध्यें स्नानाच्या वेळीं स्पंजानें अंग धुण्याचा रिवाज असल्यामुळें त्या लोकांस या धंद्यापासून फार किफायत होते. येथें मुलीनें अमुक खोलीवर जाऊन अमुक वजनापर्यंत स्पंज काढून आणल्या शिवाय तिला लग्न करूं देत नाहींत. कांहीं बेटांत या कामांत मुलगा चांगल हुशार झाल्या शिवाय त्यास कोणी मुलगी देत नाहीं. जो पाण्यांत फार उशीर राहतो आणि खोल जाऊन स्पंज आणतो त्यास मुलगी प्रथम मिळते. तर मग आपल्याकडे म्याट्रिक्युलेशन झालेल्या मुलाचा भाव वाढतो त्याप्रमाणें या लोकांत मुलाची किंमत त्याच्या पोहण्याच्या शक्तीवर वाढते असें दिसतें.

मिश्र पाण्याचा तलाव— एकाच सरोवरांत खारे आणि गोड पाणी असणारें एक चमत्कारिक सरोवर या पृथ्वीच्या पाठीवर आहे. ल्यापलंडच्या किनाऱ्यावर किलडीन नांवाच्या बेटांत हें सरोवर आहे. हें समुद्रापासून नजीक आहे. परंतु समुद्राचें पाणी बाहेरच्या अंगानें यांत कोठून येत नाहीं. तथापि समद्रांस भरती आली ह्मणजे यांतील पाणी थोडें वाढतें. यावरून जमिनीच्या आंतल्या अंगानें समद्राचें पाणी आंत येण्यास मार्ग आहे असें दिसतें. नदीनाल्याचें पाणी येतें तें याच्या वरच्या पृष्ठभागास रहातें तें फार गोड आहे. मधला पाण्याचा भाग मचुळ आहे आणि तळाजवळचा पाण्याचा भाग अगदीं खारट आहे. याच्या वरील भागांत गोड्या पाण्यांतील मासे सांपडतात आणि तळाजवळ खाऱ्या पाण्यांतील मासे सांपडतात. या पृथ्वीच्या पाठीवर काय काय चमत्कार आहेत तें काय सांगावें?

शाईचें सरोवर— अमेरिका खंडांत युनायटेड स्टेटसमध्यें अरिझोना नांवाचा प्रदेश आहे. त्यांत कोहा या नांवाच्या डोंगरांच्या ओळींत एक सरोवर आहे. त्याचें पाणी शाई सारखें काळें आहे त्यांत झऱ्यांतून पाणी येतें ते झरे स्वच्छ पांढऱ्या पाण्याचे आहेत परंतु त्यांतील पाणी सरोवरांवरील पाण्यांत मिसळलें ह्मणजे शाई प्रमाणें काळें कुळकुळीत होतें. यांतील पाणी गरम असतें आणि ठिकठिकाणीं त्याची उष्मा १०० पासून २।६ डिग्री असते. हें पाणी तेलकट आणि बुळबुळीत असतें. यांत रोग्यास १० मिनिटें पर्यंत तोंडास पाणी लागेल इतका खोल उभा करतात. नंतर त्यास बाहेर काढून सखलादींत गुंडाळून किनाऱ्यावरील वाळवंटांत बसवितात ह्मणजे त्यास चरचरून घाम येतो आणि त्याचा रोग नाहींसा होतो अशी त्याची कीर्ति आहे. अ० द०

मोत्यांचा पाऊस—चिकाकोल नवळ असावळी ह्मणून एक गांव आहे. त्या गांवीं तारीख २२ आगष्ट रोजीं फार मोठा पाऊस पडला. पाऊस पडण्याच्या सुमारास कांहीं शेतांत व बागांत मोत्यांचा वर्षाव झाला. हीं मोत्यें अगदीं लहान असून पाण्यावर तरंगत होतीं. त्यांपैकीं कांहीं मोत्यें लोकांनीं वेंचून ठेविलीं आहेत. मोत्यांचा पाऊस हा मोठा अद्भुत चमत्कार होय. तो होण्याचें कारण काय ह्याचा शोध सृष्टिशास्त्राच्या शोधकांनीं अवश्य लाविला पाहिजे. सु सू.

लंडन येथें कांहीं चावट पोरें ज्युबिलीच्या दिवशीं रस्त्यातून जाणाऱ्या येणाऱ्या बायकांचे मुके घेत सुटलीं होतीं ! सुधारलेलें राज्य !!

एक मिशी काढली—माणगांव तालुक्यांतील रावे येथील शेतकऱ्यांनीं दारू प्यावयाची नाहीं असा सक्त नियम केला आहे. हा नियम मोडल्याबद्दल एकाची एकच मिशी काढून टाकली.

चांदीचा भाव उतरला—हल्लीं मुंबईस ६८ रुपयाला १०० तोळे चांदी झाली आहे. याचें कारण यू. स्टे. अमेरिकेच्या पश्चिमेकडील वगैरे संस्थानांत बनावट नाण्यांत खऱ्या नाण्यांतील चांदीपेक्षां जास्त चांदी घातलेली आढळते. यामुळें शेंकडा ५० टक्के नफा पडतो असें कळलें आहे. यावरून आणखी भाव उतरेल असा संभव आहे. आ व.

इजिप्त येथील ख्रिस्ती लोकाविषयीं तेथल्या मुसमान लोकांचीं मनें अतिशय बिघडलीं आहेत. आणि ह्मणूनच ख्रिती लोक अतिशय काळजींत पडले आहेत असें लंडन टाइम्सकर्त्यास अलेक्झॅन्ड्रिया येथील बातमीदाराकडून समजलें आहे. दुसरें गेल्या पांच महिन्यापासून अलेक्झॅन्डिया येथील एक ब्रिटिच मनवार नाहीं त्यामुळेंहीं तेथें चर्चा चालू आहे. सौडनच्या लढाईचे संबंधांत फ्रेंच पत्र 'टेम्स' यानें इंग्लंडला अशी सूचना केली आहे कीं, फ्रान्सबरोबर पूर्वीं ज्या कबूलायती झाल्या होत्या त्यावर जर इंग्लंड लक्ष पोंचवणार नाहीं तर, सौडनचें संबंधांत एकट्या इंग्लंडचाच फायद्याचा भाग नाहीं हें त्याच्याकडून कबूल करविणें भाग पडेल. स. वि

विलायतच्या ४ थ्या तोफखान्यास हिंदुस्थानांत जाण्यास तयार असण्याचा हुकूम झाला.

लाहोरास पर्जन्याची धार सुरू असून लोक कंटाळले आहेत. हा पाऊस लवकर उघडला नाहीं तर एकंदर शेतांभातांची फार नुकसान होणार, असें तिकडील पत्रें लिहितात.

एक पुणेंकर मि. पी. के. चितळे नांवाचा विद्यार्थी विलायतेस डाक्टरची परीक्षा देण्याकरितां गेला होता, तींत तो पास झाला, आतां त्यास सिव्हिल सर्जनच्या सरकारी डाक्टरी खात्यांत जागा मिळण्यास मोकळीक झाली आहे.

प्रदर्शन— येत्या राष्ट्रीयसभेचे वेळीं उमरावती येथे शेतकीचें व उद्योगधंद्याच्या मालाचें प्रदर्शन उघडण्याचा तेथील मंडळीनें ठराव केला आहे व तें साल दरसाल राष्ट्रीयसभेप्रमाणेंच फिरतें भरवावयाचें, असा विचार आहे. क० त०

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नाराइण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Six monthly......... 3 .............. 8 as

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस.........८१ ०६

दुसरे खेपेस ..............८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Single copy ........................................ 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 4 as

Repetition Peline......3 a

VOL XXXI AKOLA MONDAY 27 SEPTEMBER 1897 NO 38

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८९७ इ० अंक ३८

## NOTICE

Notice under section 150 ( 1 ) of the Berar Municipal Law of 1886.

Notice is hereby given to the general Public that the Municipal Committee at Akola, have in their Special meeting held on the 15th September 1897, proposed the following rules under section 116 ( 1 ) ( e ) of the Law for the proper regulation and inspection of Public Sarais situated within the limits of the said Municipality. Any one objecting to the proposed rules may within thirty days from the date of this notice, submit his objections if any in writing to the under signed.

16th September 1897 } P. B. Limaye Secretary Municipality Akote.

### Rules

1. Public Sarais under the management of the Municipal Committee may be used by *bona fide* travellers only.

2. No traveller shall be allowed to reside in a Sarai for more than 72 hours continuously, except by express permission from a responsible officer of the Municipality.

3. The Committee may temporarily close a Sarai to the Public, and may divert it to a temporary special use.

4. Any person who suffers from an infectious disease or who misconducts himself may be removed from a public Sarai by any responsible officer of a Municipality.

5. Every Sarai under Municipal management will be supervised by the Chairman of the Sanitation Sub-Committee, who will primarily be responsible for its proper sanitation and up-keep and for the due observance of these rules.

6. The Committee may, at its discretion, reserve for the use of respectable travellers a room or rooms in any Public Sarai under Municipal management, and may charge fees for such reserved accommodation at the rate of four annas per room per diem.

7. Any person who infringes any of the rules specified above, shall, on conviction before a Magistrate, be punishable with fine which may extend to fifty Rupees.

16th September 1897 } P. B. Limaye Secretary for Chairman Municipal Committee Akote.

## जाहिरात

वऱ्हाड म्युनासिपाल कायद्यांतील कलम १५० ( १ ) अन्वयें नोटीस.

या जाहिरातीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोट म्युनासिपाल कमिटीनें ता० १५ माहे सपटेंबर सन १८९७ इसवी रोजीं स्पेशल सभा भरवून सदर्हु म्यु० कमिटीचे हद्दींतील सार्वजनिक धर्मशाळांची देखरेख व बंदोबस्त राहण्याकरितां व० म्यु० कायद्याचें कलम ११६ (१) (ई) अन्वयें खालीं लिहिलेले नियम सुचविले आहेत. यास कोणाची कांहीं तक्रार असल्यास ती त्यांनीं ह्या जाहिरातीचे तारखेपासून तीस ३० दिवसांचे आंत खालीं सही करणाराकडेस लेखी अर्जानें दाखल करावी.

P. B. LIMAYE

तारीख १६ माहे सपटेंबर सन १८९७ ई. } सेक्रेटरी म्यु. क. अकोट.

### नियम

१. अकोट म्यु० कमिटीचे ताब्यांतील सार्वजनिक धर्मशाळांचा उपयोग खास मुशाफर लोकांनींच केला पाहिजे.

२. कोणत्याही मुशाफरास म्यु० कमिटीच्यातर्फे जबाबदार अशा अधिकाऱ्याची लेखी अगर तोंडी परवानगी घेतल्याशिवाय एक सतत ७२ तासाहून ज्यास्त वेळपर्यंत धर्मशाळेंत राहूं दिलें जाणार नाहीं.

३. म्यु० कमिटीस थोड्या मुदतीपावेतों धर्मशाळा बंद करितां येईल आणि त्याचप्रमाणें थोड्या वेळेकरितां धर्मशाळेचा उपयोग एखाद्या विशेष कामाकडे करितां येईल.

४. एखादा इसम सार्वजनिक धर्मशाळेंत जर गैरवर्तन करील अगर एखादा इसम स्पर्शजन्य रोगानें पीडित असून त्या ठिकाणीं राहील तर त्यास काढून देण्याचा अधिकार कमिटीच्या तर्फे कोणत्याही जबाबदार ऑफिसरास आहे.

५. म्यु० कमिटीचे ताब्यांतील प्रत्येक धर्मशाळेची देखरेख करण्याचें काम सॅनिटेशन सब कमिटीचे चेअरमन यांचेकडेस सोंपविलें आहे. धर्मशाळांची स्वच्छता व दुरुस्ती बरोबर आहे किंवा नाहीं, त्याचप्रमाणें धर्मशाळांचे बंदोबस्ताकरितां केलेले नियम योग्य रीतीनें पाळिले जातात किंवा नाहीं याजबद्दल प्रथम जबाबदार सदर्हु ऑफिसरास धरिलें जाईल.

६. कमिटीस योग्य वाटल्यास सभ्य आणि कुलीन मुशाफराकरितां कोणत्याही, म्यु० क० ताब्यांतील, सार्वजनिक धर्मशाळेंत एखादी कोठडी अगर कोठड्या राखून ठेवितां येतील, आणि अशाप्रकारें राखून ठेविलेल्या राहण्याचे जागेबद्दल प्रत्येक दिवसाकरिता चार आणे दराप्रमाणें फी घेतां येईल.

७. जो कोणी इसम वर लिहिलेल्या नियमाप्रमाणें वागण्यास चुकेल तो म्याजिस्ट्रेटा समोर गुन्हेगार ठरल्यास ५० रुपयापर्यंत दंडाचे शिक्षेस पात्र होईल.

P. B. LIMAYE. Secretary.

ता० १६ माहे सपटेंबर सन १८९७ इ. | For चेअरमन म्यु० क० अकोट.

## जाहिरात

### नाशिकचा माल

चांदी, पितळ, व तांबें वगैरेचीं भांडीं उपकरणीं वगैरे सोन्याचे दागिने सुद्धां हरएक प्रकारचा माल घेऊन व्ही. पीनें पाठवूं. कमिशन रुपयास ६ पै.

पत्ता— आबाजी सिताराम मोडक नासिक

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध १ शाके १८१९

शनिवार ता० ४ मिनहू रोजीं "मुंबई प्रेसिडेन्सि असोसिएशन" मंडळीनें मि० वाचा आणि प्रो० गोखले यांच्या सन्मानार्थ एक सभा भरविली होती. सर्व वर्गांतील प्रमुख लोक सभेस हजर असून लोकांची इतकी गर्दी जमली होती कीं, सभागृहांत बसण्यास जागा मिळेना. मुंबई कौन्सिलचे नुकतेंच नेमलेले सभासद डा० भालचंद्र यांस सर्वानुमतें अध्यक्ष निवडलें. वेल्बी कमिशना पुढें झालेल्या देशी गृहस्थांच्या साक्षीचा तपशील, जो अँग्लोइंडियन पत्रांनीं दिलेला आहे तो, कित्येक ठिकाणीं हेतुपुरःसर खोडसाळपणाचा आहे असा एक उल्लेख आनरेबल डा० भालचंद्र यांनीं सभेचे अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत आला. आणि त्याच उल्लेखा बद्दल टाइम्स आफ इंडियानें, आपल्या ब्रीदास जागून, डाक्टर मजकुरांस "पागल अथवा खपती" ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सरकारांतून प्रसिद्ध झालेल्या ह्या साक्षिदारांच्या जबान्या विषयीं मि. सुब्रमण्य अय्यर ह्यांचें ह्मणणें, मि० चेम्बर्स ह्यांचें ह्याच सभेंत या विषयींचें झालेले जोरदार भाषण, इत्यादि गोष्टी विचारांत घेतल्या असतां टाइम्स आफ इंडियाचा क्षुद्रपणा सहज कळून येईल. असो. अध्यक्षांचें भाषण झाल्यावर मि. वाचा यांचें भाषण झालें. त्यांतील गोषवारा पुढें दिला आहे:—

मुंबईतील भयंकर रोग व तो हटविण्याचा सरकार आणि मुयुनिसिपालिटी यांनीं केलेला स्तुत्य प्रयत्न, कारपोरेशनचे कांहीं प्रमुख सभासद व मि० याज्ञिक यांचा शोकजनक मृत्यु, आणि मेसर्स रँड आणि आयर्स्ट ह्यांचे भयंकर खून ह्या विषयीं समयोचित असे उद्गार प्रथम काढून नंतर मि० वाचा वेल्बी कमिशनच्या हकीकतीकडे वळले. ते ह्मणाले कीं हें कमिशन स्थापन झालें तेव्हांच सर्वांनीं भाकीत केलें होतें कीं, या पासून आपला कांहीं विशेष फायदा होणार नाहीं, आणि हें भाकीत आतां खरें होण्याची वेळ आली आहे. सर्व प्रकारच्या राजकीय खर्चाशीं राजकारणाचा संबंध आहे; परंतु ज्यांत राजकारणाचा संबंध आहे अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार करण्याचा अधिकार ह्या कमिशनास मुळींच नाहीं. या मुळें कमिशनापुढें चौकशी करितां आलेल्या विषयांचा प्रदेश अत्यंत संकुचित होता. आपल्या देशांतील सरकारी खजिन्याची जी हल्लीं निकृष्ट स्थिती झाली आहे ती कांहीं तरी कमी व्हावी ह्मणून "होम चार्जिस" मध्यें मात्र काय ती काटकसर करण्यांत येईल. ज्या बाबतींत इंग्लंद आणि हिंदुस्थान ह्या उभय देशाचाही संबंध आहे अशा बाबतींत एकट्या हिंदुस्थानावर तो खर्च न लादतां त्यांतील बरीच ठळक रक्कम इंग्लंदानें द्यावी अशा विषयीं सरकारतर्फेचे साक्षीदार यांची एकवाक्यता झाली. ह्या खर्चाच्या वाटणी शिवाय जर अधिक कांहीं कमिशनच्या हातून होईल तर ती मोठ्या नवलाची गोष्ट समजावी !

या नंतर सन १८७१–७४ सालीं हिंदुस्थानांतील खर्चासंबंधीं विचार करण्या करितां जी पार्लमेन्ट कमिटी बसली होती तिची व हल्लींच्या कमिशनची तुलना मि. वाचा यांनीं केली आणि या तुलनेंत, सभासद, साक्षिदार, विषय वगैरे प्रत्येक बाबतींत हल्लींचें कमिशन मागील पार्लमेन्टरी कमिटी पेक्षां अगदीं हलक्या प्रतीचें आहे असें सिद्ध केलें. आणि ह्मणाले कीं, ह्या कमिशनच्या रचनेंत आणि कार्यांत अशा प्रकारचे दोष असल्यामुळें त्या पासून आपल्यास फारच अल्प फायदा होईल. ह्यांनीं स्वतः आणि इतर प्रजेच्यातर्फेच्या साक्षिदारांनीं जितकी ह्मणून माहिती मिळणें शक्य होतें तितकी मिळवून ती कमिशन पुढें मांडिली आहे. या देशांत चालू असलेली खर्चाची विलक्षण वाढ, हिंदुस्थान आणि इंग्लंद यांच्या सामाईक हितसंबंधीं खर्चाची वाटणी, आणि राजकीय खर्चाच्या प्रस्तुतच्या व्यवस्थेंत असलेले दोष व ते काढून टाकण्याचा उपाय ह्या इतक्या बाबतींत कमिशन पुढें माहिती दिली. सदरहू पुरावा हल्लीं लोकांपुढें छापून प्रसिद्ध झालेला आहे आणि त्याची योग्यता काय आहे ती त्यानीं ठरवावी

मि० सुब्रमण अय्यर यांनीं वेल्बी कमिशन संबंधी आपला अनुभव आणि मत थोड्याच दिवसांपूर्वीं मुंबईस भरलेल्या सभेंत सांगितलें होतें. मि. वाचा यांचा अनुभव आणि मत हीं मि. अय्यर यांच्याच प्रमाणें आहेत.

इंग्लंडांत जी ब्रिटिश कांग्रेस कमिटी आहे तिच्या संबंधीं मि. वाचा यांचा फार चांगला अभिप्राय आहे. ह्या कमेटीच्या हातून हिंदुस्थानची सेवा उत्तम रीतीनें बजावली जात आहे ह्मणून तिला आपण पूर्ण

मदत केली पाहिजे, असें ते ह्मणाले.

दैव पाठमोरें झालें ह्मणजे हिरा देखील गार होतो नामदार बाळ गंगाधर टिळका सारखें लोकरत्न निर्माल्यवत् झालें. इंग्रज सरकारास माणसाची किंमत कळत नाहीं असें दुःखा झालनें ह्मणावें लागतें. खुनी, मारकरी, चोर, डांकेखोर इत्यादि पातकी मनुष्या बरोबर त्या पुण्यश्लोक धुरंधरांत शरीर कष्टानें राजकीय अवकृपेचें प्रक्षालन करावें लागत आहे. राजनिष्ठेच्या मूळ आधारस्तंभावर असा सरकारी विद्युत्पात झाला ही गोष्ट सरकारास व प्रजेस कल्याणकारक नाहीं. कायद्याच्या शाब्दिक कोल्यांनीं 'केसरीचे' लेख अराजनिष्ठेचे ठरविले आणि नामदार टिळकांस न्यायाच्या कारणासाठीं बळी दिला. वहिमी स्वभाव जगाच्या इतिहासांत सर्वश्रुत आहे. संशायांचें ठाणें वसलें ह्मणजे सर्व मनोरथ विपरीत फलदायी होतात असें लोंक ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे. संशया सारखा घातुक मनोविकार दुनियेंत दुसरा नाहीं. या संशयीपणाच्या पायीं सरकारानें इंडियनांच्या राजनिष्ठेवर गदा मारली हें देशाचें दुर्भाग्य होय. प्रभुसत्ता गाजविली पण ती प्रजाजनांच्या असंतोषाला कारणीभूत झाली. नामदार टिळकांस शिक्षा झाली हा मोठा अनर्थ आहे. वर्तमानपत्रांचें स्वातंत्रय विलयास गेलें; प्रजेच्या मनांला कुलूपें लागलीं आणि राज्यकर्ते व प्रजा या मधील प्रेमभावांत मोठें अंतर पडलें. प्रस्तृतच्या वातावरणा वरून असें भविष्य निष्पन्न होतें कीं सर्व प्रगतीच्या गोष्टि सुमारें पन्नासशें भर वर्षांनीं मागें सरल्या आहेत.

**इंडियनांची राजनिष्ठा अत्युत्तम कोटींतील आहे आणि ती आत्मलाभाच्या पायावर स्थीर, पर्वतप्राय व चिरस्थायी झाली आहे. जर इंडिया देशाला आनंदाचे दिवस यावयाचे असतील तर ते इंग्रजी अंमला खालींच येतील. राजनिष्ठेची बळकट कांस धरल्या नंतर जर सरकाररूपी कामधेनू आह्मास लाभणार नाहीं तर आह्मी नष्टप्राय आहों.** आमचा इतिहास आटोपला नसेल, इंडियन राष्ट्राचे सुखाचे दिवस पुढें असतील आणि इंडियनांच्या कल्याणराशी एका वैभवशाली राष्ट्रदर्शनानें अनुभूत होणार असतील तर आमचे राज्यकर्ते आमच्या राज्यनिष्ठेवर पूर्ण भरंवसा ठेवतील, अन्यथा स्वप्नें देखील पडूं देणार नाहींत आणि आज पर्यंतच्या राजमान्य मार्गानेंच प्रगती चालूं ठेवितील.

इंग्रजी राज्याचा इंडियाशी संबंध जुळल्या पासून राज्यकर्त्यांच्या सुखवैभवाच्या दिवसांस प्रारंभ झाला. राज्य इतकें वाढलें कीं आमच्या महाराणी सरकारच्या राज्यावर सूर्य मावळतच नाहीं. संपत्ति इतकी वर्धमान झाली कीं इंग्लिश राज्य वैभवशिखराला पोंचलें आहे. तसेंच इंडिया सारख्या विद्यापीठाशी संबंध जडल्या कारणानें इंग्लिश राज्यांत सर्व प्रकारच्या नैतिक, राजकीय, व सामाजिक सुधारणा मोठ्या झपाट्यानें होत आहेत. इंडिया नाहीं तर इंग्लिश राज्याला किंमतच नाहीं. इंडिया देश ब्रिटिश राज्याचा जीव कीं प्राण बनला आहे. संबंध उभय देशांस परिपोषक आहे. इंडियाचा अभ्युदय इंग्रजी काळा पासूनच सुरू झाला. त्यां पूर्वी या देशाची मोठी अनवस्था होती, एक रसातळास चाललेलें राष्ट्र पुन्हा उभारण्यांत आलें ही इंग्लिशांची प्रभुकृपा होय. परस्पर परिपोषक असा हा राजकीय संबंध मौलीभूत आहे आणि त्याच्याच प्रभावानें भाषाभेद, धर्मभेद, वर्णभेद, स्थलभेद इत्यादि भेदक गूण नाहींतसे झाले आणि इंडिया व ग्रेटब्रिटन हे देश एकजीव बनत चालले आहेत कल्याणकारि संबंधांत अंतराय पडण्याचीं पूर्व चिन्हें दिसतात ह्मणून आह्मी नम्रतेनें सरकारास कळवितो कीं आह्मा इंडिनांची सर्व धनदौलत राजनिष्ठेंत आहे तेव्हां तिजविषयीं कातरता, संशय, किंवा द्विधाभाव ठेवूं नये. आमच्या सरकारची बुद्धि सद्भावनेकडे सदासर्वकाळ राहो अशी आमची परमेश्वरास प्रार्थना आहे.

गोळाबेरजेनें पुष्कळ गोष्टी आपण व्यवहारांत घेत असतो. ही रीती आमच्या सरकारास ठाऊक नसावी असें नाहीं. नामदार टिळक यांच्या कांहीं लेखांनीं अराजनिष्ठेला प्रेरणा झाली असें गृहीत धरलें तरी त्यांच्या हातून घडलेली राजसेवा थोडी तरी लक्ष्यांत घ्यावयाची होती. विद्यादानाला विलक्षण मदत केली, कायदेकौंसिलांत चांगला राजमान्य सल्ला दिला, आणि प्रजेला राजधर्माचा उपदेश केला या गोष्टी राजसेवेची साक्ष देतील. नामदार टिळकांचें चरित्र गोळाबेरजेनें समजून घेतलें पाहिजे होतें. सत्कृतीला बक्षीस देणें हा गुणग्राहीपणा झाला पण सत्कृती विसरून काल्पनिक अपकृत्या बद्दल शिक्षा देणें ह्मणजे हा गुण कृतघ्नपणाचा आहे. कायद्याच्या गोष्टी कांहीं असोत, सरकारानें लोकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवावा आणि नामदार टिळक यांस शिक्षांमुक्त करण्याची भिक्षा सर्व इंडियनांस घालावी. दयेनें मनुष्य विरघळतो, आणि तो कसा ही असला तरी कृतज्ञतेनें मोठा उपयोगीं होती अराजनिष्ठा वाढूं नये, प्रजेवर अराजनिष्ठेबद्दल दहशत बसावी आणि राज्य सुयंत्रपणें चालावें हा जर सर्व कायद्याचा हेतु असेल तर तो नामदार टिळकांच्या शिक्षेनें निष्फळ झाला असें आह्मीं निश्चयपूर्वक सांगतों. नामदार टिळका सारख्या अग्रेसरांस शिक्षा प्रजेच्या समजुती प्रमाणें विनाकारण आहे. ही शिक्षा सर्व इंडियनांस झाली असें आह्मी ह्मणतों. प्रजाजनांचीं शहाजोग नररत्नें हिसकावल्यानें प्रजा संतुष्ट रहात नसते हें आह्मी नम्रपणानें व मोकळ्या मनानें सरकारास कळवितों. आमच्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ आह्मी टिळकफंडाचेंच उदाहरण देतों. या फंडाचे आश्रयदाते चांगले चांगले इंडियन लोक आहेत. नामदार टिळकांची शिक्षा नामदार साहेबांस लोकमान्यतेंत अत्युच्च स्थानास पोंचवलि, त्यांच्या विषयीं आदरबुद्धि व पुज्यभाव उत्पन्न करील आणि त्यांच्या देहदंडा बद्दल लोकांचीं मनें दुखावतील तर ही शिक्षाच होईल किंवा नाहीं हा वाद सरकारानें निर्णीत करावा. प्रेमानें प्रेम वाढतें. हा सहानुभूतीचा सिद्धान्त आमच्या सरकारास पक्का माहित आहे तेव्हां सरकारची क्षमा व दया या संकटसमयीं प्रकट होतील अशा आशाधनावर आह्मी स्वस्थचित्त राहतों.

विपदा विपदेला जोडते असा जनप्रवाद आहे. ह्याची सत्यता नामदार टिळक यांच्या खटल्यांत गेल्या शुक्रवारीं आली. कायद्याचीं जाळीं विचित्र असतात ह्या मध्यें नामदार टिळकांचा अर्ज गडप झाला. नामदार टिळकांच्या प्रकरणांत प्रिव्ही कौंसिला कडे कायद्याच्या व न्यायदानाच्या प्रश्ना संबंधानें अपील करण्याविषयीं परवानगी मागितली होती. ही दाद नामदार न्यायमूर्ती फारेन, क्यांडी व स्ट्राची या न्यायाधीशांनीं देता येत नाहीं असा निकाल केला. परवानगी मिळाली असती तर विशेष बरें झालें असतें. परवानगी दिली नाहीं या बद्दल अपील चालतें आणि बारिस्टर्स प्यु व गार्थ हे विलायतेस पोचल्या नंतर या अपीलाच्या कामाला लागतील. प्रस्तुत स्थितींत Disaffection चा अर्थ भलताच झाला. नामदार टिळकास वृथा शिक्षा झाली, लोकांचीं मनें क्षुब्ध झालीं इत्यादि गोष्टी आह्मी लिहिणार नाहीं परंतु सरकारानें त्या विसरूं नयेत. नामदार टिळकांस राष्ट्राच्या सहानुभूतीनें व परमेश्वर कृपेनें हा देहदंड सुलभ जावो. 'प्रतोद' पत्राचे प्रकाशक व मालक या उभयतांस हातकड्या घालून पायात बिड्या घालून साताऱ्याहून पुण्याच्या तुरुंगांत आणिलें आहे असें कळतें हें प्रदर्शन सरकारास शोभत नाहीं. अपराध तो कसला आणि शिक्षा ती कोण भयंकर! त्या दोघा पैकीं एक गृहस्थ वयोवृद्ध लंगड्या सारखे व नेत्रानें अंधपणाला पोचलेले असे आहेत. सरकारची मर्जी! 'प्रतोद' कारांच्या अपिलाचा निकाल काय होईल तो खरा!

पुणेवैभवा वरील खटला पुढील महिन्याच्या सेशनांत चालणार आहे 'पुणेवैभव' कर्ते हल्लीं जामिनावर खुले आहेत.

हल्लीं दुर्दैवाचा ढग आमच्या सार्वजनिक चळवळीवर आला आहे. नामदार टिळक आदिकरून पत्रकर्त्यांवर चालविलेल्या कायद्याची गदा चांगल्या लोकांस सार्वजनिक कार्यांतून परावृत्त करित आहे. राष्ट्रीय सभेच्या कार्याविषयीं लोकामध्यें उद्विग्नता पसरली आहे. राष्ट्रीय सभेंत भाषण करणाऱ्या वक्त्यावर अराजनिष्ठेचा आरोप आणितील कीं काय अशी देखील दहशत मनावर बसली आहे. नामदार स्ट्रेची यांनीं प्रतिपादित केलेली अराजनिष्ठा मोठी व्यापक अर्थाची आहे आणि हें अवदर्शन चक्र सरकारच्या हातीं फिरत आहे तों पर्यंत इंडियनांनीं आपली वाणी बंद ठेवावी असा सरकारचा हेतु दिसतो. सरकारच्या हेतूला उल्लंघण्यास कोणी इच्छित नाहीं. यंदाची राष्ट्रीय सभा कशी काय पार पडते या विषयीं वऱ्हाडस्थ मंडळीस कायं पण सर्व राष्ट्रास मोठी चिंता पडली आहे!

यद्यपि आशावृक्षाला गोड मनोहर फळें येतील या मंत्रावर सर्वत्र नजर देण्यांत येत आहे. आपण प्रयत्नशील प्राणी आहों आणि आपल्या शीला प्रमाणें आपण राजमार्ग क्रमला पाहिजे. राजधर्मानें वागून राष्ट्रीय सभा सफल व यशस्वी करण्यासाठीं आमच्या प्रांतस्थ मंडळींनें यशाचा विडा उचलला आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. 'विपादि धैर्य' हेंच मानधन लोकांचें व्रत! राजमान्य सरळ मार्ग सारखा धरला आहे आणि आमचे उमरावतीकर राष्ट्रभक्त येत्या राष्ट्रीय सभेच्या उद्योगाला मनोभावानें लागले आहेत. ईश्वर करो, सुदैवाचा सूर्य सर्वत्र आनंद व यशसंपदा प्रसृत करो!

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 27, 1897

## TAPPING
### No. 2

There is no denying that if India has gained any political and moral advantages, she has her full share of them only under this Government. If she has been impoverished in her resources new vigour has been imparted to her mind and she has been enriched in freedom and independence. Religious toleration and other blessings of peace have only just begun to arouse her to her sense of gratitude to the present sway over her. If the English were to withdraw, say for a week, we shall first have a racial anarchy, and a racial civil war. Then we shall have a territorial anarchy. Our best interests are entwined with the British Government. It is as essential to our safety and advancement as we are essential to England's grandeur and commerce. Yet there is a mutual estrangement. Yet we see our rulers looking on us with unbearable contempt, distrust, and disdain. We are at the same time feeble and disarmed. We may be safely allowed to indulge in our freaks, even supposing we have any. Our rulers will be better employed in finding out the distempers and remedying them than in formulating state prosecutions and in inventing weapons for more effectually mortifying and humiliating us. This position does no good either to the one or to the other class of people. The distempers as we have said above have their origin in overtapping pure and simple..

The signs inevitably lead every one who has no prejudice to the conclusion that India has been overgoverned and is particularly at this time in need of tender and parental care at the hands of its rulers.

If the Anglo—Indian rulers of the country do not see and recognise the danger to the country, it is because immediate interests have blinded them. The expenditure has gone on increasing year by year, heedless of the consequences sure to affect the country if they have not already overridden it. No particular Government, no this or that individual is responsible for this slow, imperceptible and gradual increase. But somehow or other it has made rapid strides quite detrimental to the interests of this country.

To make a confession that the country has been over—burdened is to betray an incapacity. To make such a confession also means that the country needs urgent relief. Relief means retrenchment and retrenchment means opening another and more violent distempers of chagrin, discontent and dissatisfaction both here and at home. Yet we pray for a strong hand that will put the fiscal system of this country on a more reasonable and advantageous basis. If this end were once secured the present interenal discontent will for ever disappear.

India is an agricultural country and the increased demand of the Government made it imperative on the people to bring more land under cultivation and to make it yield more than it can. The fallow lands which people long used to keep to guard against exhaustion have all now become extinct. We admit the noble and sober wisdom of our rulers in wishing the resources of the land completely developed. But part cultivation with the

motives to produce as much as] possible and entire cultivation to meet the Government demand and a privation of the means for protection are different consequences. This only is a particular case of the term over—tapping we have used several times above.

There was a time when a *bhiga* of land gave an outturn of nearly thirty maunds. No bigha now yields more than six in the average. Nearly half a century ago every village had *kothars* in which grain was stored. Where are they gone now ? They have gone to feed hand-to-mouth lives who driven by extreme necessity can look only to the present trusting the future to itself ! This is true of the entire ninety five percent of the entire population. It is thus, that when the rainfall happens to be slightly scanty the country is at once overtaken by a famine and none but the state is forced to save the people from starvation. What a striking proof of the impoverishment of this people exclusively sustained by agriculture that they should be fed by the charities of England and America in case of a slight scarcity in agricultural products, the necessaries of life ? What a palpable illustration of the exhaustion of the reasources of the people that the Czar of Russia should raise subscription for the relief of the famished in India ?

We are far from advocating, for the sake of putting a check to this effect of overtapping, the necessity for disbanding the army or the necessity for abolishing the Civil Service whose members in these times are doing yeoman's service. We only wish those who have the will and the power to extricate the country from the crisis in which the combined inadvertence of their predecessors have placed it, should no longer suffer this mischievous influence to lower down on the country. Like the Honble Mr. Bhuskute from the Central Provinces we would invite the attention of F. S. Bullock Esq. C. I. E. the Commissioners of our province and T. C. Plowden Esquire to propose to the Supreme Government the necessity for appointing a famine commission after the present times cease and investigate and provide remidies for the permanent ensurance of this country against similar crises and the better contentment of the people as contentment is the real stability of every Government, however popular and desirable it may be.

---

## वऱ्हाड

हवामान— एकंदर २२ इंच पाऊस झाला. पावसांचीं लक्षणें अनुकूळ आहेत. कांहीं वेळ पाऊस व कांहींवेळ उघाडी असा क्रम चालला आहे. रोगराई ह्मणण्यासारखी विशेष नाहीं.

मि० शेख जाफर महमद बी० ए० हे मुंबई इलाख्याच्या शाळाखात्यांत परत गेल्यामुळें त्यांच्य हिंदुस्थानि डेपुटि इन्स्पेक्टरच्या जागीं मुंबई सरकारच्या भाषांतर कर्त्याच्या ऑफिसचे हेडक्लार्क मि० निझामुद्दिन अहमद एम० ए० ची नेमणूक गेल्या १ ले सप्टेंबर पासून केली आहे.

गेल्या जुलै महिन्यांत वऱ्हाडांत १०१५० माणसें जन्मलीं आणि १३१८८ मरण पावलीं. पटकी व दुष्काळ यामुळें मरणाचें प्रमाण फार मोठें आहे. लिंगभेदानें जननाचें प्रमाण १०० स्त्रियाला १०९ पुरुष असें पडतें. पण मरणाचें प्रमाण १०० स्त्रियांला १२१.६ पुरुष असें पडतें.

---

वऱ्हाडांतील १२ मुनसीपालिट्यांचे मुनसिपल कार्यपद्धतीचे नियम नवे दुरुस्त करून ते अमलांत आणण्यापूर्वीं लोकांच्या माहितीसाठीं गेल्या रेसिडेन्सी ऑरडर मध्यें प्रसिद्ध केले आहेत.

वऱ्हाडांत रेलवे मार्गानें ३० जानेवारी पासून ११ सप्टेंबर पर्यंत ४९५०० मण खाद्य-धान्यें आलीं आणि ५००० मण धान्यें बाह्य प्रांतीं गेलीं.

शेगांव मुनासिपाल कामिटीचे वार्ड नंबर ४ करितां एका सभासदाची जागा रिकामी झाल्यामुळें इलेक्शन तारीख २०।९।९७ रोजीं झालें. त्याच्या निकालासाठीं २१।९।९७ रोजीं स्पेशल मिटिंग भरून मि. केशरमल्ल गोविंदराम मारवाडी एजंट निसबत चुनीलाल शिवचंदराय आणि कंपनी, शेगांव यांची नेमणूक झाली.

धुळ्याची 'भवसागरानंदलहरी भडक' नाटककार मंडळी येथें आली असून गेल्या शनिवारीं रात्रीं तिनें 'चंद्रकांत मोहना' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. नाटक एकंदरीनें चांगलें झालें.

येथील पब्लिक वर्कस कडील ओव्हरसिअर रा. रा. जनार्दन विष्णु क्षैसकर व टाइमकीपर माधव आपटे या उभयतांस दुष्काळाच्या सरकारी कामावर हजर नसलेल्या मनुष्याच्या नांवानें पगार काढून घेतल्या बद्दलच्या आरोपा वरून प्रत्येकी २ महिने सक्त मजूरी व १०० रुपये दंड अशी शिक्षा डिस्ट्रीक्ट माजिस्ट्रेट यांनीं दिली. अपील होणार आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८—८९ रुपये |
| जवारी | ९२ रु० |
| गहूं ( कांठे ) | १३५ रु० |
| ,,( बनशी ) | १४० रु० |
| चणे | १४० रु० |
| तेल | ६॥। रु० मण |
| तूप | ८॥ मण |
| मीठ | ३॥।= मण. |
| सोनें | २५ तोळा |
| चांदी | ७५ |

---

नोटीस

रा० रा० जैकीसनदासजी जगन्नाथजी दुकान बावळी तालुके दर्यापूर यांस खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं आमची रकम तुमचे कडून येणें आहे ती रकम व्याजासुद्धा ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत आणून द्यावी. असें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून व नोटीसीचे व कोर्ट खर्चासुद्धां रुपये घेतले जातील कळावे तारीख २६।९।९७ इ०

सही
जगन्नाथ भागीरथ दुकान
आकोला दस्तुर खुद्द.

---

## HYDERABAD RESIDENCY ORDERS.

### NOTIFICATIONS.

Hyderabrd Residency, *the 23rd August* 1897.
No. 222.

| | |
|---|---|
| Akola. | Amraoti Camp. |
| Akot. | „ City. |
| Khamgaon. | Karinja. |
| Shegaon. | Ellichpur City. |
| Buldana. | „ Civil Station. |
| Basim. | Yeotmal. |

In supersession of all previous rules on the subject, the following rules for securing a proper registration of births and deaths made at a special meeting by the margially noted Municipal Committees under section 116 (I) *(c)* of the Berar Municipal Law, 1886, having been confirmed by the Resident, are hereby published for general information:—

*Rule I.*—On every birth of a child within the limits of the municipality, the father or the mother or guardian of the child, or in case of their absence or death or inability on account of sickness or other similar cause, some person living in the house in which the child was born, or some person who was present at its birth, shall within 72 hours from the time of birth give information on the following points at the Municipal Office, or to any officer or person specially appointed by the Committee for the purpose:—

(1) The division and street of the municipality in which the child was born.

(2) Name of its parents.

(3) Caste, occupation, and religion of the parents.

(4) Sex of the child.

(5) Date of the child's birth.

(6) Whether the child was born alive or was still-born, or whether having been born alive, it died immediately after birth.

*Rule II.*—On every death within the limits of the municipality, a member of the family to which the decesed belonged, or in case of there being no such member, or such member being unable on account of absence, sickness or other similar cause, some person living in the house in which the deash took place shall, within 72 hours from the occurrence of the death, give information on the following points at the Municipal Office, or to any officer or person specially appointed by the Committee for the purpose:—

(1) The division and the street of the municipality in which the death took place.

(2) The name, caste, religion, sex, and age of the decensed.

(3) The disease causing death. and how many days ill.

[4] The date of death.

[5] The occupation of the deceased.

*Rule III.*—Any municipal officer receicing information under rules I and II from any person shall, it required, furnish him with forms in the form given in the appendices A & B to these rules as may be required, and shall, on the receipt of the information, give a receipt to the person furnishing it in the form given in appendix C.

*Rule IV.*-Whoever refuses or neglects to give information in accordance with rules I and II, it being his duty under those rules to give information, shall, on conviction before a Magistrate, be liable to pay a fine not exceeding Rs. 5.

Rule V—The responsibility of collecting information regarding births and deaths within each division of th municipality shall primarily be wit the officer or servant specially ap pointed for the purpose for tha division.

( By order )
Arthur F. Pinhey,
Secretary for Berar.

### APPENDIX A

| Serial No. | Name of Division | Name of Street | Name of parents | Caste, occupation, and religion of parents | Sex of the Child | Date of child's birth | Whether child was born alive or was still-born or died immediately after birth | Name of informant | Signature of the informant | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

Dated 189
Signature of Municipal Officer.

### APPENDIX B

| Serial No. | Name of Division | Name of Street | Name of the deceased | Caste, religion and occupation | Sex | Age | The cause of death and how many days ill | The date of death | Name of informant | Signature of informant |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

Dated 189
Signature of Municipal Officer.

### APPENDIX C

*Serial No.*

Receipt for having given information of } Birth / Death

Year 189

*Municipality's seal.*

No fee is charged for this receipt.

---

## वर्तमानसार.

पुण्याच्या नातु सरदारांच्या १३ चाकरांस कैद केलें आहे. दोन मि. रांड व ले. एअर्स्ट यांचा खून केल्याचें कबूल करितात. तात्या साहेब नातूस पुण्यास नेलें ! पु. आ.

माणसेंच काय्तीं नट्टाफट्टा करितात असें समजूं नये. लहान असोत, मोठीं असोत, मांजरें नट्टाफट्टा करण्यांत अशी पटाईत असतात कीं कांहीं विचारूं नये. एखादे वेळीं हळूंच मांजराकडे पहावें तें आपल्या मागल्या पायावर बसून व पुढच्या दोन पंजापैकीं एक पंजा जिभेनें चाटून भिजवून तोंडावरून डोक्यावरून फिरवून आपली लव अगदीं गुळगुळीत करीत असेंत. ज्या ज्या ठिकाणीं ह्मणून त्याची जीभ लागूं शकत नाहीं. तो तो शरीराचा भाग साफसूफ करावयाचा ह्मणजे, पंजा तोंडांत भिजवून उद्योग सुरू व्हावयाचा. सिंह व वाघ अगदीं मांजराप्रमाणेंच हुबेहुब आपलें अंग तोंड वगैरे साफ करीत असतात कानाच्या मागील जागा सुद्धां कधीं मलीन राहूं देत नाहींत. या जनावरांचा पाय ह्मणजे फणी व स्पंज या दोन जिनसाप्रमाणेंच उपयोगीं पडतो. व जीभ सगळ्या शरीरभर जेथें जेथें पोंचेल तेथें तेथें तो फणी, पाणी वगैरेच्या जागीं उपयोगीं पडते मांजरांना गलिच्छ शरीर तर मुळीं सुद्धां आवडत नाहीं. ससे सुद्धां आपले पुढले पाय आपलें तोंड स्वच्छ करण्यास उपयोगांत आणतात. सशाचा पाय तर या कामाला इतका उपयोगीं असतो कीं, नाटकगृहांतून नाटकीं मंडळी आपल्या तोंडाला रंग लावण्यास सुद्धां त्यांचा उपयोग करतात.

प्रकाश पाडणारा मगर.

एक लहान जातीचा मगर सांपडला आहे. तो तेजस्वी असून अंधारांत त्याच्या शरीरापासून चांगला उजेड पडतो. हे मगर धरून अंधारांत नेले कीं, विलक्षणच देखावा दिसतो! त्याचें डोकें व शरीर याच्या पृष्ठभागापासून अगदीं नेहमीं किंचित् हिरवट असा प्रकाश निघत असतो. इतर कांहीं प्राण्यांप्रमाणें वर्षणानें तो जास्त होतो, असें नाहीं. याचे कल्ले इतके लहान असतात कीं त्याला फारसें उत्तम पोहायला येत नसावें असें वाटतें. आणि त्याचें भक्ष्य तर त्याला मिळालें पाहिजे. याला जर धड पोहण्याला येत नाहीं तर भक्ष्य कसें धरावें? तेव्हां त्याच्या त्या प्रकाशानें त्याचें भक्ष्य प्राणी आपोआप फसून त्याच्याजवळ येतात, आणि त्यास गट्ट करण्यास सांपडतात. कांहीं रानटी लोक मासे धरण्याचे वेळीं मशालीचा उपयोग करतात तो याच कारणासाठीं हें प्रसिद्धच आहे. उजेड जिकडे जिकडे असेल, तिकडे मासे फार जातात. क०

कातडें व हाडकें मिळतील असें जाणून मेलेल्या जनावरांचीं प्रेतें शहरांतून उचलून नेण्याकरितां हल्लीं कलकत्यास एक कंपनी स्थापन झाली आहे. व निरनिराळ्या भागांतही त्या कंपनीनें आपल्या शाखा उभारल्या आहेत.

बांद्रा येथील बायसिकल व ट्रायसिकलवर बसून फिरणाऱ्या तेथील रहिवासी लोकांपासून दरमहा आठ आणे कर घेण्याचा तेथील म्युनिसिपालिटीनें ठराव केला आहे व बाहेरून तेथें केवळ फिरण्यास जाणारापासून मात्र एक दिवसाचा एकच आणा कर घेण्यांत येईल असा दुसराही एक ठराव केला आहे.

सगळ्या राष्ट्रांच्या संमतीनें क्रीट येथें जें युरोपियन कोर्ट स्थापन करण्यांत आलें आहे, त्याबद्दल सुलतान सरकारची बाजू घेऊन क्रीटच्या गव्हरनरनें अशी तक्रार उभी केली आहे कीं, सदर प्रकारची व्यवस्था सुलतानच्या क्रीटवरील सत्तेस धक्का पोंचविणारी होईल.

यूरोप व अमेरिकेंतील विद्वानांनीं विमानांचा नाद सोडून देऊन विजेच्या साह्यानें हवेंत मुशाफरी करतां येण्याजोगे सांचे शोधून काढण्याच्या अनेक तजविजी चालविल्या आहेत. तशाच प्रकारच्या एका नवीन सांच्याचा शोध लवकरच प्रसिद्धीस येईल अशी मि. डेविडसन नांवाचे इंजिनियर खात्री देत आहेत. गेल्या पंधरा वर्षांपासून अत्यंत मेहनत व बारीक शोध काढून ते त्या कामीं खपत आहेत तेव्हां आतांशीं कोठें त्यांना त्या कामांत यश येईल असा भरंवसा वाटूं लागला आहे. त्यांनीं केलेला सांचा बाहेर पडला ह्मणजे विमाना प्रमाणें त्याची थट्टा न होऊं देतां आगबोट व रेल्वे याप्रमाणें दररोज व्यवहारांत उपयोगींच पडेल अशी ते खात्री देत आहेत. त्यांनीं बनविलेला सांचा कोणत्याही प्रकारचे अंदाजपत्रक तयार केल्याशिवाय केला आहे. त्याचप्रमाणें तो सांचा हवेमध्ये उत्तम रीतीनें फिरूं शकेल असेंच त्यांत त्यांनीं निक्षेप काम केलें आहे. आतां खोटीं एवढीच आहे कीं, लिहून काढलेल्या नकाशाप्रमाणें सांचा जोडून उभा करावयाचा आहे. तो सांचा हवेंत उडण्यांत जरी पहिल्या नंबरचा होणार नाहीं तरी एकाच वेळीं त्यांत २० माणसें बसून हवेंत मुशाफरी करूं शकतील आणि किंमत कमी दर तासास १०० मैलें या प्रमाणानें तो मार्ग आक्रमण करील. पण थोडे दिवसपर्यंत तो वापरांत राहिल्यावर व त्यावर एकदां चांगला हात बसल्यावर थोड्याच वर्षांत, प्रत्येक तासास ३०० मैल आकाशंपथ चालेल अशी खात्री वाटते. आगबोटीचा शोध चांगला यशस्वी निघाल्यावर ज्याप्रमाणें लहान मोठीं जहाजें हल्लीं हवेच्या योगानें महासागरांत हिंडूं फिरूं लागली आहेत त्याप्रमाणेंच मि. डेविडसन यांचा सांचा कांहीं वर्षांनंतर वातावरणांत फिरूं इच्छिणाराचे उपयोगी पडेल अशी त्यांची मनोदेवता त्यांस सांगत आहे. गोष्ट खरी. त्यांचे सांचे तयार होऊन चांगलें चालूं लागतील व आगगाडीप्रमाणें थोड्यांशा अवकाशांत लांबच्या पल्यावर मनुष्यास सुरक्षित नेऊन पोंचविण्यांस ते चांगले उपयोगी पडत आहेत असें दिसून आले ह्मणजे आह्मी आनंद मानून सदर शोधकाचीही पाठ थोपटूं पण जो पर्यंत तसा प्रत्यक्षानुभव आला नाहीं तो पर्यंत मि. डेविडसन यांच्या तर्कशास्त्राप्रमाणेंच त्यांचे सांचे हवेतून उतारू लोकांना नेऊन पोंचवितील तेव्हां ठिकठिकाणीं जीं स्टेशनें बांधावयाचीं तीं जमीनीवर बांधावयाचीं किंवा हवेवर उंच-मोल बांधून त्यावर उभारावयाचीं, वगैरे निरनिराळ्या कल्पना कोणी काढल्यास त्या बद्दल मि. डेविडसन यांस वाईट वाटेल काय? आगगाड्या व आगबोटी यांच्यापेक्षांही त्यांच्या हवेंतील सांच्यानें सुरक्षितपणें मुशाफरी करतां येईल असें जें त्यांचें ह्मणणें तें खरें ठरो हीच आमची इच्छा आहे. गु०

बेळगांव व आजूबाजूचे भाग येथें टोळ आले असून ते पिकांची नासाडी करीत आहेत.

पुण्याचे आजूबाजूची सांथ, ठाण्याचे आजूबाजूचा कालरा व पनवेल येथें तर हे दोन्ही रोग ह्यांचा सपाटा कमी न होता अजूनसुद्धां पुन्हां अधिकच होत चालला आहे.

गेल्या रविवारीं ३०० रानटी लोक खानाकेला येथें चालून आले व त्यांनीं निशाणें रोवून बंदुकांचे बार केले. हरिसिंग किल्याजवळ एका आफ्रिडिज मनुष्याला पकडण्यांत आलें. त्याजपाशीं ९० बारांचें सामान सांपडलें आहे. महमद लोक लोवाकशे ठाण्याची व वाटाची मजबुती करीत आहेत.

गुलास्तानखालीं सांगालापूर येथें १४ बावर्च्यांखालीं आफ्रिडिज लष्कराचा तळ पडला असून ओराकझे सैन्य त्यांस येऊन मिळाले आहे. त्यां लोकांस अन्नसामुग्री मात्र भरपूर मिळाली नाहीं. हें संयुक्त सैन्य सामानावर हल्ला करण्या करितां हंगूवर लवकरच चाल करून येणार आहे.

आफ्रिडिज लोकांनीं खैबर घाटावर जो हल्ला केला होता त्यांत १५० लोक जखमी झाल्याची बातमी आली आहे, पण मेलेल्या लोकांची संख्या मात्र बाहेर आली नाहीं.

चालू मोहिमेमध्यें क्यांप करण्याची नवीन तऱ्हा अशी काढली आहे कीं, शत्रूनें त्यावर हल्ला केला असतां तरवारवाल्यांना एकदम बाहेर पडतां येते.

पेशावर येथें अशी बातमी आहे कीं, मोंहमांड व आफ्रिडी अशा दोन्ही लोकांनीं त्या बाजूस होत असलेल्या ब्रिटिश सरकारच्या मोहीमांत अडथळा करण्याची तयारी चालविली आहे.

जनरल लॉक हार्ट हे २०,००० सैन्य व ६ पहाडी तोफखान्यांनिशीं आफ्रिडी लोकांच्या टिरा प्रांतावर स्वारी करणार आहेत हाडामुल्ला आतां टिरास परत जाणार आहे वायव्य सरहद्दीवर इंग्रज सरकारचें ५९००० सैन्य व ९० तोफा आहेत. जनरल एलीसचे मोहीमींचें सैन्य ६,६०० जमलें आहे. आफ्रिडी ओरकाझी लोकांचें सैन्य ४७००० जमल्याची बातमी आहे. खारागारी नांवाचें सरकारचें ठाणें शत्रूनीं हस्तगत करून घेतलें आहे. या लढाईंत शीख लोकांनीं चांगली बहादुरी केली. एका शीख शिपायानें शत्रूच्या २० लोकांस ठार मारलें होतें.

सामानाचे बाजूकडे ४७००० आफ्रिडी ओरकाझी लोक चालून जात असल्याचीही बातमी आली आहे. दुसरें एक ९००० आफ्रिडी लोकांचें लष्कर खांकी दरीमध्यें जमले असून तेथील मिश्नी लोक त्यांना सामील होत नाहींत ह्मणून त्यांच्या खेड्यांवर हल्ला करण्याचा त्यांचा बेत दिसत आहे. ता. १४ रोजीं जनरल यीटमन बिग्सच्या सैन्यानें जाऊन गुलीस्तान व लॉकहार्ट किल्यांची सुटका केली आणि तसें करितांना शत्रूच्या लोकांपैकीं पुष्कळच लोक ठार मारिले. आफ्रिडी-आरकाझी लोकांनीं सारागारी ठिकाण काबीज केल्यावर त्यांनीं मोठ्या जोरानें काव्हाग्नेरी किल्यावर हल्ला केला त्या वेळीं त्यांचा जमाव कित्येक हजार लोकांचा होता. त्या ठाण्याचीसुद्धां सुटका मग जनरल यीटमन बिग्सच्या सैन्याचे लोकांनीं चालून जाऊन व त्यास पळवून लावून केली.

देशी वर्तमानपत्रांवर सरकार भराभर खटले करूं लागलेले पाहून पुण्याचे तशा पत्राचे मालक व प्रिंटर्स आपलीं नांवें डिक्लेरेशन्समधून काढून टाकून दुसरे क्षुल्लक मनुष्यांचीं त्यांच्याबद्दल त्यांत घालण्याचे विनंतीचे अर्ज तेथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे करूं लागले आहेत. स० वि०

हैद्राबादच्या (निजाम) प्रस्तुतचे राज्यव्यवस्थेंत बराच फेरफार होणार असल्याचें समजतें.

नकलीराजे बनून भोळ्या लोकांपासून पैसे काढणाऱ्या टोळ्या कलकत्यासही फिरूं लागल्या आहेत.

टर्की व ग्रीस यांच्यांत झालेल्या तहासंबंधाचे करार पत्रकावर गेल्या शनवारी पीरा येथें सह्या झाल्या.

प्रसिद्ध सावकार मि. हुली यांच्या बरोबर कर्जाच्या देवघेवीसंबंधानें झालेल्या दस्तैवजावर चीन सरकार वगैरेच्या सह्या होऊन चुकल्या. कर्जाचा भाव शेंकडा ९४ ठेवला आहे हुलीवाल्या सिंडिकेटनें, शांघायापासून नेनांकिंगपर्यंतची रेल्वे सडक बांधविण्याकरितां २० लक्ष आणि भविष्यकाळीं प्रसंग पडल्यास हेनानकडील सडक वाढवावी लागल्यास आणखी ३० लक्ष पौंड चीनसरकारास कर्जाऊ देण्याचें कबूल केलें आहे.

इचलकरंजीकर.

दक्षिणेतील सरदारांनीं, मुंबईसरकारच्या कायदेकौन्सिल सभेंत आपल्यातर्फें प्रतिनिधि ह्मणून इचलकरंजीकर सरदार श्रीमंत नारायणराव गोविंद उर्फ बाबासाहेब घोरपडे यांची केलेली निवडणूक मुंबईसरकारनें मंजूर केली आहे.

गिरणी जळाली.

फ्रामजी पेटिट मिल जळाली. नुकसान ९ लाखांचें झालें. १५०० मजूर निराश्रित झालें. गु०

नामदार गव्हरनर साहेबांनीं मि० अझिमुद्दीन अमीरुद्दीन, 'मासालिम डेकन' नांवाच्या पत्रकर्त्यांना ब्रिटिश इंडिआच्या हद्दी बाहेर जाण्या विषयीं हुकूम केला आहे. मि० अझिम हे व्यापाराच्या निमित्तानें दोन वर्षांपूर्वीं मुंबईस आले होते. गेल्या वर्षापासून त्यांनीं मुंबईस 'सालिम डेकन' नावाचें पाक्षिक वर्तमानपत्र चालू केलें होतें. यांत आमच्या व निजाम सरकारच्या विरुद्ध फारच कडक लेख असत, ह्मणून त्यांना ही शिक्षा भोगावी लागली. - धुतिण.

दुसऱ्यांनीं मिळविलेली संपत्ति आणि मान हीं मला धुराच्या लोटाप्रमाणें होत.

सौंदर्यावर नसें, तसेंच सत्यावर प्रेम धरणारा मनुष्य अगदीं विरळ.

श्रेष्ठ शीलाचा मनुष्य परमेश्वराचें भय बाळगतो, श्रेष्ठांचा मान ठेवतो, पंडिताच्या शब्दास पूज्य मानतो.

जो अधम, तो परमेश्वरास भीत नाहीं, श्रेष्ठांचा मान ठेवीत नाहीं. आणि पंडितांच्या बोलण्याची अवहेलना करितो. क०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.